# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – ४२

## सभावृत्तांत

दिनांक – २०.०३.२०२० वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे मार्च- २०२० ची मासिक मा. महापालिका सभा शुक्रवार दिनांक २०.०३.२०२० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे महापौर

२) मा.साधना अंकुश मळेकर

३) मा.दत्तात्रय बाबूराव साने

४) मा.बुर्डे सुवर्णा विकास

५) मा.तापकीर विनया प्रदिप (आबा)

६) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

७) मा.गायकवाड निर्मला मनोज

८) मा.गोफणे अनुराधा देविदास

९) मा.बारसे प्रियांका प्रविण

१०) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

११) मा.लांडगे रवि लक्ष्मण

१२) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

१३) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

१४) मा.फुगे भिमाबाई पोपट

१५) मा.सावळे सिमा रविंद्र

१६) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

१७) मा.गीता सुशिल मंचरकर

१८) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

१९) मा.अनुराधा गणपत गोरखे

२०) मा.मंगला अशोक कदम

२१) मा.अश्विनी भिमा बोबडे

२२) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

२३) मा.एकनाथ रावसाहेब पवार

२४) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

२५) मा.चिखले सचिन तुकाराम

२६) मा.जावेद रमजान शेख

२७) मा.वैशाली जालिंदर काळभोर

२८) मा.प्रमोद कुटे

२९) मा.राजु मिसाळ

३०) मा.बाबर शर्मिला राजू

३१) मा.अमित राजेंद्र गावडे

३२) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

३३) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३४) मा.ढाके नामदेव जनार्दन

३५) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

३६) मा.करुणा शेखर चिंचवडे

३७) मा.अपर्णा निलेश डोके

३८) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

३९) मा.गावडे राजेंद्र तानाजी

४०) शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

४१) मा.जयश्री वसंत गावडे

४२) मा.सुलक्षणा राजू धर

४३) मा.शाम गणपतराव लांडे

४४) मा.सुजाता सुनिल पालांडे

४५) मा.कदम निकीता अर्जुन

४६) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

४७) मा.पाडाळे निता विलास

४८) मा.काळे उषा दिलीप

४९) मा.पवार मनिषा प्रमोद

५०) मा.बारणे अर्चना तानाजी

५१) मा.अभिषेक गोविंद बारणे

५२) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

५३) मा. अॅड.भोसले सचिन सुरेश

५४) मा.निलेश हिरामण बारणे

५५) मा.कलाटे राहुल तानाजी

५६) मा.कलाटे मयूर पांडुरंग

५७) मा.कामठे तुषार गजानन

५८) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

५९) मा.कुटे निर्मला संजय

६०) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

६१) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

६२) मा.मुंढे उषा अंकुश

६३) मा.लोखंडे चंदा राजू

६४) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

६५) मा.आशा धायगुडे-शेंडगे

६६) मा.नवनाथ दत्तु जगताप

६७) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

६८) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.संतोष पाटील- अतिरिक्त आयुक्त (१), मा.पवार- अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

**मा. महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.बापू उर्फ शत्रुघ्न काटे -** मा.महापौर साहेब, संपुर्ण जगभरात कोरोना संसर्गाचा वाढता प्रादूर्भाव आहे, त्याच्यामध्ये आपले पिंपरी चिंचवड शहर पण आहे. तरी सर्वत्र आपण एकत्र येण्याच टाळतो त्यामुळे आपली ही सभा सोमवार दि.२०/४/२०२० दु.१.४५. पर्यंत तहकूब करावी अशी मी सूचना मांडतो.

**मा.राहूल कलाटे –** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर –** कोरोनाचे जागतीक संकट सर्व देशावर आलेले आहे. कोरोनावर मात करण्याकरिता आपण सर्वानी सहकार्य करायच आहे, त्याबाबत सर्वानी काळजी घ्यायची आहे. गर्दीत जावू नये, त्याच बरोबर सर्दी, खोकला असेलतर नजीकच्या दवाखान्यामध्ये जावून त्याची ट्रिटमेंट घ्यावी. अशा पध्दतीने कोरोनावर मात करण्यासाठी शासनाने ज्या काही गोष्टी करायला सांगीतल्या त्या पध्दतीने आपल्याला करायच आहे. कोरोना हा दुस-या टप्प्यात येवू न देता आपल्याला येथून त्याला घालवायच आहे. तरी कोरोना आपत्तीमुळे आजची सभा सोमवार दि. २०/०४/२०२० रोजी दुपारी १.४५ पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

-------

(उषा उर्फ माई मनोहर ढोरे)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक – ४२</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**<u>(दि.२०/०३/२०२० ची तहकूब सभा)</u>**

दिनांक – २०.४.२०२० वेळ – दुपारी १.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे मार्च- २०२० ची तहकूब मा. महापालिका सभा सोमवार दिनांक २०.०४.२०२० रोजी दुपारी १.४५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे महापौर

२) मा.साधना अंकुश मळेकर

३) मा.दत्तात्रय बाबूराव साने

४) मा.तापकीर विनया प्रदिप (आबा)

५) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

६) मा.गायकवाड निर्मला मनोज

७) मा.गोफणे अनुराधा देविदास

८) मा.बारसे प्रियांका प्रविण

९) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

१०) मा.लांडगे रवि लक्ष्मण

११) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

१२) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

१३) मा.फुगे भिमाबाई पोपट

१४)   मा.सावळे सिमा रविंद्र

१५)   मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

१६)   मा.गीता सुशिल मंचरकर

१७)   मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

१८)   मा.मंगला अशोक कदम

१९)   मा.अश्विनी भिमा बोबडे

२०)   मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

२१)   मा.एकनाथ रावसाहेब पवार

२२)   मा.पंकज दत्तात्रय भालेकर

२३)   मा.चिखले सचिन तुकाराम

२४)   मा.जावेद रमजान शेख

२५)   मा.वैशाली जालिंदर काळभोर

२६)   मा.प्रमोद कुटे

२७)   मा.शैलजा अविनाश मोरे

२८)   मा.बाबर शर्मिला राजू

२९)   मा.अमित राजेंद्र गावडे

३०)   मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

३१)   मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३२)   मा.ढाके नामदेव जनार्दन

३३)   मा.माधुरी  कुलकर्णी उर्फ मोनाताई

३४)   मा.करुणा शेखर चिंचवडे

३५)   मा.चिंचवडे सचिन बाजीराव

३६)   मा.अपर्णा निलेश डोके

३७)   मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

३८)   मा.गावडे राजेंद्र तानाजी

३९) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

४०) मा.जयश्री वसंत गावडे

४१) मा.सुलक्षणा राजू धर

४२) मा.शाम गणपतराव लांडे

४३) मा.सुजाता सुनिल पालांडे

४४) मा.कदम निकीता अर्जुन

४५) मा.संदिप बाळकृष्ण वाघेरे

४६) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

४७) मा.पाडाळे निता विलास

४८) मा.काळे उषा दिलीप

४९) मा.बारणे अर्चना तानाजी

५०) मा.अभिषेक गोविंद बारणे

५१) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

५२) मा. ॲड.भोसले सचिन सुरेश

५३) मा.निलेश हिरामण बारणे

५४) मा.कलाटे राहुल तानाजी

५५) मा.कलाटे मयूर पांडुरंग

५६) मा.कामठे तुषार गजानन

५७) मा.कुटे निर्मला संजय

५८) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

५९) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

६०) मा.मुंढे उषा अंकुश

६१) मा.लोखंडे चंदा राजू

६२) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

६३) मा.आशा धायगुडे-शेंडगे

६४) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

६५) मा.संतोष बबन कांबळे

६६) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

६७) मा.अॅड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.पवार-अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**मा. महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, आजची सभा कोराना आपत्तीमुळे बुधवार दि. २०/५/२०२० दु.१.४५. पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.संतोष लोंढे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर -** सर्वांचे आभार मानुन ही सभा कोरोना आपत्तीमुळे बुधवार दि.२०/०५/२०२० रोजी दुपारी १.४५ पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

-----

(मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे)

**महापौर**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी -४११ ०१८.

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

### मा.महापालिका सभा
### कार्यपत्रिका क्रमांक – ४२
### सभावृत्तांत
### (दि.२०/०३/२०२० व दि. २०/०४/२०२० (दु.१.४५ वा.)  ची तहकूब सभा)

दिनांक – २०.५.२०२० वेळ – दुपारी १.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे मार्च- २०२० ची तहकूब मा. महापालिका सभा बुधवार दिनांक २०.०५.२०२० रोजी दुपारी १.४५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे | महापौर |
| २) | मा.तुषार रघुनाथ हिंगे | उपमहापौर |
| ३) | मा.दत्तात्रय बाबूराव साने | |
| ४) | मा.गोफणे अनुराधा  देविदास | |
| ५) | मा.लांडगे रवि लक्ष्मण | |
| ६) | मा.लांडगे राजेंद्र किसनराव | |
| ७) | मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे | |
| ८) | मा.फुगे भिमाबाई पोपट | |
| ९) | मा.सावळे सिमा रविंद्र | |
| १०) | मा.अनुराधा गणपत गोरखे | |
| ११) | मा.अश्विनी भिमा बोबडे | |
| १२) | मा.संजय बबन नेवाळे | |

१३) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

१४) मा.घोलप कमल अनिल

१५) मा.पवळे सुमनताई मधुकर

१६) मा.जावेद रमजान शेख

१७) मा.बाबर शर्मिला राजू

१८) मा.अमित राजेंद्र गावडे

१९) मा.ढाके नामदेव जनार्दन

२०) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

२१) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

२२) मा.सुजाता सुनिल पालांडे

२३) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

२४) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

२५) मा.पवार मनिषा प्रमोद

२६) मा.अभिषेक गोविंद बारणे

२७) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

२८) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

२९) मा.कलाटे राहुल तानाजी

३०) मा.कामठे तुषार गजानन

३१) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

३२) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

३३) मा.आशा धायगुडे-शेंडगे

३४) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

३५) मा.संतोष बबन कांबळे

याशिवाय मा.संतोष पवार- मा.अतिरिक्त आयुक्त (१) , मा.पवार-अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.सवणे – प्र.सह शहर अभियंता, मा.इंदलकर, मा.बोदडे- सहाय्यक आयुक्त हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

**मा. महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, सभागृहात गणसंख्या नसल्यामुळे गणसंख्येअभावी ही सभा तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.मनिषा पवार –** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर-** गणसंख्येअभावी आजची सभा सोमवार दि.१/६/२०२० रोजी दुपारी १.०० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

-----

(मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – ४२**

**सभावृत्तांत**

**(दि.२०/०३/२०२०, दि. २०/०४/२०२० (दु.१.४५ वा.) व दि.२०/५/२०२० (दु.१.४५.वा.) ची तहकूब सभा)**

दिनांक – १.६.२०२० वेळ – दुपारी १.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे मार्च- २०२० ची तहकूब मा. महापालिका सभा सोमवार दिनांक १.६.२०२० रोजी दुपारी १.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे | महापौर |
| २) | मा.तुषार रघुनाथ हिंगे | उपमहापौर |
| ३) | मा.कुंदन अंबादास गायकवाड | |
| ४) | मा.स्वीनल कपिल म्हेत्रे | |
| ५) | मा.दत्तात्रय बाबूराव साने | |
| ६) | मा.अश्विनी संतोष जाधव | |
| ७) | मा.सारीका शिवाजी सस्ते | |
| ८) | मा.राहुल गुलाब जाधव | |
| ९) | मा.वसंत प्रभाकर बोराटे | |
| १०) | मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे | |
| ११) | मा.बुर्डे सुवर्णा विकास | |
| १२) | मा.तापकीर विनया प्रदिप (आबा) | |

१३) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

१४) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१५) मा.उंडे लक्ष्मण धोंडू

१६) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१७) मा.सागर बाळासाहेब गवळी

१८) मा.गोफणे अनुराधा देविदास

१९) मा.बारसे प्रियांका प्रविण

२०) मा.अजित दामोदर गव्हाणे

२१) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२२) मा.लांडगे सारिका संतोष

२३) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२४) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२५) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२६) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२७) मा.फुगे भिमाबाई पोपट

२८) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२९) मा.सावळे सिमा रविंद्र

३०) मा.लोंढे नम्रता योगेश

३१) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

३२) मा.लांडे विक्रांत विलास

३३) मा.गीता सुशिल मंचरकर

३४) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३५) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३६) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३७) मा.अनुराधा गणपत गोरखे

३८) मा.केशव हनुमंत घोळवे

३९) मा.मंगला अशोक कदम

४०) मा.आश्विनी भिमा बोबडे

४१) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

४२) मा.संजय बबन नेवाळे

४३) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४४) मा.भालेकर प्रविण महादेव

४५) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४६) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४७) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४८) मा.घोलप कमल अनिल

४९) मा.उत्तम प्रकाश केंदळे

५०) मा.पवळे सुमनताई मधुकर

५१) मा.चिखले सचिन तुकाराम

५२) मा.यादव मीनल विशाल

५३) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५४) मा.प्रमोद कुटे

५५) मा.राजू मिसाळ

५६) मा.शैलजा अविनाश मोरे

५७) मा.बाबर शर्मिला राजू

५८) मा.अमित राजेंद्र गावडे

५९) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

६०) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

६१) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

६२) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

६३) मा.ढाके नामदेव जनार्दन

६४) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

६५) मा.करुणा शेखर चिंचवडे

६६) मा.भोईर सुरेश शिवाजी

६७) मा.अपर्णा निलेश डोके

६८) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६९) मा.गावडे राजेंद्र तानाजी

७०) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

७१) मा.जयश्री वसंत गावडे

७२) मा.कोमल दिपक मेवानी

७३) शितल उर्फ विजय गोरख शिंदे

७४) मा.सुलक्षणा राजू धर

७५) मा.शाम गणपतराव लांडे

७६) मा.सुजाता सुनिल पालांडे

७७) मा.योगेश मंगलसेन बहल

७८) मा.कदम निकीता अर्जुन

७९) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

८०) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८१) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

८२) मा.नढे विनोद जयवंत

८३) मा.पाडाळे निता विलास

८४) मा.काळे उषा दिलीप

८५) मा.कोकणे संतोष अंकुश

८६) मा.पवार मनिषा प्रमोद

८७) मा.बारणे अर्चना तानाजी

८८) मा.अभिषेक गोविंद बारणे

८९) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

९०) मा. ॲड.भोसले सचिन सुरेश

९१) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

९२) मा.बारणे माया संतोष

९३) मा.निलेश हिरामण बारणे

९४) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

९५) मा.दर्शले रेखा राजेश

९६) मा.कलाटे राहुल तानाजी

९७) मा.ममता विनायक गायकवाड

९८) मा.कामठे तुषार गजानन

९९) मा.चोंधे आरती सुरेश

१००) मा.कस्पटे संदिप अरुण

१०१) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

१०२) मा.सविता बाळकृष्ण खुळे

१०३) मा.सुनिता हेमंत तापकीर

१०४) मा.चंद्रकांत बारकु नखाते

१०५) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०६) मा.कुटे निर्मला संजय

१०७) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

१०८) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

१०९) मा.आंगोळकर सागर सुनिल

११०) मा.मुंढे उषा अंकुश

१११) मा.कदम शशिकांत गणपत

११२) मा.लोखंडे चंदा राजू

११३) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

११४) मा.आशा धायगुडे-शेंडगे

११५) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

११६) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

११७) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

११८) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

११९) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

१२०) मा.नवनाथ दत्तू जगताप

१२१) मा.संतोष बबन कांबळे

१२२) मा.सोनवणे शारदा हिरेन

१२३) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

१२४) मा. भाऊसाहेब सोपानराव भोईर

१२५) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१२६) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१२७) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

(कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर सभा आयोजनाकामी केलेल्या उपाययोजनानुसार काही सन्मा.नगरसदस्यांना On Line सभेमध्ये सहभागाकरिता मा.गटनेते यांचेमार्फत सन्मा. सदस्यांची नावे सभेपूर्वी देणेबाबत कळविणेत आले असता मा.तापकीर विनया प्रदिप (आबा), मा.गीता सुशिल मंचरकर, मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे व मा.वाघमारे आश्विनी विक्रम हे सन्मा.सदस्य On Line सभेमध्ये सहभागी झाले असल्याचे मा.मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांनी कळविले असल्याने सभा कामकाज नियमावलीतील नियम क्र. ११३ नुसार सदर उपरोक्त चार सन्मा.सदस्य पुर्णवेळ सभेस हजर होते असे मानन्यात यावे तसेच त्यांच्या रितसरपणे हजेरीपत्रकावर स्वाक्ष-या घेवून हजेरी नोंदविणेत यावी याप्रमाणे मा.महापौर यांनी लेखी निर्देश दिले असल्याने त्याप्रमाणे सभावृत्तांतात नोंद घेणेत आली असे.)

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर-आयुक्त, मा.संतोष पाटील- अतिरिक्त आयुक्त (१), मा.पवार-अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.पाटील- प्र.शहर अभियंता, मा.कुंभोजकर- मुख्य लेखापरिक्षक, मा.कोळंबे- मुख्य लेखा अधिकारी, मा.डॉ.रॉय- आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.पवार- उपसंचालक नगररचना, मा.तुपे, मा.निकम, भालकर - सह शहर अभियंता, मा.सवणे-प्र.सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.अलमलेकर, मा.जोशी, मा.खाडेकर, मा.दुरगुडे, मा.झगडे, मा.खोत, मा.बोदडे- सहा.आयुक्त, मा.शिंदे– प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.पोमण- मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.सावळे- अति. आरोग्य वैदयकीय अधिकारी , मा.डॉ.वाबळे-अधिष्ठता वायसीएमएच, मा.तांबे, मा.कुलकर्णी, मा.वाघुंडे- कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

**मा. महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे -** मा.महापौर साहेब, कोरोना विषाणू संसर्गाने ३७२०५२ नागरीकांचे निधन, छत्तीसगडमधील सुकमा जिल्हयामध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये १७ पोलीस, हंडवारा येथे दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत ५ जवान शहीद, औरंगाबाद येथे रेल्वे रुळावर झोपलेल्या ५ मजुरांचे रेल्वेखाली चिरडून निधन तसेच मांगेराम गुप्ता- हरियाणा राज्याचे माजी अर्थमंत्री व आगरवाल समाजाचे नेते, इंदुबाई विठोबा लांडे – मा.आमदार श्री.विलास लांडे यांच्या मातोश्री, भाईजान काझी – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाचे माजी सभापती, अनंत भगवान दिक्षीत- ज्येष्ठ पत्रकार आणि सकाळचे माजी संपादक, हिंदुराव नाईक निंबाळकर-शिवसेनेचे माजी खासदार, दत्तात्रय अंत्रे–पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे मुख्य लिपीक, जयराम कुलकर्णी व रविराज – ज्येष्ठ अभिनेते, किशोर पाठक – ज्येष्ठ कवी, सावित्रीआक्का पाटील- ना.राजेंद्र पाटील वड्रावकर यांच्या मातोश्री, विष्णु कांबळे – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी उपमहापौर, ऋषीकपुर व इरफान खान- हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिध्द अभिनेते, रत्नाकर मतकरी – प्रसिध्द ललित लेखक, नाटककार व नाटय दिग्दर्शक, बलबीर सिंग (सिनियर) – जेष्ठ हॉकीपटू, मोरेश्वर आप्पा भागुजी गोलांडे – मनपाचे माजी ज्येष्ठ नगरसेवक, बाळासाहेब तुकाराम लांडगे यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर-** सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.नामदेव ढाके –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. गेल्या तीन महीन्यापासून संपुर्ण देशावरती, महाराष्ट्रावरती व आपल्या शहरावरती कोरोनाचे सावट आलेल आहे. त्या अनुषंगाने आज आपण आपल्या शहराची परिस्थिती बघीतलीतर इतर शहराच्या तुलनेमध्ये आपल्या शहराच्या परिस्थितीचा आपण

सर्वानी आढावा घेतलातर आपल्या शहरामध्ये लोकसंख्येच्या मानाने आणि आपण केलेल्या उपाययोजना, आपले डॉक्टर असतील, नर्स असतील, सफाई कर्मचारी असतील, वायसीएम हॉस्पिटलमध्ये काम करणारे कर्मचारी असतील, प्रशासनाचे सर्व अधिकारी असतील सन्मा.आयुक्त साहेब असतील, अति.आयुक्त (१) व (२), सर्व अधिकारी अतीशय प्रामाणिक पणे याठिकाणी काम करतात. गेल्या तीन महीन्याची परिस्थिती बघता विशेष करुन मी सर्व सन्माननीयांच, प्रशासनाच सर्व डॉक्टर मंडळींच, सर्व नर्स मंडळींच, पोलीसांच, प्रशासनांच, सर्व प्रशाकीय मंडळीने गेल्या तीन महीन्यापासून याठिकाणी काम केलेलं आहे त्यांचा अभिनंदनाचा ठराव मांडतो, तरी तो अभिनंदनाचा ठराव पारीत करावा अशी मी विनंती करतो.

**मा. विठ्ठल उर्फ नाना काटे –** मा.महापौर साहेब, आताच नामदेव ढाके यांनी जो ठराव मांडला त्याला माझे अनुमोदन आहे.

**मा.सचिन चिखले -** मा. महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरतर संपुर्ण शहरावर करोनासारख्या संसर्गजन्य रोगाने थैमान घातलेल आहे. देशाच्या बाहेर, देशामध्ये असंख्य लोक कोरोनाग्रस्त होवून असंख्य कुटूंब या संसर्गजन्य रोगानी उध्दवस्त झालेले आहेत. शहरामधल आणि देशामधल पण आपण पाहील कित्येक परप्रांतीय आपले व्यावसाय, धंदे सोडून आपआपल्या घरी जाण्यासाठी प्रस्थान करत आहेत. असंख्य यातना या भारत देशाने, या महाराष्ट्राने सोसलेल्या आहेत आणि सोसतही आहेत. मागच्या एक महीन्यापुर्वी लोकांच्या मनामध्ये भीती होती की बाहेर आल्यानंतर आपल्याला सुध्दा लागण होईल. अशा एकदम वाईट अशा परिस्थितीमध्ये सर्व कर्मचारी असतील, आयुक्त असतील, अति.आयुक्त असतील, नगरसेवक असतील त्याप्रमाणेच या शहरामध्ये ज्यांनी मोलाचा असा हातभार लावला असा बजरंग दल असेल, इस्कॉन असेल, विवीध संस्था यांनी खुप मोठ मोलाच योगदान या शहरासाठी दिलेलं आहे. हे योगदान हे दिवस कधीही विसरु न शकणार असं काम या सर्व मंडळीनी केलेलं आहे. जर आपण पाहीलतर शहरामध्ये काल ५०० चा आकडा

ओलांडताना दिसत आहे. जीवाची बाजी लावता प्रशासन असेल आपण सर्वजण मंडळी एकत्रीत येवून काम करतो याचा आनंद आपल्या सर्वांना आहे. लवकरच आपण सर्वजण एकत्र येवून या देशातन करोनाला हद्दपार करु यात असा संकल्प आपल्या समोर ठेवतो आणि थांबतो, धन्यवाद, जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.अजित गव्हाणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याठिकाणी अभिनंदनाचा ठराव मांडण्यात आला त्याला सर्वांनीच मनापासून अनुमोदन दिलेलं आहे. खर म्हणजे संपुर्ण जगामध्ये आज संकट उभ राहील आहे.

या परिस्थितीमध्ये ख-या अर्थाने आपल्या पिंपरी चिंचवड शहरानी खुप चांगल काम केल याबद्दल निश्चितपणे आयुक्तांच आणि त्यांच्या टिमचं मी मनापासून अभिनंदन करतो. सुरवातीच्या काळामध्ये आपण सगळयात पुढे होतो, देशामध्ये सगळयात जास्त पेशंट महाराष्ट्रामध्ये आणि त्याच्यानंतर पुण्यापेक्षाही आपण आघाडीवर होतो. नंतरच्या काळामध्ये १२ पेशंटवर बरेच दिवस थोपवल व नंतरचा काही घटनाक्रम झाल्यानंतर याठिकाणी आपल्याकडेही पेशंट वाढायला सुरवात झाली. परंतु ज्या पध्दतीने आपण हे पेशंट आटोक्यात ठेवण्याच काम केलं ते निश्चितपणे कौतूकास्पद आहे. परवा कमीशनरसाहेब जेव्हा पीसीबीला फेसबूक लाईव्हवरती आले तेव्हाही आपण त्यांच्याकडन या संपुर्ण प्रक्रीयेमध्ये कशा पध्दतीने प्रशासनाने हा संपुर्ण विषय हाताळला ते सांगण्याचा आयुक्त साहेबांनी प्रयत्न केला. प्रत्यक्ष भेटीमध्ये सुध्दा आयुक्त साहेबांनी आपल्या सगळयाची सुध्दा व्हीडीओ कॉन्फरन्स त्यांनी मागच्या काळामध्ये घेतली आणि त्यामध्ये त्यांनी या सगळया प्रक्रीया ज्या पध्दतीने वापरतो ते सांगीतले आणि आता नंतर वॉररुम आपण केली आणि त्या वॉररुमच्या माध्यमातून कशा पध्दतीने आपण संपुर्ण या संकटावर मात करण्याच्या दृष्टिकोनातून कशा पध्दतीने प्रयत्न करतो आणि रोजच्या रोज आपल्याला मॅसेजपण येतात त्याच्यामुळ या सगळया ज्या काही उपाययोजना आपण राबवलेल्या आहेत त्यामुळे निश्चितपणे आपल्याला खुप चांगल यश आलेलं आहे. भविष्यकाळामध्ये आणखीन आपल्याला या संकटावर मात करण्याच्या दृष्टिकोनातून आणखी सतर्क राहण्याची गरज आहे. पुन्हा एकदा आजपासून ब-याच गोष्टीला शिथिलता आलेली आहे. त्यादृष्टिकोनातून आपल्याला अधिक जास्त जागृकपणे प्रशासनाला आणि आपल्या सगळयानाच काम करायच आहे. या परिस्थितीमध्ये आता सचिन चिखलेनी सांगीतल्याप्रमाणे अनेक एनजीओ, अनेक संस्थानी त्याठिकाणी या शहरामध्ये खुप चांगल्याप्रकारे या संकटावरती मात करण्याच्या दृष्टिकोनातून हातभार लावलेला आहे म्हणजे विशेषत: आमच्या भागामध्ये आपत्ती व्यावस्थापनाच काम करणा-या मुलांनी खुप चांगले कष्ट

घेतले. संभाजी ब्रीगेडीअर असेल, इस्कॉन असेल अशा अनेक संस्थानी त्याठिकाणी काम केलं. त्याच बरोबर आपल्या सर्व परिसरातील नगरसेवकांनी प्रत्येकानी आपआपल्या परीने ज्याच्या त्याच्या प्रभागामध्ये खुप चांगल्या प्रकारे लोकांना मदत करण्याची भूमीका घेतली. विशेषत: निश्चितपणे या निमीत्ताने सांगू इच्छितो की आपल्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये कुठलाही माणूस पहील्या दिवसापासून उपाशी राहीला नाही. याच सर्व श्रेय आपल्या सगळ्यांना जात विशेषत: प्रशासनाने प्रत्येक ठिकाणी जेवणाची व्यवस्था केली. माझ्या प्रभागामध्ये संध्याकाळी जवळपास ११०० लोक आणि दुपारी ६५० ते ७०० लोक त्याठिकाणी जेवणासाठी येत होते. म्हणजे या संकटाच्या काळामध्ये खुप चांगल काम महापालिकेच्या माध्यमातून झाल, नगरसेवकांनी सुध्दा आपआपल्या परीने त्याठिकाणी कामगारांना किंवा गरीब लोकांना मदत करण्याची भूमीका घेतली, कोणी किट वाटले. महापालिकेची यंत्रणा तेवढया प्रमाणात नव्हती म्हणून प्रत्येक नगरसेवकांनी आपआपल्या परीने आपआपल्या प्रभागामध्ये सॅनिटायझेशन करण्याच काम केलं आणि नंतरच्या काळामध्ये जैन संघटना आणि पिंपरी चिंचवड महापालिकेच्या माध्यमातून त्याठिकाणी ॲम्ब्युलन्स सुरु केल्या आणि त्या ॲम्ब्युलन्स आणि डॉक्टर्सच्या माध्यमातून संपुर्ण शहरामध्ये घरोघरी जावून त्याठिकाणी प्रत्येक कॉलनीमध्ये जावून लोकांच टेस्टींग करतो आणि त्याबद्दल जैन संघटनेच मी मनापासून आभार मानतो. अशा अनेक उपाययोजना करण्याच काम आपण करतो. आपण पेशंट शोधतो पेशंट शोधल्यानंतर त्यावरती टेस्टींग करतो नंतर त्यांच आयसोलेशन त्यांना क्वॉरंटाईन करतो हे खुप चांगल्या पध्दतीने आपल्या शहरामध्ये राबवल जातय. परंतु मा.महापौर साहेब आणि आयुक्त साहेब या निमीत्ताने प्रशासनाकड माझी मागणी आहे आणि अनेक नगरसेवकांनीही मागच्याकाळात मागणी केली आणि आपणही सांगीतल की आपण लवकरच आपल्या शहरामध्ये स्वत:च टेस्टींग लॅब सुरु करतो, नेमक त्याच स्टेटस काय आहे. तरी आमची सगळयांची विनंती आहे की लवकरात लवकर स्वत:च टेस्टींग त्याठिकाणी सुरु केल, टेस्टींगची लॅबजर त्याठिकाणी सुरु केलीतर निश्चितपणे फायदा आपल्याला होईल. आज आपण नारीमध्ये टेस्टींग करतो, ससूणमध्ये टेस्टींग करतो एनआयव्हीमध्ये आणि पाषाणमध्ये अशा चार ठिकाणी आपल टेस्टींग होतं. परंतु टेस्टींगला जेव्हा सॅपल पाठवले जातात तेव्हा दोन ते तीन दिवस ते सॅपल टेस्टींग होण्यासाठी कालावधी लागतो. याच्यामुळे आपल्या येथील जे पेशंट ॲडमीटेड असतात त्या पेशंटच्या मनामध्ये मध्ये एकतर पहीली ही भीती असते आणि प्रचंड दडपणाखाली तो पेशंट हॉस्पिटलमध्ये किंवा ज्याठिकाणी त्याला आयसोलेशनमध्ये ठेवलेलं आहे त्याठिकाणी तो दडपणाखाली असतो. ज्याठिकाणी आपण त्यांना आयसोलेशन

करतो किंवा क्वॉरंन्टाईन करतो त्याठिकाणी इतरही पेशंट असतात त्याच्यामुळे त्याही ठिकाणी त्यांना तशाप्रकारचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याच्यामुळे आपली लवकरात लवकर स्वतःची लॅब होण गरजेच आहे कारण आपल्याला आपल्या शहराची लोकसंख्या गृहीत धरता पुढच्या काळामध्ये हे संकट जर अधिक वाढलतर आपली स्वतःची लॅब असणे गरजेच आहे आणि त्या दृष्टिकोनातून आपण प्रयत्न सुरु केलेले आहेत. परंतु लवकरात लवकर ती लॅब सुरु व्हावी अशाप्रकारची अपेक्षा या निमीत्तानी करतो. उदयाच्या काळामध्ये जशी संपुर्ण जगामध्ये परिस्थिती निर्माण झाली, आपल्या देशामध्ये आपल्या राज्यामध्ये आणि पिंपरी चिंचवड शहरामध्ये सुध्दा आपल्याकड मोठया प्रमाणात कारखानदारी आहे, अनेक व्यावसायीक आपल्याठिकाणी आहेत. मुळातच आपल्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये संपुर्ण देशभरातून लोक राहीला आलेले आहेत आणि पुढच्या काळामध्ये सगळयात मोठया प्रमाणात लेबर प्रॉब्लेम होणार आहे, रॉ-मटेरीएलचे प्रॉब्लेम होणार आहेत. त्यामुळे सगळयाच व्यावसायावरती त्या निमीत्ताने अडचणी निर्माण होणार आहेत. त्याच्यामुळे उदयाच्या काळामध्ये आपलं जे अपेक्षीत उत्पन्न आहे ते अपेक्षीत उत्पन्न सुध्दा भेटणार आहे. आणि या निमीत्ताने आपल्याला खुप मोठे चॅलेंजेस येथून पुढच्या काळामध्ये आपल्या संपुर्ण यंत्रणेवरती येणार आहे. त्यादृष्टिकोनातून आपल्याला खर म्हणजे पुढे बजेटची मिटींग आहे त्याच्यावर अधिक खोलात या विषयावर बोलेल. परंतु आयुक्त साहेब आपल्याला आपल्या शहरात राहणारे नागरीक, विशेषतः आपल्या इथे कामगार संख्या मोठया प्रमाणावर आहे. माझी आपल्या सगळयांना विनंती आहे की सत्ताधारी पक्ष असेल किंवा विरोधी पक्षाच्या लोकांना विनंती आहे की आपल्याला आपल्या इथे राहणा-या नागरीकांना वेगळया पध्दतीत सुट देण्याच काम किंवा सवलत देण्याच काम येथून पुढच्या काळामध्ये कराव लागेल कारण आपण टॅक्स किंवा इतर माध्यमातून जो काही पैसा नागरीकांकडून गोळा करत असतो तो गोळा करण्यासाठी खुप अडचणी निर्माण होणार मुळात नागरीकांच्याच खिशात पैसे असणार नाही. त्याच्यामुळे या निमीत्ताने माझी प्रशासनाला आणि संपुर्ण सभागृहाला विनंती आहे की यादृष्टिकोनातून आपल्याला थोडासा वेगळया प्रकारे विचार करुन माणुसकीने आपल्याला त्याठिकाणी तशाप्रकारच्या सुटी येथून पुढच्या काळामध्ये दयाव्या लागतील. दुसरा मुद्दा असा आहे की आपले वायसीएम आणि इतर जे हॉस्पिटल्स आहेत त्याठिकाणी पेशंट ऍडमीट करतो आणि तीथ ऍडमीटेड पेशंटना ट्रिटमेंट देण्याच काम आपल वैदयकीय डिपार्टमेंट असेल किंवा त्यांना सहकार्य करण्यास सगळे डिपार्टमेंट काम करतात परंतु याच्यामध्ये त्रुटी राहून गेलेली आहे. वायसीएम मध्ये काम करणा-या माणसाला त्याठिकाणी काही दिवसाची सुटी दिली जाते

परंतु इतर हॉस्पिटलमध्ये लोक, डॉक्टर्स व त्यांचा स्टाफ काम करतो त्यांना कुठल्याही प्रकारची ऍडीशनल सुट्टी दिली जात नाही. हा कुठेतरी त्यांच्यावरती अन्याय होतो. माझी विनंती आहे की याच्यावर सुध्दा विचार करावा आणि वायसीएम असेल किंवा इतर हॉस्पिटल सगळयांनाच सारखा न्याय आपण इथून पुढच्या कालावधीमध्ये दयावा. आपल्याला इथून पुढच्या काळामध्ये वैदयकीय डपार्टमेंट वरती अधिकचा खर्च करावा लागणार आहे. त्यादृष्टिकोनातून आपण इथून पुढच्या काळामध्ये आपल्याला बजेटमध्ये चेंजेस करावे लागतील अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करतो. अधिक न बोलता पुन्हा एकदा आयुक्तांच आणि त्यांच्या सर्व टिमच, सर्वच नगरसेवकांच आणि ज्या ज्या एनजीओनी आपल्या शहरातल्या लोकांना मदत केली त्यासाठी त्यांच आभार मानतो आणि ज्या स्टाफनी मग वैदयकीय डिपार्टमेंट असेल, पोलीस असतील, सफाई कर्मचारी असतील त्या सगळयांच मी मनापासून अभिनंदन करतो आणि आभार मानुन थांबतो.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा अभिनंदनाचा ठराव आदरणीय पक्षनेते नामदेवरावजी ढाके यांनी मांडलेला आहे त्यामुळ त्यांच मी मनापासून अभिनंदन करतो. देशभरामध्ये कोरोनाच संकट फैलावल आहे. गेले तीन महीने आपण एका भीतीच्या वातावरणामध्ये आपल जीवन जगत आहोत. आपणच नव्हेतर सर्व देश या पध्दतीने जीवन जगत आहे. आयुक्त व त्यांचा सर्व स्टाफ, पोलीस असतील त्यांचा सर्व स्टाफ, आरोग्याचे कर्मचारी व त्यांचा सर्व स्टाफ व इतर या कोरोना-१९ मध्ये ज्यांनी ज्यांनी सहकार्य केलं त्यांच मी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वतीने मनापासून अभिनंदन करतो, त्यांच खुप मोठ कौतूकही करण्याची गरज आहे तरी मी सर्वांच्या वतीने त्यांचे कौतूकही करतो. अजीत गव्हाणे यांनी सांगीतल आहे की पुण्यापेक्षा आपण खुप चांगल्या पटीने आपली यंत्रणा राबवित आहोत. आपली सर्व टिम कोव्हीड-१९ च्या माध्यमातून सक्रीयने अगदी चांगल्या पध्दतीने काम करत आहे. त्यात काही सुधारणाही करण्याची गरज आदरणीय अजीतभाऊनी सांगीतली आहे. परवा आदरनीय पालकमंत्री अजीतदादा पवार साहेब सुध्दा याठिकाणी आलेले होते त्यांनीही काही सूचना केलेल्या आहेत. पिंपरी चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या पाहता जो टेस्टींगचा लॅब आहे तो वायसीएम किंवा इतर ठिकाणी करणं आणि ताबडतोब करणं गरजेच आहे. याला कारणही असं आहे की खरंतर हाळूहाळू लॉकडाऊन आता उठत चाललेल आहे. लोक रस्त्यावर यायला लागलेली आहेत. संसर्ग हा शंभर टक्के वाढलेला आहे असं तज्ञांच मत आहे. जस लॉकडावून कमी कमी होऊ लागल तसतशी पेशंटची संख्या ही वाढत चाललेली आहे. म्हणून सावधगीरीचे पाऊल म्हणून आपल्याला आपले हॉस्पिटल चांगले ठेवणे, त्याची

टेस्टींग आपल्या ठिकाणीच जर झालीतर आता सध्या येणारा उदयाचा काळ हा पावसाळा आहे. कोणाला सर्दी, थंडी, ताप, खोकला हे होण्याची शक्यता आहे. जरी सर्दी, ताप, खोकला जरी आलातरी तो कोव्हीड आहे की काय अशा संशयान त्याच्याकडे बघीतल जाणार आहे आणि त्याची टेस्ट होण्याची शक्यता आहे. म्हणून आयुक्त साहेब आता आपल्याला याची खुप काळजी घेणं गरजेचे आहे आणि त्या पध्दतीने ती घ्यावी अशी मी आपल्याला विनंती करतो. शहरामध्ये अनेक एनजीओनी, महानगरपालिकेच्या वतीने चांगल शहर आपल्याकडे ठेवण्यात आलेले आहे व तसं कोणालाही उपाशीपोटी रहाव लागलेल नाही. सन्मा.नगरसेवक असतील, एनजीओ असतील प्रत्येकानी आपआपला प्रभाग, आजुबाजूचा परिसर हा काहीना काही पध्दतीने स्वत:च्या खिशातून टाकून आणि महानगरपालिकेच्या माध्यमातून जी काही जेवणाची सोय केली होती ती चांगली होती, आता ती का बंद केली हे आम्हांला माहीती नाही. जरी आपण म्हणत असू की बाहेरच्या राज्यातील लोक गेली पण आपल्या येथील सुध्दा अजून काही लोक असे आहेत की ज्यांना आज एक वेळच जेवण सुध्दा करणं मुश्किल आहे. कारण आज हातावरची पोट भरणारी लोक आहेत. भाडेकरुच प्रमाण मोठ आहे. तुम्ही जेवणाच जे काही किचन ठेवल होत, आम्ही प्रस्ताव पण दिलेला होता की सेंट्रलाईज एखाद मोठ किचन चालू ठेवा. ज्या ज्या प्रभागामध्ये ज्यांना ज्यांना कोणाला तीथ रहायच मग त्यांना तीथन ते जेवण संस्थानी आपआपल्या परिसरामध्ये नेलतर मला वाटत चांगल होईल. तरी हे करणं पण गरजेच आहे. तुम्ही एका दिवशी फोन केल्यानंतर सगळया खानावळी बंद असं एक चित्र आपल्या शहरामध्ये दिसायला लागलेल आहे. म्हणून माझी विनंती आहे की प्रभागवाईज जरी किचन केलतरी चालेल. आपले जे आठ प्रभाग आहेत आठ प्रभागात जरी त्या त्या ठिकाणी एक सेंट्रल किचन केलतरी त्या त्या परिसरातील लोकांना ते जेवण घेवून जाण्यास सोईस्कर होईल. स्लम ऐरीया खुप मोठा आहे, स्लम मधील लोकाना आता काम नाहीत. गोरगरीब लोकांना काम नाहीत, कारखानदारी ब-यापैकी बंद आहे. असं असताना आपण हे जे किचन आहे ते राबवलतर नक्कीच चांगल होईल. दुसरी माझी सुचना अशी आहे की या वर्षी राज्यानी आम्हांला जो काही मुळ मालक आहेत ज्यांच्या खोल्या आहेत त्यांनी भाडेकरुकडून भाड घेवू नये अशी एक सूचना राज्यशासनाने काढलेली होती. माझी आपल्याला विनंती आहे की या महानगरपालिकेच्या करंसकलन विभागाला या तीन चार महीन्यामध्ये जो काही सगळयांचाच लॉस झालेला आहे. कारखाने बंद आहेत, भाडेकरु कोण भाडे दयायला तयार नाहीत असं असताना आपण या तीन ते चार महीन्यांचा किंवा सहा महीन्याचा प्रॉपर्टी टॅक्स जर माफ करता आपल्याला आलातर, सत्तारुढ पक्षनेते आपल्यालाही विनंती आहे की शहरा

मधली ही परिस्थिती पाहता असा प्रस्ताव आपण जर समोर आणलातर नक्कीच आपण याच्यावर विचार करावा. जर घरमालकानी याच भाड घेवू  नये तर आम्ही आपल्याला विनंती करतो की आमच्याही मुळ मालकांचा टॅक्स कोणीही घेवू नये, असा प्रस्ताव आपल्या समोर मांडतो. पुन्हा एकदा या कोव्हीड-१९ मध्ये ज्यांनी ज्यांनी मदत केली त्या लोकांच मी मनापासून त्यांच खुप खुप आभार मानतो, धन्यवाद.

**मा.सुजाता पालांडे -**  मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता हा मांडलेला ठराव खरोखरच अभिनंदनीय आहेच, स्तुत्य पण आहे. कारण आम्ही या दिड ते दोन महीन्यामध्ये जे काम प्रशासनाच पाहतो ते गेल्या तीन वर्षामध्ये पाहील नव्हतं. आयुक्त असतील, अति.आयुक्त (१),(२) असतील, पुर्ण प्रशासन असेल, एक्झिक्यूटीव्ह असतील, डेप्युटी असतील, जे.ई. असतील, क्लार्क असतील सर्व चतुर्थश्रेणी कर्मचारी असतील या सगळयामध्ये आरोग्याचा पीसीएमसीत सगळयात मोठा वाटा आहे. यामध्ये जे आरोग्यरक्षक आहेत म्हणजे एसआय असतील, स्लममध्ये काम करणारी लोक असतील, ड्रेनेजची लोक असतील या सगळयांचे मनापासून मी अभिनंदन करते, मनापासून आम्ही पीसीएमसीवासीय आभार व्यक्त करतो. आज कोव्हीडच महामारीच संकट आपल्यावर कोसळलं त्यावेळेला पीसीएमसी नगरसेवक असतील त्याच बरोबर पीसीएमसीमधील सर्व नागरीक असतील त्या सगळयांनी आपल्याला मदत केलेली आहे, त्यांचही मी मनापासून आभार मानते. पोलीस प्रशासनाच आभार मानते. अगदी एनजीओस ज्यांनी ज्यांनी काम केलेल आहे ते इस्कॉन असेल, या सगळया एनजीओचे मी आभार मानते. पण त्याच बरोबर या सगळया महामारीच्या संकटावर सगळयात मोठ तोंड देतात ते म्हणजे आपल्या रुग्णालयातील आपला वैदयकीय स्टाफ. मला वाटते जेव्हा हा वैदयकीय स्टाफ काम करतो तेव्हा त्यांच्यासाठी पण काही काम करणं हे आपल उत्तरदायित्व आहे. आयुक्त साहेब मी त्या दिवशी पण एक लेटर तुम्हांला दिल होतं. की जे वायसीएम मधले डेड हाऊस आहे त्यामध्ये तुम्ही टिम एक्स्ट्रॉ करा ती तुम्ही अजूनही केलेली नाही. कोरोनाचा पेशंट तीच लोक बांधतात, कोरोनाच्या पेशंटच्या तीच लोक अंन्त्यसंस्काराला जातात, कोरोनाच्या पेशंटची सगळी उत्तरदायित्व जसं काही अन्त्यसंस्कारापासून सगळ डेड हाऊसमधल्याच लोकांकड दिलय. पण ते करत असताना डेड हाऊसमधील नॉर्मल डेड बॉडया ज्या येतात त्या लोकांच पीएमच काम सुध्दा तीच लोक करतात. त्यांच्या डेडबॉडया बांधण्याच काम सुध्दा तीच लोक करतात. त्यांच्यावर एवढा ताण आहे तो ताण कमी करण्यासाठी आपल्याला काम कराव लागेल. कारण त्या दिवशी मी डेड हाऊसमध्ये गेले होतेतर डेड हाऊस मध्ये २५ डेडबॉडया आणि नॉर्मल डेडबॉडया होत्या त्याच

बरोबर त्याच दिवशी जी पीसीएमसीला बातमी लागली नागेशची त्यादिवशी तो माणूस १२० किलो वजनाच्या कोरोनाच्या बॉडीला कोणीही हात लावत नव्हते आणि ती लोक काम करत होते. तरी आपल्याला त्यांचाही विचार करावा लागेल. शासनाचा असा जीआर आहे की मानधनावर काम करणारा जो स्टाफ आहे त्यांनी काम करायच त्यांनी काम केल नाहीतर त्याच्या जागेवर तुम्ही आपली जी परमनंन्ट लोक आहेत त्यांना तुम्हांला दयायच आहे. आज आपण कोव्हीडच्या सुट्टया सुध्दा त्या लोकांना देत नाहीत. एक पीपीई कीट देतो पण ते पीपीई कीट दिवसभर वापरल्यानंतर त्या बीचा-यांची जी आतमध्ये परिस्थिती होते ते सुध्दा त्यावेळेला अतीशय दु:ख होतं. दोन दिवसापुर्वी कोव्हीडच्या डिपार्टमेंटमध्ये ते पेशंट जीथे ठेवले तीथे जाण्याचा योग आला. मी खरोखर त्या सर्व डॉक्टर्सच त्या सर्व स्टाफच, मानधनावर काम करणा-या सगळया लोकांच ही जी साडेतीनशे लोक आहेत त्यांच सगळयात जास्त मनापासून मी आभार मानेल कारण की सगळयात जास्त ती लोक काम करतात. साहेब, तुम्हांला त्यांचाही विचार करावा लागेल. त्यांच्या सुट्टया का वेळेवर दिल्या जात नाहीत. त्यांना देण्यात येणा-या फॅसिलीटी व्यवस्थित दिल्या जातात का. त्यांच्याकडे का भेदभाव होतो याचा सुध्दा तुम्हांला विचार करावा लागेल. आता पाच मिनीटापुर्वी एक व्हीडीओ आला वायसीएम रुग्णालयाच्या बाहेर एक आंदोलन चालू आहे. रेसिडेन्सी आहेत त्यांच्यासाठी मानधन जे आहे त्यात वाढ करावी असा त्यांचा एक विषय आहे. माझी आपल्याला विनंती आहे की आपल्याला या विषयाकडे गांभीर्याने बघाव लागेल. तुम्हां सर्वाच अभिनंदन आहे, सर्व नगरसेवकांचही अभिनंदन आहेच. सर्व लोकांच पण अभिनंदन आहेच. मला वाटतय हे करताना काही गोष्टी आपल्याला खरोखर लक्षात घ्याव्या लागतील. आता काका सानेनी ज्या पध्दतीने आपल्याला सांगीतल की खरोखर आपण किचन बंद केले आहेत किंचन थोडेसे उशिरा बंद करायला पाहीजे होते. काही किचन चालू आहेत. माझी सहकारी उषाताई मुंढे यांच्याकडच किंचन चालू आहे. ५४ किचन आपण चालू केले होते. आज माझ्या फुलेनगरमध्ये परवाच्या दिवशी जेव्हा कोव्हीडचा एक पेशंट सापडला तेव्हाच दु:ख काय असेल, त्याच्या चेह-यावरची भिती काय असेल हे आम्ही त्यादिवशी पाहील आहे. ती जी भिती असतेना ती आज सगळया माझ्या फुलेनगरमधे पाहीली आहे. आज एका पेशंटसाठी ८१ जणांना होमक्वॉरंटाईन आणि ९ जणांना क्वॉरंटाईन केलं. मला मनापासून तृप्ती सांगळे असतील, आपले डॉ. रॉय असतील, डॉ.वाबळे असतील, डॉ.पवन सावळे असतील यांच मला मनापासून आभार मानायचे आहेत. ज्या पध्दतीन फुलेनगरमध्ये या चार दिवसात काम ते करतात त्याठिकाणी कोव्हीडचा पेशंट सापडला तीथ मी एकदाच गेले. पण आपले हे डॉक्टर्स असतील, आपला हा स्टाफ असेल,

आपली ही लोक असतील हे त्यादिवशी त्या पध्दतीने वेळोवेळी काम करतात. आज प्रशासनामध्ये खरोखर कौतूक कोणाच करायच असेलतर आमच्या अजीत पवार साहेबांच करायच आहे. अजीत पवार साहेबांकड ज्या पध्दतीने परमीशनच काम असो, किचनच काम असो, बाकीच कुठलही काम असो हे ज्या पध्दतीनी त्यांनी हॅण्डल केल आहे हॅण्डसॉप आहे. मी सुध्दा रोज त्यांना पन्नासवेळा त्रास देत असेल की साहेब हे झाल, साहेब ते झाल, हे झाल नाही, ते झाल नाही, असं झाल नाही तसं झाल नाही पण त्यांनी कधीही कपाळावर एकही अटी न देता त्या पध्दतीने काम केल आहे व असंच सगळ प्रशासन काम करतय. हे सगळ कौतूक चालू असताना वायसीएम मध्ये किंवा रुग्णालयामध्ये काम करणारी जी लोक आहेत त्यांचे जे प्रश्न आहेत ते आपल्याला मीटवावेच लागतील. याच्यामध्ये गांभीर्याने मा.महापौर आपण लक्ष दयाल एवढच मी बोलते आणि सर्वाच मनापासून आभार व्यक्त करते आणि इथेच थांबते, जयहिंद, जय महाराष्ट्र.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरोखरच संपुर्ण जगामध्ये कोरोनासारख्या आजाराने थैमान घातलेल असताना आपल्या संपुर्ण शहरामध्ये याठिकाणी आदरणीय आयुक्त, आदरणीय महापौर, अति.आयुक्त, सहा.आयुक्त, सर्व नगरसदस्य, आपले वैदयकीय अधिकारी, आरोग्य विभागाचे सर्व अधिकारी कर्मचारी आणि सर्वच पक्षाचे सर्व नगरसेवक यांनी खरोखरच लॉकडावूनच्या काळात जे कार्य केलेल आहे ते अतीशय वंदनीय असं कार्य याठिकाणी घडलेल आहे. आपण पाहतो शेवटी माणूसकी कुठही नसते ती आपल्या सर्वामध्ये दडलेली असते त्याच सुंदर असं दर्शन या कालखंडामध्ये आपल्या सर्वाच्या माध्यमातून घडलेल आहे. ही कामगार नगरी आहे आपणा सर्वाना माहीती आहे की या आजारपणामध्ये सर्वात जास्त हाल जर कुणाचे असतीलतर कामगार, मजूर, गरीब कामगार असतील, बांधकाम मजूर असेल या सर्वाच मोठया प्रमाणात झाले आहेत परंतु आपल्या शहराने मात्र ते आवाहन चांगल्या पध्दतीने, वेगळया पध्दतीने पेलल आहे. आताच आपल्या इतरही नगरसदस्यांनी आपल्या प्रशासनाच अतीशय मनोभावे असे याठिकाणी अभिनंदन केलेल आहे. खरोखरच या कालखंडामध्ये म्हणजे एक म्हण असायची की “पालीकेच काम आणि सहा महीने थांब” ही म्हण याच कालखंडामध्ये मला अस वाटत की खोटी ठरवलेली आहे आणि सर्वानीच जी जी काम आहेत ती चांगल्या पध्दतीने पार पाडलेली आहेत. सर्व नगरसदस्यांनी सुध्दा त्याठिकाणी आपआपल्या प्रभागामध्ये गरजू, गोरगरीब, कष्टकरी वर्गाला मग ते रिक्षावाले असतील, घरेलू कामगार असतील, बांधकाम मजूर असतील, ज्या कुटूंबामध्ये कर्ता माणूस वारलेला आहे किंवा दुर्धर आजाराने ग्रासलेले परिवार असतील अशा सुध्दा परिवाराला

अतीशय चांगल्या पध्दतीची मदत देण्याच कार्य घडलेल आहे. पालीकेच्या वतीने सुध्दा गोरगरीब जनतेला मास्क, सॅनिटायजर हे सुध्दा देण्याच चांगल काम केलेलं आहे. मगाशीच सांगीतल्याप्रमाणे डोअर टू डोअर तपासण्या करुन उपचार कसे देता येतील ते सुध्दा काम चांगल घडलेलं आहे. मला सभागृहाला सांगायला याठिकाणी आनंद वाटतो की वर्षानुवर्षे एक प्रलंबीत प्रश्न होता की किमान वेतन याठिकाणी मिळत नव्हतं. पण आदरनीय श्रावण हर्डीकर साहेबांनी, त्याचबरोबर वैदयकीय डॉ.रॉय सर आणि त्यांच्या संपुर्ण टिमनी ते त्याठिकाणी एप्रिल महीन्यामध्ये लागू केलं त्यांच मनापासून मी अभिनंदन व्यक्त करतो. तसेच आजून दुसरे पण क्षयरोगचे जे कर्मचारी आपल्याकडे २८ आहेत त्यांचा देखील किमान वेतनाचा प्रश्न या कालखंडामध्ये लवकरात लवकर तो सुध्दा मार्गी लावावा अशी मी आपणाकडे विनंती करतो आणि पुनश्च एकदा संपुर्ण आपल्या अधिकारी वर्गाच आणि पदाधिकारी वर्गाचा सर्वाच मी मनपुर्वक अभिनंदन करतो आणि आता जे आपण कार्य केलेलं आहे ते कार्य हीच पुजा समजून सर्वानी हे काम केलेलं आहे आणि म्हणून आपल शहर आपण चांगल्या पध्दतीने सुरक्षीत ठेवू शकलेलो आहोत. आज आपल अभिनंदन होत आहे त्यानंतर आपण रिलॅक्स होणं हेही तीतकस बरं राहणार नाही. तरी नक्कीच जे जे चांगले सजेशन्स याठिकाणी आलेले आहेत पुढच्या काळात अजून येतील त्यावर सुध्दा आपण काम करणं गरजेच आहे. कारण लॉकडावून आता ओपन होत चाललेल आहे. नियम, अटि, शर्ती शिथील होत चाललेल्या आहेत. लोक कारखान्यामध्ये जायला लागलेले आहेत त्याचबरोबर व्यावसाय सुरु झालेले आहेत या पार्श्वभूमीवर आपण अजून जागृक राहून आपल्याला काम करणं गरजेच आहे. त्या अनुषंगाने आपल्याला अजून चांगल्या स्टॅण्डर्ड ऑपरेटींग प्रोसीजरस कशा डेव्हलप करता येतील त्या अनुषंगाने सुध्दा आपण मार्गक्रमण कराव असं मला वाटत. मी आजच्या या अभिनंदनाच्या ठरावामध्ये पुनश्च एकदा आपल्या पालीकेच्या सर्व अधिकारी वर्गाच अभिनंदन करतो आणि थांबतो.

**मा.उषा मुंढे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. जगावर आलेल कोरोनाच्या महामारीच्या संकटामध्ये काम करीत असताना आयुक्त साहेब असतील, सर्व कर्मचारी असतील त्याच बरोबर डॉक्टर्स असतील, नर्स असतील, पोलीस असतील, शिक्षक असतील आणि सांगवी येथील जिल्हा रुग्णालयामधील डॉक्टर्स असतील त्याच बरोबर आपले सर्व पत्रकार बंधु भगिनी असतील, प्रत्येक बातमी ही प्रत्येक नागरीकांपर्यंत पोहचत होती. अशा महामारीच्या काळामध्ये काम करत असताना मी सर्वाच मनापासून खुप खुप अभिनंदन करते तसेच माझ्या सर्व सहकार्याचही अभिनंदन करते. कारण की कुठल्याही प्रभागामध्ये

कुठल्याही प्रभागामधला नागरीकाची उपासमारी न होता तो माणुस उपासी राहू नये यासाठी माझ्या सर्व सहका-यांनी आणि सर्व कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले त्या सर्वांना मनापासून खुप खुप शुभेच्छा देते आणि थांबते.

**मा.झामाबाई बारणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज अभिनंदनाचा ठराव मांडला आणि आपल्या शहरामधले जे कार्यकर्ते असतील, आपल्या देशामध्ये जे कोरोनाच संकट आलं परंतु आपल्या शहरामध्ये सर्व आपल्या अधिका-यांनी मग आयुक्त साहेब, पाटील साहेब, पवार साहेब, सर्व प्रभागामधले अधिकारी, पदाधिकारी प्रत्येकानी आपआपल्या वार्डामध्ये चांगले काम केलेले आहेत, अनेक संस्था, मंडळ असतील, गणपती मंडळाचे कार्यकर्ते असतील या सर्वांनी काम केलेले आहे त्यांचे मी प्रथम अभिनंदन करते. हे आलेले संकट दुर कस करण्यासाठी आयुक्त साहेबांनी पाऊल उचललेली आहेत. जिथ जिथ कोरोनाचे पेशंट सापडले आहेत त्या भागामध्ये लक्ष देवून काम केलेले आहे. मग वायसीएममधील डॉक्टर्स असतील, त्यांच्या हाताखालचा स्टाफ असेल, नर्स असतील, कर्मचारी वर्ग असेल, आरोग्याचा सर्व कर्मचारी वर्ग असेल कारण आरोग्याच्या लोकांनी सुध्दा आपल्या जीवाची परवा न करता काम केलेले आहे. कारण आपल्या मनामध्ये भीती असते की समोरुन येणारा आहे त्याच्या जवळून जायच का नाही पण आरोग्याचे हे लोक काम करत होते त्या लोकांनी आपल्या स्वतःच्या जीवाची परवा न करता दुस-याचा जीव कसा वाचेल यासाठी प्रयत्न केलेले आहेत. पोलीस कर्मचारी सुध्दा प्रत्येक रोडवरती, प्रत्येक चौकामध्ये, प्रत्येक वॉर्डामध्ये त्यांनी सुध्दा आपल्या जीवाची परवा न करता लोकांच्यासाठी काम केलेलं आहे अशा पोलीस वर्गाच सुध्दा मी याठिकाणी अभिनंदन करते. प्रत्येकांनी आपआपल्या वॉर्डामध्ये कुठलाही गोरगरीब उपाशी न राहता लोकांना मदत केलेल्या आहेत. प्रत्येक नगरसेवक, नगरसेवकांनी आपआपल्या पध्दतीने मदत केलेली आहे. ही मदत करणे गरजेच होतं कारण आपल्या समोर लोक उपाशी रहात होती. आज हे संकट असं होत की खरच या संकटावेळी मदत करणे गरजेच होतं. मी आपल्या सर्वांच याठिकाणी अभिनंदन करते आणि ज्या काही आपल्या त्रुटी आहेत, पिंपरी चिंचवड शहरामध्ये ज्याची खरोखर आवश्यकता आहे ते त्या त्याठिकाणी उपलब्ध कराव. कारण या संकटाची अजून प्रत्येकाच्या मनामध्ये भीती आहे. हे ठिक व्हायला मलातर वाटते अजून तीन चार महीने लागतात की काय, काही सांगता येत नाही. आपण सुध्दा लक्ष दिल पाहीजे की गर्दी कशी कमी करता येईल. आपण आता दुकान चालु केलेले आहेत परंतु गर्दि वाढायला लागलेली आहे. या गर्दीमधुन अजून आरोग्याचा आणि

कोरोनाचा प्रभाव वाढणार आहे. आपण याठिकाणी लक्ष दयाव व पुन्हा एकदा आपण चांगल्या पध्दतीने काम केलेले आहे त्याबद्दल आभार मानते.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. जो काही नामदेव दादानी विषय मांडला त्यांच अभिनंदन. निश्चित अत्यंत कौतूकास्पद हा विषय आहे. मला वाटते मार्च महीन्याच्या ११ तारखेला पहीला पेशंट सापडला आणि तीथून आपली सुरवात झाली. असं वाटल की वाढेल की नाही, वाढेल की नाही पण बघता बघता आपल्याकडे थोडस वाढल आणि पुन्हा एकदा प्रशासनाच्या चांगल्या कामानी त्याच्यावर नियंत्रण मिळवण्यामध्ये अत्यंत महत्वाच यश याठिकाणी आल होतं. मग त्याठिकाणी आयुक्त साहेब असतील त्यांना साथ देणारी त्यांची टिम असेल त्यांचेबरोबर आमचे महापौर असतील, पक्षनेते असतील या सगळयांचेच एकत्रीत परिश्रम त्याठिकाणी कामाला आले. महाराष्ट्रात पिंपरी चिंचवड मध्ये कोरोनावर अटकाव करु शकलो. त्याच्यामुळे निश्चितपणे आपल्या सगळयांच मनापासून कौतूक. हे यूध्द काही छोट नाही, चर्चेतून लोक म्हणायचे की यासाठी दोन महीने जातील असं वाटायच की एक ते दोन महीने खुप झाले. परंतु आज बघता बघता मार्च, एप्रिल, मे, आज मे संपला आणि जूनला सुरवात झाली.  परंतु या पुढच्या काळामध्ये देखील हा कोरोना वाढणार आहे. त्यामुळ साहेब, आता तुम्ही न थकता तुम्हांला याच्यावरती काम करायच आहे. त्यामुळे तेवढी ताकद आपल्यामध्ये सगळयांच्या कौतूकामुळे येणार आहे अशी याठिकाणी अपेक्षा व्यक्त करते. सगळयात महत्वाच तुम्ही जे ॲप डेव्हलप केलेलं आहे, तुमच्या मुलाखती ऐकतोत, खरच त्या काळात तुम्ही जे जे काम करतात ते अत्यंत कौतूकास्पद आहे. मग आपले येथे पास देण्याची सिस्टीम जी आहे ती अत्यंत कौतूकास्पद आहे, आम्ही सांगायचो की मला एवढे एवढे पास करुन पाहीजे आणि ते पास मिळायचे. आम्ही या काळामध्ये आमच्या कार्यकर्त्यांना काय दिलंतर ख-या अर्थाने आम्ही सगळयाच नगरसेवकांनी निश्चितपणे आम्ही आमचे कार्यकर्ते त्याठिकाणी कामाला लावले पास मिळाल्यानंतर ते समाधानी व्हायचे आणि म्हणायचे आशाताई तुम्ही आम्हांला पास काढून दिला. परंतू त्याठिकाणी आमचे कार्यकर्ते काम करत असताना त्यांचा जीव खुप मोठा धोक्यात असताना त्यांनी फक्त समोरच्यांची गरज भागविण्यासाठी, तहान किंवा भूक भागविण्यासाठी आमचे कार्यकर्ते सुध्दा तीतकेच रस्त्यावर आले. परंतु त्याचवेळेला प्रशासनाने जी काही आम्हांला मदत केली तीही तीतकीच कौतूकास्पद आहे. त्याचबरोबर जेवण वाटपाची जी काही इस्कॉनची सिस्टीम असेल त्याच्यामध्ये बजरंग दलाचे कार्यकर्ते, विश्व हिंदु परिषदेचे कार्यकर्ते असतील, अनेक मंडळ असतील, काळभैरव उत्सव कमिटी असेल, मार्शल सारखी कंपनी अशा अनेक कंपन्यांनी अनेक एनजीओनी

त्याठिकाणी जेवणासाठी मदत केली. इथे सगळयांचाच नामोल्लेख करणं शक्य नाही. परंतु खरच ज्यांनी ज्यांनी काम केल त्या सगळयांच याठिकाणी कौतूक करते. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब तुम्हांला विनंती करते की आपण त्या कंपनीकडे, त्या एनजीओकडे गेलं पाहीजे, एक शाल, एक श्रीफळ आपल्याला काही महाग नाही. परंतु त्यांनी त्या काळात केलेल परिश्रम आहेत त्यामुळे आपण आपल्या वतीने त्यांना ते देणं लागतो किंवा कर्तव्याचा भाग आहे असं मला वाटते. कारण त्यांनी कोणतीही आशा किंवा अपेक्षा न ठेवता आपल्याला मदत केली आहे आणि म्हणून कोव्हीडच्या काळामध्ये अत्यंत गरीब माणसाच्या तोंडापर्यंत, मुखापर्यंत अन्न पोहचविण्याची व्यवस्था आपल्या सगळयांना करता आली. त्याच्यामध्ये त्यांचाही तीतकाच मोठा हात आहे म्हणून त्यांच आभार फुल ना फुलाची पाखळी देवून मानन आपण लागतो. तरी याला फार उशिर न करता पुढच्या आठवडाभरामध्ये हे आपण कराव असं मला वाटतय. कारण मी माझ्याकडे असलेल्या कंपनीच केल आहे. परंतु सगळया शहरात जर केलतर त्यांच्यामध्ये सुध्दा आनंद, समाधान मिळत तो आनंद, समाधान आपण त्यांना प्राप्त करुन देवू शकतो. त्याच बरोबर महत्वाचा विषय मगाशी बोलता बोलता बोलले की वायसीएम आणि भोसरी आम्हांला त्यात जायच नाही परंतु तुम्ही एक गोष्ट लक्षात घ्यावी की सगळयांना समान न्याय मिळाला पाहीजे. कारण काम करणारे कर्मचारी जर मी असेल आणि मला जर वायसीएमला काम करत असताना सुट्टी मिळते आणि भोसरीला काम केल्यास सुट्टी मिळत नाहीतर निश्चितपणे माझ्या कामाचा ओढा कुठेतरी फक्त वायसीएमला असणार आहे. या टेक्निकली गोष्टी आपल्या निदर्शनास आणुन देण्याचा हा प्रयत्न आहे. यात टिका वगैरे या गोष्टीचा अजीबात विचार करु नका. सांगण्याच तात्पर्य एवढ आहे की याच्यावर आपण लवकरात लवकर सोल्यूशन काढल पाहीजे. दुसरा एक महत्वाचा विषय म्हणजे कोव्हीड पॉझिटीव्ह पेशंट तुमचा ज्याठिकाणी असतो त्याठिकाणी त्यांच्या घरातील लोकांना आपण क्वॉरंटाईन करतो आणि ती गल्ली क्वॉरंटाईन करतो. त्याठिकाणी कचरा टाकताना त्या कुटूंबातील लोक सुध्दा बाहेर येतात आणि वारंवार आम्हांला वॉर्डातील नगरसेवक असल्यामुळे वारंवार फोन करन आम्हांला सुध्दा जड जातं. त्याठिकाणी कर्मचा-यांची नेमणूक होत नाही. किंबहूना अस केल पाहीजे की त्या कुटूंबातील माणस यांनी शक्यतो घराबाहेर येवू नये या दृष्टिकोनातून जर वाटचाल केलीतर होणारा प्रादुर्भाव रोखण्यास आपल्याला निश्चितपणे चांगल्या प्रकारची मदत त्याठिकाणी झाल्याशिवाय राहणार नाही. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, येथून पुढे १५ जूनला सगळयात महत्वाचे आमची शाळा सुरु होत आहे. आपण नेटवर किंवा ऑनलाईन शिक्षणाची पध्दत अवलंबावयाची आहे तर पालिकेच्या शाळांसाठी आपण काय

करणार आहात याच्यासाठी आपल्याला या पुढच्या पंधरा दिवसामध्ये चांगल्या प्रकारच नियोजन निश्चितपणे कराव लागेल. कारण गोरगरीबांची मुल आहेत त्या मुलांकडे लॅपटॉप असेल कि नाही, त्यांच्याकडे यंत्रणा असेल की नाही मग मोबाईलवर कितपत दयायच जे काही तुम्हांला करायच असेलतर ते एचएम लोकांना सगळयांना बोलावून त्याच्यावर वर्कआऊट कराव लागेल. लोकांनी मधल्या काळात शाळा सुरु केल्या मग त्यांनी ते सगळ ऑनलाईन टाकायला सुरवात केली मग आपल्याकडे असणा-या गरीबांच्या मुलांकडे त्या सगळया यंत्रणा आहेत का नसतीलतर काय कराव लागेल. जे काही तुम्हांला नियोजन करायच आहे त्याच्यावर निश्चितपणे तुम्ही वर्कआऊट कराव अशी याठिकाणी अपेक्षा व्यक्त करते. पुनश्च एकदा सगळया नगरसेवकांच, प्रशासनाच, सगळया कार्यकर्त्यांच आभार मानते. कच-याची गाडी चालवतात ते लोक सध्याच्या कंडीशनला फक्त मास्क लावतात त्यांच्यासाठी काहीतरी करणं लागतं. त्यांना पीपीई कीट देत नाहीत, त्यांना गरम होईल सगळ मान्य आहे पण त्यांच्यासाठी काय करता येईल हे पाहील पाहीजे. कारण की दोन्ही साईडनी दहा ते पंधरा लोक कचरा टाकतात. तरी त्यांना काय देता येईल हॅण्डग्लोज चांगल्या प्रकारे देता येतील का हे पाहीले पाहीजे. आपण कोव्हीडच्या महामारीमुळे फार मोठया प्रमाणात आरोग्यावर खर्च करतो त्याबाबत आमच काही म्हणणं नाही परंतु त्याच बरोबर जे हे गरीब लोक आहेत, असे काम करणारे कर्मचारी आहेत यांच्यावरती सुध्दा तीतक्याच चांगल्या प्रकारे खर्च करुन त्यांच आरोग्य सुध्दा अबाधित राहण्यासाठी आपण शंभर टक्के पाऊल उचलली पाहीजेत एवढ सांगून थांबते, जयहिंद, जय महाराष्ट्र.

**मा.बाबासाहेब त्रिभूवन -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज आपण कोव्हीड योध्दयाना धन्यवाद देण्याचा ठराव करतो आहोत. तस बघीतलतर आपल हे शहर पुणे आणि मुंबईच्या जवळ असणार आपल शहर. पुण्यामध्ये आणि मुंबईमध्ये महाराष्ट्रात सर्वात जास्त रुग्ण. त्या मानाने आपण रुग्ण संख्या कमी करण्याच काम सगळयांनी मिळून केलेल आहे त्याबद्दल मी मा.आयुक्त साहेब, सर्व पोलीस कर्मचारी सर्व डॉक्टर्स, परिचारीका, आरोग्य कर्मचारी, शहरातील एनजीओ आणि सर्व टिमचे अभिनंदन करतो आणि धन्यवाद देतो.

**मा.संतोष लोंढे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. संपुर्ण जगाला व आपल्या भारत देशाला भयभीत करणा-या या महामारीने जी सुरवात केली त्या चीन देशाचा मी प्रथमतः त्यांचा निषेध करतो. कारण की या महामारीची सुरवात त्यांच्यापासून झालेली आहे. अगदी तीन ते चार महीने आज आपण सामोरे जात आहोत. आज आपल्या

महाराष्ट्रामध्ये त्यातून पिंपरी चिंचवड शहरामध्ये वास्तविक पाहता परिस्थिती सुधारत चाललेली आहे. पण ख-या अर्थाने या महामारी बरोबर आपल्याला पुढील किती दिवस रहायच आहे याची कुणालाही शाश्वती नाही. आपल्या देशाचे पंतप्रधान मा.नरेंद्रभाई मोदींनी गेल्या तीन महीन्यापासून सर्व देशाला संबोधित केलेल आहे, एक दिलासा दिलेला आहे. या महामारीला न घाबरता आपण त्याच्या बरोबर जगायला शिकायच. सुरक्षीत डिस्टन्सिंग ठेवून प्रत्येक नागरीकाना त्याच्या ज्या त्या गोष्टी प्रामुख्याने जतन करायच्या याच्या बाबत विश्लेषण केल. आपल्या शहरामध्ये मा.आयुक्त असतील, मा.अति.आयुक्त असतील त्याच प्रमाणे सर्व सन्मा.सदस्यांच्या माध्यमातून या कोव्हीड १९ च्या बाबत प्रत्येकानी गेले दोन ते तीन महीन्यापासून जे अपार कष्ट केले त्याच्यामध्ये आमच्या शहराचे भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष मा.महेशदादा लांडगे त्याच प्रमाणे आमचे दुसरे मार्गदर्शक आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांनी आयुक्त साहेबांशी वारंवार विश्लेषण केलं त्याबाबत गेले आठ ते दहा दिवस त्याचा आढावा घेतला. त्या आढाव्याच्या माध्यमातून त्यांच्या ज्या सुचना असतील त्याच्या माध्यमातून आपण एक चांगल धोरण आखल. त्याच्यातूनच आपल्या या शहराला या कोरोनाच्या विळख्यातून बाजूला करण्याच काम ख-या अर्थाने आपण सर्व सन्मा.सदस्यांनी, सर्व पदाधिका-यांनी आणि सर्व प्रशासनानी केलेल आहे याच्यामध्ये त्यांचा प्रत्येकाचा हातभार लागलेला आहे. पुढील काळासाठी आपल्याला याच्या बरोबर रहायच आहे त्यासाठी आपल्या सर्वांना सर्व गोष्टी ज्ञात आहेत. पत्रकारांच्या माध्यमातून त्याची प्रसिध्दी केली जाते की या कोरोनाला रोखायच असेलतर आपण सोशल डिस्टन्स पाळल पाहीजे. गर्दीच्या ठिकाणी जास्त एकत्रीत येता कामा नये. अशा विवीध गोष्टी साठी आपण कटिबध्द रहायला पाहीजे. याठिकाणी सर्व सन्मा.सदस्यांच्या वतीने आयुक्तांनी, वैदयकीय विभागानी, आरोग्य विभागानी जे प्रामुख्याने चांगल काम केलेलं आहे. तसेच जे अन्नधान्याच काम म्हणजे परराज्यातील नागरीक आज आपल्या या पिंपरी चिंचवड मिनी इंडीयामध्ये राहतात त्यांच्या जवेणाचा विषय मोठा झाला होता त्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमातून आणि अनेक एनजीओच्या माध्यमातून गेले दोन महीने त्यांना अन्नदान पुरवण्याच काम ख-या अर्थाने एक मदतीच काम झालेलं आहे. कारण की आता परराज्यातला नागरीक त्यांच्या राज्यामध्ये गेल्यावरती ख-या अर्थाने तो म्हणतो की आमच्या राज्यापेक्षा महाराष्ट्र राज्यात खुप चांगल होत आणि त्यातून पिंपरी चिंचवड शहर खुप चांगल होतं. कारण की आम्हांला दोन ते तीन महीन्यामध्ये कुठलीही उणिव भासली नाही. आम्हांला त्याठिकाणी अन्नापासून कोणी वंचित ठेवू शकले नाही. आज अति.आयुक्त अजीत पवार साहेब असतील त्यांचे माध्यमातून प्रत्येक

सदस्याला त्यांनी मोलाची मदत केलेली आहे. बजाज कंपनीच्या माध्यमातून एक होमीओपॅथीची मेडीसीन त्याठिकाणी स्लम ऐरीयामध्ये देण्यात आलेली आहे. त्याच्यातून त्याची इम्यूनिटी वाढविण्याचा ख-या अर्थाने तो प्रयत्न झालेला आहे. असो मी माझ्या वतीने प्रशासनाच, मा.श्रावणजी हर्डीकरांच विशेषत: आभार व्यक्त करतो, त्याचप्रमाणे आमचे दोन्ही आमदार यांचेही मी मनापासून आभार व्यक्त करतो त्यांच्या सल्ल्यानुसार आम्हांला याठिकाणी काम करण्याची एक चांगली संधी मिळाली आणि त्यातून लोकांची सेवा झाली एवढ सांगून याठिकाणी मी थांबतो, जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.राजू बनसोडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आयुक्त साहेब मी तुमच मनापासून अभिनंदन करतो. तसेच अति.आयुक्त (१) व (२) तसेच वायसीएमचे डॉ.वाबळे सर, डॉ.साळवेसर, तसेच डॉ.अंबेकर मॅडम तसेच प्रशासनाच्या सर्व अधिका-यांच मी मनापासून अभिनंदन करतो. माझ्या वतीने मी सलाम करतो. खरच पिंपरी चिंचवडची चांगल्या प्रकारे परिस्थिती हाताळली त्याबद्दल मी त्यांच मनापासून अभिनंदन करतो. काकांनी सांगीतल की आपण आपल्या भागामधली कॅण्टीन बंद केलेली आहे. पिंपरी चिंचवड शहरामध्ये ब-याचशा झोपडपट्टया आहेत. आज बरेचसे गरीब, निराधार, गरजू लोक आहेत की ज्यांच हातावर पोट आहे. अजून पण त्यांचे काम सुरु झालेले नाहीत. आज आपण कॅण्टीन बंद करुन त्यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली आहे. आयुक्त साहेब मी तुम्हांला विनंती करतो की पुन्हा कॅण्टीन सुरु करावी. दुसरी गोष्ट कोरोनानी जगामध्ये थैमान घातलेल असताना पिंपरी चिंचवड मधली परिस्थिती आपण चांगल्या प्रकारे हाताळली आहे. आयुक्त साहेब, तुम्हांला मी विनंती करतो की जलपर्णी काढण्याचा ठेका एका ठेकेदाराला दिलेला आहे. आज महीना झाला आपण लोकांना सांगतो घरी बसा. आज स्लम ऐरीयामध्ये १० ते १२ फुटाचे घर आहेत आज ते लोक घरात बसुन बसून किती दिवस बसणार व त्यात त्या मच्छराचा एवढा प्रादुर्भाव झालेला आहे की घरात बसणे मुश्किल झालेलं आहे. आज तातडीने ती जलपर्णी काढण्यासाठी आदेश दयावेत. का ते जुन महीन्याच्या पावसाळयाची वाट बघायला लागलेत हे कळत नाही. तरी आयुक्त साहेब, जलपर्णी लवकरात लवकर काढून घेण्यासाठी आपण आदेश दयावेत. तसेच ती कॅण्टीन सुरु करावी एवढीच मी मनापासून विनंती करतो, पिंपरी चिंचवड शहरामध्ये चांगली परिस्थिती हाताळल्या बद्दल मी पुन्हा एकदा आयुक्त साहेब आपल आणि सर्व अधिका-यांच मनापासून अभिनंदन करतो.

**मा.आश्विनी चिंचवडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज जे आपल्यावर या महामारीच संकट आलेल आहे तस जगावरही आलेल आहे. पिंपरी चिंचवड

शहरामध्ये प्रशासनाने खुप चांगल्या प्रकारे कामगीरी केलेली आहे त्या बद्दल मी नामदेव ढाके यांनी जो अभिनंदनाचा ठराव मांडलेला आहे त्याबद्दल मी त्यांचे कौतूक करते आणि आपल्या या सर्व टिमचही मी कौतूक करते. खरतर पिंपरी चिंचवड शहराला पुण्याची सिस्टर सिटी म्हणल जातं. पुण्यात सध्या खुप रुग्ण वाढलेले आहेत त्यामुळे आपल्याकडेही तशीच परिस्थिती उदभवते की काय अशी शंका येत होती परंतु आयुक्त साहेब आपण सगळी परिस्थिती खुप छान हाताळली त्याबद्दल सर्व टिमचे आणि आपले खुप खुप आभार व्यक्त करते तसेच आपल्या या सभागृहातील सर्व नगरसेवक, नगरसेवीका यांनीही त्यांच्या त्यांच्या प्रभागात खुप छान प्रकारे परिस्थिती हॅण्डल केली. कोणीही अगदी मजूर असेलतरी त्याला अन्न कस मिळेल हे पाहीलेल आहे त्याबद्दल सर्वांचच मी अभिनंदन करते आणि थांबते.

**मा.संगिता (नानी) ताम्हाणे-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज याठिकाणी जो अभिनंदनाचा ठराव मांडलेला आहे त्याबद्दल मी नामदेवराव ढाके यांचे आभार मानते. आज आमच्या प्र.क्र.१२ मध्ये मध्यंतरी इतके पेशंट वाढलेले होते की पेशंटच्या अगोदर आम्हांला धास्ती बसली होती की हे पेशंट कधी कमी होतात. पण प्रशासनाने पुर्ण सोसायटीमध्ये पेशंट चेकअप करुन पेशंट कमी करण्यासाठी खुपच प्रशासनाने आम्हांला मदत केलेली आहे त्याबद्दल प्रथमत: मी वासीएमचे डॉक्टर्स व त्यांची पुर्ण टिमचे आभार मानते. डॉ.वाबळे साहेबांना एक जरी फोन केलातरी ते लगेच माहीती घेवून सांगत असे. ज्याप्रमाणे आपल्याला अन्न पुरवण्याच काम केलेल आहे ते चिखली येथील जयहरी ग्रूप, पिंपरी चिंचवड जयहरी ग्रूप या पण मुलांनी भरपूर सहकार्य आमच्या प्रभागामध्ये केलेले आहे त्याबद्दल त्यांचही मी आभार मानते. तसेच आयुक्त साहेबांनी पण भरपूर सहकार्य केल आहे त्याबद्दल त्यांचही मी आभार मानते आणि थांबते.

**मा.राहूल जाधव -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आदरनीय सत्तारुढ पक्षनेते मा.नामदेवराव ढाके साहेब यांनी अभिनंदनाचा ठराव मांडला आहे. ख-या अर्थाने कौतूकास्पद काम या पिंपरी चिंचवड शहरामध्ये सर्व प्रशासन असेल, नगरसेवक असेल, नगरसेवीका असेल, सर्व प्रतिनीधी असतील या सर्वानीच चांगल्या पध्दतीचे काम या शहरामध्ये केलेल आहे. त्यामुळे औदयोगीक नगरीमध्ये काम करणा-या सर्व कामगारांना एक दिलासा देण्याच काम आपल्या सर्वांच्या माध्यमातून मिळालेल आहे. हे करत असताना पोलीस दल असेल, वैदयकीय विभाग, आरोग्य विभाग सर्वांनीच आपला जीव धोक्यात घालून कोरोना सारख्या विषाणूचा सामना करण्यासाठी कायम कार्यतत्पर राहीलेले आहेत. यामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विवीध विभागाच्या माध्यमातून देखील चांगल्या पध्दतीच कार्य

घडलेल आहे. विशेषतः मा.महापौर ताईंच आणि मा.आयुक्त साहेबांच मी मनापासून अभिनंदन करतो कारण की आपण चांगली परिस्थिती या दोन महीन्यामध्ये हाताळलेली आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड शहर ही कामगारनगरी असल्यामुळे २७ लाख लोकसंख्या असलेले हे शहर आणि या शहराला व्यवस्थित, सुस्थित ठेवण्याच कार्य आपल्या सर्वांच्या माध्यमातून घडलेल आहे. हे करताना सर्व कामगारांच व्यवस्थित पालन, पोषण व्हाव यासाठी विवीध योजना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमून त्याठिकाणी चालू केल्या. आपल्या सर्व सदस्यांनी आपल मनोगत व्यक्त करत असताना या सर्व गोष्टी याठिकाणी सांगीतलेल्या आहेत. आपण अन्नदान चालू केलं, मास्क वाटप केले, सॅनीटायझर वाटप केले, साबण वाटप केले. अशा विवीध योजना आपल्या सर्वांच्या माध्यमातून झालेल्या आहेत. अशीच एक योजना आपण याठिकाणी चालू केली परंतु ती काही आपण पुर्णत्वाकडे नेलेली नाही. मी अति.आयुक्तांना याठिकाणी अवर्जून सांगू इच्छितो की, मी देखील आमदार दादांच्या माध्यमातून तो विषय बोललो होतो की ज्यांच्याकडे रेशनींग कार्ड नाही, फक्त आधार कार्ड असेल त्यांना आपण काहीतरी मदत पिंपरी चिंचवड महापालिकेच्या माध्यमातून करणार होतो परंतु ती मदत आपण केली नाही. त्या माध्यमातून आपण प्रत्येक सदस्यांना ती माहीती देवून त्यांच्याकडन काही डॉक्यूमेंटस आपण गोळा केले. त्यांनी खुप आशेनी आपल्याला ते डॉक्यूमेंटस दिलेले आहेत. अजित पवार साहेबांना आणि संतोष पाटील साहेबांना या गोष्टीची माहिती आहे. या गोष्टीवर तुमच्याशी दादा आणि मी बोललो होतो. त्यामुळे त्यांना तुम्ही मदत करणे अपेक्षीत आहे. कारण की आपण ज्या ज्या वेळेस त्यांचे डॉक्युमेंट गोळा करुन घेतो तर त्या नागरीकांचे अजूनही आम्हांला मॅसेज येतात की आपली मदत आमच्या पर्यंत पोहचलेली नाही. हे खर आहे का ती मदत आम्हांला येणार आहे का अशा पध्दतीचे मॅसेज येत आहेत. त्यामुळे त्याच्यावर काही तोडगा काढा. आम्ही तुम्हांला म्हणत नाहीत की हेच दया किंवा तेच दया. परंतु काहीतरी मदत आपली त्यांचेपर्यंत पोहचण गरजेचे आहे. कारण की ती योजना आपणच चालू केली आणि त्याच माध्यमातून आपण त्यांचेपर्यंत पोहचलेलो आहोत. त्यामुळे तेवढ एक सहकार्य आपण कराव. वायसीएम सारख्या ठिकाणी डॉ.वाबळे सर असतील त्यांची टिम असेल त्यांनी देखील वेळोवेळी सर्वांनी सहकार्य केलं त्यांचेही मनापासून आभार व्यक्त करतो. ज्या कामगारांच्या जीवावर पिंपरी चिंचवड शहराला औदयोगीक नगरी नाव पडलना त्यांना डबल मदत झालीतर काय हरकत आहे. आपण त्यांच्या पर्यंत ती योजना नेलीच नसतीतर त्यांना ती आशा लागली नसती. परंतु हे डॉक्यूमेंटस सुध्दा त्यांचे आपल्याकडे जमा केलेले आहेत. तरी ही मदत करावी अशी मी विनंती करतो. तसेच पिंपरी

चिंचवड शहरातील काही संस्था आहेत त्या संस्थानी सुध्दा मदत केली त्याबद्दल त्यांच मनापासून मी आभार व्यक्त करुन याठिकाणी थांबतो, जयहिंद, जय महाराष्ट्र.

**मा.अपर्णा डोके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरतर जगावर एवढ मोठ संकट येईल अस यथकिंचीतही वाटल नव्हतं. पण या संकटाला सामोर जात असताना आजचे जर अपडेट बघीतलेतर भारत हा दहाव्या क्रमांकावर कोरोना बाधीतांच्या यादीत आहे. अशा रितीने कोरोनाच हे थैमान बघता बघता राज्यात आणि आज आपल्या पिंपरी चिंचवड मध्ये घातलेल आहे. इतरांच्या तुलनेनी बघता आपल्या शहरामध्ये आजची जर संख्या बघीतलीतर एकूण कोरोना बाधित ५३० होते त्यातले कोरोनामुक्त २६२ आहेत हा जो रिझल्ट आहे तो याच्यावर काम करणारे प्रशासन, डॉक्टर्स सर्व कर्मचारी अधिकारी सामाजीक संस्था तसेच शहरातील नागरीक यांचा हा मोलाचा वाटा आहे. खरतर हे संकट अजून किती दिवस चालेल हे कोणालाही सांगता येत नाही. रोजच्या न्यूज बघतो, अपडेट बघतो तर संख्या ही वाढलेली असते. अशा रितीने मनात एक काळजी येते की जोपर्यंत त्याच्या विरुध्दची लस येत नाही तोपर्यंत या संकटाला आपल्या सगळयांना सामोर जायच आहे. या संकटाला सामोर जात असताना निश्चितच वेगवेगळया सामाजीक संस्था आणि जे सर्व लोकप्रतिनिधी असतील किंवा ज्याचे सामाजीक यंत्रणा असेल त्यांनी आपल काम चांगल्या रितीने बजावल आहे. हे संकट अजून संपलेल नाही, भविष्यात निश्चितच परत सामोर जायच आहे. आजच १ जून आहे १ जून पासून आता पावसाचे सगळयांना वेध लागलेले आहेत. म्हणजे फक्त कोरोना नाहीतर डेंग्यु असेल, स्वाईन फ्ल्यू असेल, मलेरीया असेल, असे एक नाहीतर अनेक अजाराना आपल्याला पुढे पावसाळयामध्य सामोर जायच आहे. याद्दष्टिन जी आरोग्य यंत्रणा असेल ती सुध्दा आपल्याला सुसज्ज करावी लागेल. की जेणेकरुन कोरोनाच असणार लक्षण हे सर्दी, खोकला, ताप यासाठीही लवकरात लवकर लॅब उभारण्यात यावी. तसेच जे कोरोना बाधित आहेत त्यांना वायसीएममध्ये, इतर ठिकाणी खुप चांगल्या रितीन उपचार दिले जातात. जिथे पॉझिटीव्ह रुग्ण आढळतात तीथे लगेचच आपली यंत्रणा सुसज्ज होवून तो ऐरीया सिल केला जातो तसेच तेथील बाधितांना चांगले उपचार दिले जातात. पण आपल इथेही दुर्लक्ष होता कामा नये की जेथे कोरोना बाधित ऐरीया नाही, जिथे निगेटीव्ह आहे तीथेही लक्ष गेल पाहीजे कारण की आम्ही आमच्याच प्रभागात बघतो की आतापर्यंत एकही कोरोना पॉझिटीव्ह नाही. पण आज सगळ लॉकडाऊन ओपन झाल, सगळ शिथील होवून दुकान उघडतात पण तीथे असणार गर्दीच प्रमाण आणि नियम पाळले जात नाहीत. आज भाजीचा व्यावसाय जर बघीतलातर ज्यांच हातावरच पोट आहे त्यांच सर्वजण बघतात. तरी प्रशासनान जीथे रुग्ण

नाहीत तीथेही जाणे निश्चित आहे. कारण तीथेही परत कोरोनाबाधित झाले नाही पाहीजे. यासाठी आपण काहीतरी चांगल्या उपाययोजना कराव्यात. त्या ऐरीयावर पण आपण लक्ष केंद्रीत करा. जीथ बाधित आहे त्याठिकाणी आपण चांगल काम करतात याबद्दल तीळमात्र शंका नाही. भविष्यात हे वर्षे आपल सगळ या गोष्टीसाठीच जाणार आहे. निश्चितच या गोष्टी करत असताना आपली यंत्रणा आपले अधिकारी सर्व यंत्रणा त्या कामात लागली. मा.महापौरांचेही मनापासून कौतूक करेल कि त्यांनी सुध्दा वेळोवेळी मिटींग घेवून चांगल्या रितीन प्रशासनाला सुचना दिल्या त्या निमीत्तान पुन्हा एकदा मी प्रशासनातील, सर्व संस्थातील जे जे या कार्यात भाग घेवून आज आपल्या शहराला कशी कमी कमी रुग्ण संख्या होत जाईल यासाठी सगळे काम करत आहेत. पुन्हा एकदा मी सगळयांच कौतक करेल, अभिनंदन करेल आणि थांबते, धन्यवाद.

**मा.अंबरनाथ कांबळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज सर्व नगरसेवकांनी अधिका-यांच अभिनंदन केलं. तसेच आपल्या पिंपरी चिंचवडचे आयुक्त साहेब, पवार साहेब, पाटील साहेब तसेच सर्व अधिकारी, पिंपरी चिंचवडचे सर्व पोलीस असतील त्यांनी खरोखर मनापासून या पिंपरी चिंचवड शहरामध्ये काम केलं मी परत त्यांच एकदा अभिनंदन करतो. आता सर्वानी अभिनंदन करताना अनेक गोष्टी, अनेक दुकान आता चालू आहेत, पण काही बारीक मोठे धंदयावाल्यांना काही काहीनां परमीशन मिळालेल नाही. त्याच्यात कटींगची दुकान असतील ब्युटी पार्लर असेल हे बारीक बारीक बरेच दुकान चालु आहेत. आपण दोन तीन दिवसापुर्वी यांना आपण परमीशन दिलेलं होतं. आज लोकमत मध्ये आलेल आहे की कटींगचे दुकान पुर्णपणे बंद करायचे. मान्य आहे, शासनाचा आदेश आहे पण आज तीन महीने झालं त्या लोकांचा पण आपल्या महापालिकेमार्फत काहीतरी विचार व्हावा. आपल्या शहरामध्ये काही रिक्षावाले आहेत त्यांचा सुध्दा आपण काहीतरी विचार करायला पाहीजे. लहान सहान दुकान आहेत यांचा पण महानगरपालिकेनी विचार करायला पाहीजे. हे दुकान अजून एक ते दोन महीने बंद राहीलेतर यांच्या कुटूंबाच काय होईल. प्रभागामध्ये कोण रिक्षावाले असतील, कोण कटींग दुकानदार असतील अशांना पिंपरी चिंचवड मधील नगरसेवकांनी जेवढी मदत करता येईल तेवढी मदत केलेली आहे. पिंपरी चिंचवडमधल्या ज्या जीम आहेत त्या जीम पण दोन- तीन महीन्यापासून बंद आहेत. वरुन शासनाचा आदेश आहे की जीम बंद कराव्यात म्हणून, मान्य आहे पण आयुक्त साहेब, आपण आपल्या मार्गदर्शनाखाली जीम चालू करता येते का हे बघावे. कारण ब-याच जीम या भाडयाने घेतलेल्या असतात. त्यांच्या मशनरी या बँक लोणच्या आहेत. दोन-तीन लाख रुपयाच्या

मशनरी असतात त्यांचा पण नगरपालीकेमार्फत मदत व्हायला पाहीजे. महानगरपालिकेतील सर्व अधिका-यांनी, नगरसेवकांनी गेले दोन तीन महीने खरोखर नागरीकांसाठी काम केलेलं आहे. तरी या व्यावसायीकांचा आपण विचार करावा. मा.महापौर यांनी खरोखरच पिंपरी चिंचवडमध्ये प्रत्येक वेळी प्रत्येक भागात व्हिजीट केलेली आहे त्याबद्दल मी त्यांच मनापासून स्वागत करतो. मला बोलण्यास वेळ दिला त्याबद्दल आभार मानतो.

**मा.संदिप वाघेरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. नामदेव ढाके यांनी जो ठराव मांडला कोव्हीड योध्दयाचा तो खरोखर उल्लेखनीय आहे. १ फेब्रूवारी २०२० मध्ये मी पहील पत्र दिलेलं होतं की कोरोना साथ अशी अशी आलेली आहे त्यासाठी आपण आयसोलेशन व क्वॉरन्टाईन सेंटर तयार करा. त्यानंतर ८ तारखेला परत मी स्मरणपत्र दिलं आणि १२ मार्चला पहीले तीन पेशंट आपल्या इथे दुबई मार्ग वगैरे कुठूनतरी आले. त्याच्यानंतर आपण ती मोहीम स्वतः हातात घेतली. नंतर तीनचे बारा झाला, बारावरुन नंतर कमी झाले नंतर ते दिल्लीचे कार्यक्रमामुळे वाढले असे वाढत वाढत आज आपण ५०० चा आकडा कालपर्यंत पार केला आणि त्यातले बरेचसे २०० पेशंट क्लेअर झाले आणि बारा ते पंधरा पेशंट याच्यामध्ये दगावले. कोरोना होतो तो संसर्गजन्य रोग आहे तो फक्त श्रीमंत लोकांना होतो किंवा गरीब लोकांना होतो असं काही नाही. आयुक्त साहेब मी तुम्हांला मागे पण एक पत्र दिलेलं होत की अर्सेनिक अल्बम ३० च्या गोळया महापालिकेमार्फत वाटा. तुम्ही म्हणले की व्हीआयआयपी माणसाना आपण ८० हजार, ९० हजार, १ लाख गोळया आतापर्यंत वाटल्या त्याच्यामुळ शहरामध्ये कंट्रोलींग राहील. मी म्हणतो शहराची लोकसंख्या सत्तावीस लाख आहे प्रत्येकाला जर ही रोगप्रतीकारशक्ती वाढविण्यासाठीच्या गोळया दिल्या, अर्सेनिक अल्बम ३० च्या तर रोगप्रतीकारशक्ती वाढेल. राहूल जाधव यांच बरोबर आहे की आपल्याला कुठल्याही लोकांनी म्हणलेल नव्हत की मदत करा वगैरे. आपण स्वतःहून त्यांच्याकडून अर्ज भरुन घेतले आहेत. त्यांनी प्रत्येक नगरसेवकांच्या ऑफिसमध्ये ते अर्ज आणून दिलेले असे वीस ते पंचवीस हजार लोक पिंपरी चिंचवड शहरामध्ये आहेत. आपण त्यांना आर्थीक मदत असेल किंवा पीपीई कीट स्वरुपात ती मदत केली पाहीजे. आपण लोकांच्या भावनेशी खेळ खेळतो. म्हणजे आपल्याला वाटल की एखादी योजना चालू केली आणि मनाला वाटल की एखादी योजना बंद करुन टाकली. आज डॉ.वाबळे असतील, डॉ.रॉय असतील. डॉ.साळवे असतील महापालिकेतील चतुर्थश्रेणी कर्मचा-यापासून अधिका-यांपर्यंत सगळयांनी चांगल काम केलेलं आहे. पण आयुक्त साहेब तुम्ही जो निर्णय घेता त्या निर्णयाला ठाम पण रहात जा. आज त्या लोकांना अन्नधान्याची गरज आहे किंवा थोडयाफार पैशाची गरज असेल, ते फॉर्म

भरुन दिलेले आहेत आणि आयुक्त साहेब तुम्हांला सर्वच्या सर्व खरेदीचे अधिकार दिलेले आहेत. आता पर्यंत तुम्ही ब-याचवेळा खरेदी केलेल्या आहेत. मग त्याच्यात या दोन गोष्टी पण खरेदी करा लोकांची प्रतिकारशक्ती पण वाढेल. त्यातून अर्सेनिक अल्बम ३० च्या गोळया खरेदी करा. सी-व्हिटॅमीनच्या गोळया खरेदी करा त्यातून या लोकांना मदत करा. आज आपल्या महापालिकेच साडेपाच ते सहा हजार कोटीच बजेट आहे. त्याच्यातून या कोरोनासाठी दोनशे तीनशे कोटी रुपये खर्च झालेतरी चालतील. एखादा प्रकल्प करु नका कोण तुम्हांला काही म्हणणार नाही की हे काम केल हे काम का केल नाही. आज आपण कोरोनाच्या तपासणीसाठी एनआयव्हीकडे पाठवतो त्याचे दोन ते तीन दिवसाने रिपोर्ट येतात त्यामुळे कोरोना बळावतो. आज अशी परिस्थिती आहे की लोकांना रिझल्ट पटकन आले तर त्याच्यावर लगेच इलाज करता येतात. एकतर याच्यावर औषध नाही जे काही होमीओपॅथीक असेल, आयुर्वेदीक असेल याच्या हिशोबानीच त्या लोकांना ट्रिटमेंट करतो. ती ट्रिटमेंट लवकर आणि वेळेत भेटण्यासाठी अपण प्रयत्न केले पाहीजेत, एवढ बोलून थोबतो, जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.हर्षल ढोरे-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पुर्ण जगभर थैमान घातल ती कोरोनाची महामारी ही आपल्या भारत देशामध्ये आल्यानंतर आपल्या मुंबई आणि पुणे शहरामध्ये याचे मोठे रुग्ण आढळले आणि भिती वाटायला लागली की मुंबई आणि पुणे यामध्ये आपल पिंपरी चिंचवड शहर आहे. या शहरामध्ये पण कोरोनाचे रुग्ण वाढण्याची एक भीती निर्माण होऊ लागली पण मा.महापौर असतील, आयुक्त साहेब असतील, संतोषजी पाटील साहेब असतील, अजीत पवार साहेब असतील यांनी ज्या प्रकारे ही कोरोनाची महामारी रोखण्यासाठी जे प्रयत्न केले खरोखरच तुमचे जेवढे अभिनंदन करेल तेवढे थोडे आहे. तुम्ही अशा संकटकाळामध्ये खुप चांगल्या प्रकारे काम केल आहे. आमच्या प्रभागामध्येही कोरोनाचे पेशंट सापडले आणि ते सापडले असताना स्वतः महापौर आणि आम्ही सर्व नगरसेवक आणि संतोष पाटील साहेब व्हिजीट देण्यासाठी आले आणि त्यावर काय काय उपाययोजना करता येतील याच्यावरही संतोष पाटील साहेबां बरोबर चर्चा झाली. आपण पिंपरी चिंचवड महानगरपालिकेनी म्हणजे त्याच्यामध्ये आरोग्य विभागाचे कर्मचारी असतील, डॉक्टर्स असतील, नर्स असतील त्याचप्रमाणे पोलीस कर्मचारी असतील त्यांनी ज्या पध्दतीने काम केल आहे त्यांना खरच आमच्या सर्वांचा सलाम आहे. अशा संकटसमयी ज्या पध्दतीने काम केल ते खरच कौतूकास्पद आहे. आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमातून गोरगरीबांना जेवण असेल, सॅनिटायझर वाटपाचा कार्यक्रम असेल, साबण असतील, मास्क

असतील असे विवीध उपक्रम याठिकाणी राबवले. मी पुन्हा एकदा याठिकाणी सर्वांचेच आभार मानतो आणि थांबतो, धन्यवाद.

**मा.राजेंद्र गावडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा जो प्रशासनाच्या अभिनंदनाचा ठराव मांडलेला आहे खरोखरच सर्व प्रशासन त्याचा हाक्कदार आहे. ज्यावेळेला पहील्यांदा लॉकडाऊन जाहीर झाला त्यावेळेस पासून मी पाहतो आयुक्तांनी, महापौरांनी मिटींग घेवून चांगल्या योग्य त्या उपाययोजना निर्माण केल्या. आपल्या भागामध्ये कोरोनाचा संसर्ग वाढू नये म्हणून विवीध सूचनां तुम्ही नागरीकांपर्यंत पोहचवल्या होत्या. या पध्दतीने जी काम सुरु होती त्याच्या बरोबरच आपल्या भागातील जे काही बेघर कामगार होते त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न निर्माण झालेला होता. अशाना सुध्दा धान्याची पाकीट असतील किंवा जेवण पुरवण्याच काम असेल हे सर्वच चाललेल होतं. हे सर्व करत असताना पुर्ण प्रशासन, आरोग्य विभाग असेल, स्थापत्य विभागाला सुध्दा काही काम वाटप केलं होतं. त्यांनी सुध्दा स्वतःच्या जीवाची परवा न करता व्यवस्थितपणे हे काम केलेल आहे. डब्ल्यूएचओनी असं जाहीर केलेलं होतं की ज्येष्ठ नागरीक आणि लहान मुलांना याचा धोका आहे. परंतु आपल्या हॉस्पिटलमधल्या स्टाफनी दिड महीन्याचा रुग्ण आणि ज्येष्ठ नागरीक यांना सुध्दा या आजारातून बाहेर काढलं आहे त्यामुळे आपण खरोखरच चांगल काम केलेल आहे मी आपल्या सर्वाच अभिनंदन करुन थांबतो.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या अभिनंदनाच्या ठरावामध्ये मा.महापौर असतील, मा.आयुक्त असतील अति.आयुक्त आणि त्यांचे सर्व सहकारी, आरोग्य विभाग आणि त्यांचे सर्व सहकारी, वायसीएम हॉस्पिटलचे सर्व सहकारी, डॉक्टर्स या सर्वांच मी मनापासून खुप खुप आभार मानते. विशेष आभार यांचे मानते की जे आपले वर्ग-४ चे कर्मचारी आहेत, लॉकडाऊनमध्ये कोणीही नागरीक रस्त्यावर दिसत नव्हते परंतु झाडू खात्यातील जी मंडळी आहेत ती मात्र रस्त्यावर अगदी रोजच्या रोज असायचे त्यांनी कधीही भीती बाळगली नाही परंतु ती लोक न घाबरता न सुट्टया टाकता त्या आपलया सफाई कर्मचा-यांनी काम केलेलं आहे. तेवढेच महत्वाचे वायसीएममधल्या कोव्हीड वॉर्डमध्ये काम करणारे जे डॉक्टर्स आहेत, सफाई कर्मचारी आहेत त्यांनी कधीही कोणाशीही हेडीसफेडीस केलेलं नाही. तसं काही असतंतर आपल्याला लगेच बाहेर कळाल असतं परंतु त्या लोकांनाच मनापासून अभिनंदन. आयुक्त साहेब मी वेळोवेळी तुमच फोनवरुन अभिनंदन केलेलं आहे. जस आपण पहील्यांदा शुन्यावर आलो त्याच्यानंतर परत वाढत वाढत गेले. परंतु काय होत की पहील्या पासूनचा जो आकडा आहे तोच दाखवला जातो. सध्याचा जो आकडा आहे तो

दाखवला पाहीजे.  काय होते लोकांच्या मनामध्ये भीतीच वातावरण तयार होतं की एवढे पेशंट झाले, इतके पेशंट आहेत. त्यामुळे माणसाच मनोधैर्य कुठेतरी खचत जातं. त्यामुळे तुम्ही पण सगळयांना सांगा की हा पहील्या दिवसापासूनचा आकडा आहे. आजचा आकडा एवढा आहे, आपण डिस्चार्ज दिलेले एवढे आहेत, शिल्लक इतके आहेत अशी आपण सांगायला सुरवात केली पाहीजे. कारण की कोरोनाला घाबरुन येथून पुढे चालणार नाही. प्रत्येकानीच स्वतः काळजी घेतली पाहीजे. मला वाटतय येथून पुढे आणखीन सहा महीनेतरी याच्यामध्ये आपले जातील असं मला वाटतय. पिंपरी चिंचवड शहराच काम खुप उत्कृष्ठ पध्दतीने झालं. त्यातल्या त्यात हॉस्पिटलमध्ये काम करणा-यांचही सर्वांनी कौतूक केलेल आहे, सर्व नगरसेवकांचही कौतूक. प्रत्येंकानी प्रत्येकाच्या वॉर्डामध्ये प्रत्येकानी ज्याला ज्याला जमेल तस तस सगळयांनी काम केलेलं आहे. म्हणून मी सांगते की सगळयांच कौतूक आहे. परंतु येथून पुढचा काळ सुध्दा फार अवघड काळ आहे कारण पावसाळा सुरु होणार आहे आणि या पावसाळयाच्यानंतर आपण काय केल गेल पाहीजे. आपण नेहमी म्हणत असतो आपल्याला एखादाजर पुरस्कार मिळाला तर त्या पुरस्काराचे दायित्व फार मोठ असतं की ते दायित्व स्विकारुन आपल्याला फार मोठया पध्दतीने काम कराव लागतं तस तुम्हांला पुढे खुप मोठ काम कराव लागेल. त्यादृष्टिकोनातून आपण काय उपाययोजना करायच्या आहेत त्या केल्या गेल्या पाहीजेत. याचा सुध्दा ऊहापोह कुठेतरी सभागृहामध्ये झाला पाहीजे. ज्या सामाजीक संस्था असतील या लोकांनी सुध्दा या पावसाळयानंतर काम कसं केल गेल पाहीजे या पध्दतीने आपण बघीतल गेल पाहीजे. साहेब, आपण फक्त एका डी.वाय.पाटीलशी करार केला. आपण वायसीएम हॉस्पिटल संपुर्ण कोव्हीडसाठी केल आहे. ते एकदम बरोबर काम झाल आहे. त्यांच हॉस्पिटल वापरण्याच्या संदर्भात आपण करार केला आहे. परंतु असे आपण बरेचसे हॉस्पिटल घेतले गेले पाहीजे. कारण आज अशी परिस्थिती आहे की एक डी.वाय.पाटीलमध्ये एका माणसाच ऑपरेशन केल आणि नव्वद लोक क्वॉरंटाईन केले. एका बाईची डिलव्हरी झाली ती मुलगी पॉझिटीव्ह झाली ती बाई पॉझिटीव्ह आहे. परत तीतकेच लोक तुम्हांला क्वॉरंटाईन करावे लागले. मग फक्त डी.वाय.पाटील हॉस्पिटलला त्रास देण्यास कितपत अर्थ आहे. याच्यापेक्षा पिंपरी चिंचवड शहरामध्ये जिकडे तीकडे मोठमोठी हॉस्पिटल आहेत ती आपण ताब्यात घेतली गेली पाहीजेत. कारण पावसाळा आहे या पावसाळयामध्ये सगळयांनी काळजी घ्यायचीच आहे. परंतु जरी काळजी घेतलीतरी आपल्याला हॉस्पिटलची संख्या जर लागली, उदा. आनंदनगर मध्ये जास्त पेशंट आले क्वॉरंटाईन करण्यासाठी तुम्हांला पीसीपी कॉलेज ताब्यात घ्याव लागलं तशाच पध्दतीने तुम्हांला जास्तीत जास्त हॉस्पिटल सुध्दा

ताब्यात घेवून त्याच नियोजन करणं गरजेच आहे. म्हणजे कोरोनासाठी सुध्दा गरजेच आहे अधिक नॉर्मल जे पेशंट आहेत की ज्यांना आता सर्दी होणार आहे, खोकला येणार आहे, ताप येणार आहे, काहींचे ऑपरेशन तीन तीन महीने झाले रखडलेले आहेत ते रखडून चालत नाही, अशी बरीचशी ऑपरेशन्स लोकांची असणार आहेत. तरी या सगळया गोष्टीसाठी सुध्दा आपल्याला हॉस्पिटल ताब्यात घ्यायला पाहीजेत. म्हणजे डी.वाय.पाटील बरोबर जसा करार केलेला आहे तसा करार तुम्ही इतर हॉस्पिटल बरोबर करावा असं मला याप्रसंगी सांगावस वाटत. आज टि.व्ही.वर बघीतलतर इतक्या यातना होतात की ती गरोदर महीला होती तीने तीच्या नव-याच्या खांदयावरच शेवटचा श्वास घेतला. तीला कुठल्याही हॉस्पिटलमध्ये ॲडमिशन मिळत नव्हते. असे प्रसंग पिंपरी चिंचवड शहरात पण आहेत चालू. परंतु लोक जाऊ देत म्हणतात आपल्याला काही इलाज नाही अस लोक बोलतात. कधी कधी डी.वाय.पाटीलवाल्यांना सुध्दा हा प्रश्न निर्माण होतो रात्री दोन वाजता परत वायसीएम मध्ये पेशंट त्या पेशंटला श्वास घ्यायला त्रास झाला जरी कोव्हीड पेशंट नसतीलतरी ते रात्री दोन दोन वाजता ते आपल्याकडे शिफ्ट करतात. या सगळया गोष्टींची मी तुम्हांला कल्पना दिलेल्या आहेत. त्या त्या वेळेला दिलेल्या आहेत म्हणून आपल्याला या गोष्टीचे पहीले प्रिकॉशन्स घ्यायाला पाहीजे. पिंपरी चिंचवड मधले चार प्रकारचे चार हॉस्पिटल्स तुम्ही ताब्यात घ्या आणि कोरोनासाठी परत चार घ्या. म्हणजे आठ हॉस्पिटल्स असे होतील की ते तुमच्या हातामध्ये राहणारी एक संख्या असेल. आता तक्रार मी करणार नाही. परंतु पिंपरी चिंचवड शहरामध्ये ज्या काही गोष्टी सुरु झालेल्या आहेत त्या सुरु होताना सुध्दा आपण बघीतल गेल पाहीजे की दुकान जी आहे एक दिवसा आड इकडचे व एक दिवसाआड तीकडचे चालू आहेत आणि या पिंपरी चिंचवड शहरावर एक आर्थीक संकट आल आहे. आता ब-याचशा लोकांनी सांगीतल की तुम्ही हे वाटप केल गेल पाहीजे ते वाटप केल गेल पाहीजे. मी त्यांच्या विरोधात असं नाही. परंतु सर्वसामान्य कुटूंबातील जे नागरीक आहेत की तोंडाने मागवूही शकत नाहीत, समोरच्यांकडे जाऊही शकत नाहीत असे सुध्दा कुटूंब आहेत. त्यांना सुध्दा असं वाटत की आम्हांलाही कुणीतरी काहीतरी दिल पाहीजे. वडील रिटायर्ड असतात, मुलाला जॉब नसतो पण दिसताना चांगला बंगला दिसतो, चांगल रो-हाऊस दिसतं, चांगल्या सोसायटीमध्ये राहतात अशा लोकांच्यासाठी सुध्दा आपण काहीतरी केल गेल पाहीजे. आणि म्हणून मागच्या एका मुलाखतीमध्ये सुध्दा मी सांगीतल की आपण टॅक्समध्ये काहीतरी सवलत दयायला पाहीजे. सभागृहामध्ये आणा सगळयांनी त्याच्यावर चर्चा करु जेणेकरुन आपल्याला टॅक्समध्ये कसा बेनिफीट देता येईल. म्हणजे ज्या गोष्टी त्या लोकांपर्यंत पोहचत नाहीत परंतु त्यांची अर्थीक परिस्थिती फार अवघड

आहे. तुम्ही लोकांना आवाहन पण करा. काही लोकांनी नको घेवू देत टॅक्स, जसं उज्जवला सहाय्य योजनेच झाल होतं. भरपूर लोकांनी सबसिडीचे सिलेंडर घेतले नाहीत. तशा पध्दतीने तुम्ही अनाऊन्स करुन बघा. की ज्यांना कुणाला टॅक्स घ्यायचा नसेलतर याच्यासाठी मदत म्हणून तुम्ही कोव्हीड संकटासाठी महापालिकेत एक अकौंट कराव त्याच्यामध्ये तुम्ही तो जमा करावा. काही लोक या टॅक्सचा बेनिफीट नाही घेणार. परंतु काही लोकांना खरच आज गरज आहे तर त्या लोकांना सुध्दा त्या पध्दतीने दिल गेलं पाहीजे असं मला वाटत. मगाशी चेअरमन म्हणाले होते, आपण सुध्दा स्वदेशीचा नारा दिला पाहीजे. प्रत्येकानी स्वदेशी वस्तू वापरायला येथून पुढे शिकल पाहीजे. त्यादृष्टिकोनातून आपण हाळूहाळू बोलल पाहीजे की आपण आपल्या ऐरीयात आहोत, भारतात आहोत आपण आपल्या गोष्टी वापरा. हे बोलताना आपल्याला काही घाबरायच कारण नाही. कुठेतरी छोटया गोष्टीतून ही सुरवात झाली पाहीजे. आज एकटया अमेरीकेन चिनच्या विरोधात बोलण्याच काही दायित्व नाही घेतलं. आपल्यालाही खुप दिवसापासून माहिती आहे की मोठा दुष्मन कोण असेलतर तोच आहे. परंतु आपण बोलत नाहीत म्हणून मला असं वाटत की सगळयांनी इथून पुढे तरी कमीत कमी आपल्या हाळू हाळू ज्या ज्या गोष्टी आहेत त्या त्या बदल करायला सुरवात केली पाहीजे. एखादया ऐरीयामध्ये कोव्हीड पेशंट असेलतर तो ऐरीया पाचशे मीटरचा किंवा ऐक किलो मीटरचा ऐरीया सिल केला जातो. तरी तो पाचशे मीटरचा ऐरीया संभाळणे सोपी गोष्ट नाही. दुध पुरवणे, भाजी पुरवणे, फळ पुरवणे हे आहे. या यंत्रणेला हे पोहचवताना पोलीस बाहेर येवू देत नाहीत. मग एक कि.मी.चा किंवा पाचशे कि.मी.चा ऐरीया बाधित होत असेलतर त्या लोकांना दुध कोण पुरवणार, आतातरी थोडस पोलीस लोक डोळेझाक पणा करतात परंतु पुर्वी तसं नव्हतं. आम्हांला अक्षरशः पत्र्याच्या बाहेरुन दुधाच्या पिशव्या किंवा सामान दयाव लागत होतं. तरी साहेब, ही अट थोडीशी कुठेतरी शिथील करावी. पहील उदाहरण मी तुम्हांला सांगेल की मुंबई वरुन जी मुलगी आली की तीचे वडील पॉझिटीव्ह झाले म्हणून ती मुलगी इकडे आली आणि दोन तासामध्ये वायसीएममध्ये आपण तीला ॲडमीट केल. ती स्वतः पॉझिटीव्ह झाली नाही परंतु तीचे दोन मुल पॉझिटीव्ह झाले. म्हणजे आपल्या ऐरीयामध्ये ती फक्त तीच्या घरामध्ये दोन तास होती. पहाटे ती साडेपाच ते सहाला आली, उठली आवराआवरी केली. आम्ही तीला सांगीतल हे चालणार नाही आम्हांला कळाल की तुझे वडील पॉझिटीव्ह होते म्हणून. मग या गोष्टीसाठी एक कि.मी.चा ऐरीया जर आपण सिल केला आणि या सिल केलेल्या ऐरीयामुळे आम्हांला मोठया त्रासाला सामोर जाव लागलं. आम्ही तुम्हांला त्याहीवेळेला सांगीतल होत की साहेब, ही मुलगी फक्त दोन तास आपल्या ऐरीयामध्ये होती ती इथ नव्हती, ती स्वतः

पॉझिटीव्ह नाही. परंतु आपण एक कि.मी.चा ऐरीया सिल केला. तरी ज्या ज्या वॉर्डामध्ये असे पेशंट निघतील तेथे आजुबाजूच्या दोन सोसायटया किंवा तीन सोसायटया, चार बंगले असे तुम्ही सिल करा. की जेणेकरुन नागरीकांना फार मोठया या गोष्टीला फेस कराव लागणार नाही. सगळया टेस्ट केल्यातर शहरामध्ये जास्त लोक निघू शकतात. हा विचार करुन सगळयांनी फिट राहील पाहीजे. मा.मुख्यमंत्री साहेबांनी काल आवाहन केलेल आहे वॉकींगसाठी तरी कमीत कमी लोकांना वॉकींगसाठी दोन तासतरी उदयान तुम्ही उघडी करा. मागे पण सभागृहामध्ये विषय झालेला होता की कॅमेरे हे आपले स्पष्ट पाहीजेत. लोकांची थूंकण्याची सवय फार लवकर जाणार नाही. इतके लोक थूंकत असतात की त्यामुळे कमीत कमी असे वाटते की त्या उदयानामध्ये जावून लोक चाललेतर तेवढतरी त्यांना सेफ राहील. कारण रोडवरुन प्रत्येक ठिकाणावरुन लोक कुठून कुठून आलेली असतात. तरी त्यादृष्टिकोनातून तुम्ही नियोजन करा. कारण आता इथून पुढच नियोजन तुम्हांला फार महत्वाच आहे. मा.महापौरांना ही पण विनंती आहे की एका दिवशी चार जी.बी. घेवू नका. कॉमन टॉयलेट वापरायचे नाहीत. आता बघा तुम्ही या फ्लोअरवरचे दोन टॉयलेट किती लोकांनी वापरले. ही गोष्ट योग्य आहे का. एक व्यक्ती तीन ते चार तास किती तास जागेवर बसु शकतो तेवढया तासासाठीच जीबी एक एक दिवस तुम्ही घ्या. चार दिवस लोक येवू देत काही फरक पडत नाही. पण कन्टीन्यू सलग जर तुम्ही चार जीबी ठेवल्यातर त्याला काय अर्थ असणार. एक जीबी एका दिवशी घ्या अशा पध्दतीन तुम्ही नियोजन केल गेल पाहीजे. मा.महापौर आपण या काळामधून वावरत आहोत, आपण नेहमी म्हणत असतो की माझा काळ कसा गेला. प्रत्येकाला असं वाटत असत की मी महापौर होते माझा काळ कसा गेला. मा.महापौर तुमच सुध्दा खुप चांगल सहकार्य प्रशासनाला आहे, प्रशासनाच सहकार्य तुम्हांला आहे. रथाची दोन्ही चाक बरोबर चाललेतर रथ व्यवस्थित चालतो. आयुक्त साहेब, बाकीच्याही गोष्टी तुम्ही तपासून बघुन घ्या. म्हणजे दिलेली गोष्ट सुध्दा लोकांना चांगली मिळते का नाही, आता मला तक्रार करायची नाही. माझ्या तक्रारीच पत्र तुमच्याकडे आहे. तुम्हांला मागायला कोणीच आलेल नाही. प्रत्येक माणूस स्वत:च्या घरामध्ये चटणी भाकरी खावून समाधानी असतो. प्रत्येक गोष्ट नागरीकांनी तुमच्याकडे मागीतली का. नाही मागीतली मग ती गोष्ट देताना त्या गोष्टीचा विचार करा की आपण नागरीकांसाठी, पब्लिकमध्ये देणार आहोत ती गोष्ट. एखादा प्रोजेक्ट नाही तो की तो प्रोजेक्ट एखादया ठिकाणचा आहे. एखाद उदयान नाही ते की ते उदयान जागेवरच आहे. या गोष्टी नागरीकांपर्यंत डायरेक्ट जाणार आहेत. नागरीकांपर्यंत जाणा-या गोष्टी आहेत आयुक्त साहेब, याच्यात कमिटया नेमा, याच्यावर तुमचे अधिकारी नेमा. येणार मटेरीअल हे बरोबर

येत का हे पहा. तुम्ही एवढ चांगल काम करत असताना परत तक्रारीची जागा कशाला देता. ही गोष्ट चांगली दयावी याच्यावर तुमची कमिटी असायला पाहीजे होती. आलेली गोष्ट लोकांपर्यंत जाते का. आपण ती गोष्ट देत असूतर त्याला प्रुफ पण तेवढ ठेवावच लागेल. आम्ही एखादी गोष्ट विचारली की इतके मास्क तुम्ही घेतले किंवा सॅनिटायझरच्या बाटल्या घेतल्या तेवढया त्या लोकांपर्यंत पोहचल्यात का. त्याची काही आकडेवारी आहे का, त्यावर नागरीकांच्या सहया आहेत का. काही ठिकाणी किचन चालू आहेत, मगाशी बनसोडे यांनी सांगीतल की त्यांचे तेथे स्लम मध्ये की जेथे कामगार आहेत त्यांना तेथे जेवण देणं योग्य आणि गरजेच असणार आहे. जिथे जिथे लागतय तीथे तीथे ते  नक्की दयावे पण लोक चांगल्या पध्दतीने जीथे फेस करतात तीथे पण हे बेनिफीट दिला गेला पाहीजे. आपल्याकडे आतापर्यंत तुम्ही चांगल्या गोष्टीनी कंट्रोल केलेलं आहे. येथून पुढे पण व्हाव, साई चरणी प्रार्थना आहे की पिंपरी चिंचवड शहरावरच नाहीतर अख्या जगावरच संकट हे लवकरात लवकर दुर व्हाव. मी पुनश्च एकदा तुम्हा सर्वांच मनापासून हार्दीक हार्दीक अभिनंदन करते. परमेश्वर आपल्याला अशीच ताकद देओ की खुप चांगल्या पध्दतीचे आपल्या हातून काम होओ अशी सदिच्छा व्यक्त करते.

**मा.बापु उर्फ शत्रूघ्न काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह.  खरतर संदिप वाघेरे यांनी सांगीतल त्यांच पत्र होत त्यावेळेस पुर्ण चायना लॉकडाऊन होत हा संक्रमण होणारा आजार होता. मधल्या काळामध्ये पहील्यांदाच कोरोनाचे पेशंट पिंपरी चिंचवड शहरामध्ये सापडले. त्याच्यामध्ये जास्त करुन परदेशाहून येणारे नागरीक होते. साहेब, खास करुन तुमच अभिनंदन करायच आहे की माझ्या प्रभागामध्ये मार्च आणि एप्रिल म्हणजे २५ मार्च पर्यंत साधारण १५० लोक क्वॉरंटाईन झाले. मला एवढच सांगायच आहे की साहेबांनी एवढी चांगली सिच्यूएशन तीथ हॅण्डल केली. कारण त्यांच माझ बोलणं झाल होत की काही लोकांना सिम्टन दिसायला चालू होतील. पिंपळेसौदागरमध्ये साधारणपणे पन्नास टक्के लोक हे कोरोना पॉझिटीव्ह असतील परंतु ती परिस्थिती आपण येऊ दिली नाही. ज्या लोकांना क्वॉरंटाईन केल त्यातला एकही नागरीक बाहेर गेला नाही. आयुक्त साहेब या कोरोना काळामध्ये आपण आपली भूमीका एकदम चांगली बजावलेली आहे. तसेच आपल्या बरोबर आपला संपुर्ण स्टाफ जसे की अजीत पवार साहेब, असतील, पाटील साहेब असतील, डॉ.पवन साळवे असतील, डॉ.रॉय असतील, डॉ.वाबळे असतील खास करुन माझ्या प्रभागातील डॉ.तपसाळकर त्यांना कधीही रात्री जरी फोन केलातरी लगेच ते त्या गोष्टी अटेंड करायच्या आणि नागरीकांपर्यंत सुविधा पोहचवायच्या. बराचवेळ झाल आपण सभागृहामध्ये अभिनंदन

करतो. तसेच यामध्ये नागरीकांचाही सहभाग होता, नगरसेवकांचाही सहभाग होता, काही एनजीओचाही सहभाग होता सर्वांचे मी आभार व्यक्त करतो आणि आता ताईनी सांगीतल की आज एकूण चार सभा आहेत पण आणखीन काही लोकांना आपल अभिनंदन करायच आहे त्याच बरोबर मा.महापौर माईंची काळजी आम्ही सर्वानी करायला पाहीजे परंतु माईंचा प्रत्येक नगरसेवकाला फोन असायचा की बाबारे, तु काळजी घे, आशा आपल्या महापौर त्यांचही मी अभिनंदन करतो, आभार व्यक्त करतो, धन्यवाद.

**मा.शैलजा मोरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता जे आपण आजाराबद्दल बोलतो आहोत ते खरोखरच प्रशासनाने खुपच चांगल काम केलेलं आहे. हार्डीकरांची जी टिम आहे त्या टिम, हार्डीकरांच, अजीत पवार आणि पाटील सरांना मी धन्यवाद म्हणेल. अजीत पवार साहेबांनी मला फोन करुन सांगीतल की ताई तुमचे खुप पास झालेले आहेत आता कृपा करा की पास घ्यायला येवू नका, मी त्या दिवशी त्यांना हो म्हणलं पण पास घेणे अनिवार्य होतं कारण आम्ही दोघे फिरु शकत नाहीत कारण प्रभाग मोठा आहे. टिमने आमच सगळ काम केलं. आता मंगलाताईनी सांगीतल की हार्डीकरजी जिथे व्हिजीट देतात तीथे सांगतात की हे असं असं व्हायला पाहीजेल, या या योजना व्हायला पाहीजे. पण त्या योजना परत व्यवस्थीत होतात की नाही हे त्यांनी परत आपल्या अधिका-यांना विचारल पाहीजे. हार्डीकरजी आपल्याला मी परवा फोन केला त्याचा मी या सभागृहात परत उल्लेख करणार नाही परंतु ते तुम्ही परत तपासून पहा. तुम्ही सुचना देतात तेवढयापुरत होतं. अधिकारी शंभर टक्के काम करतात पण काही कारणांनी ते काही कारणांनी राहत असेलतर त्यासाठी परत उपाययोजना कराव्यात. डॉ.रॉय, डॉ.साळवी सरांना मी खरोखरच धन्यवाद म्हणेल. आम्ही महीला आहोत काही वेळेला आम्हांला फोन करायला बंधन असतं. पण डॉ.रॉय सरांना आणि डॉ.साळवी सरांना काही काही वेळा मी रात्री फोन केला. तसे आमचे शेजारचे आहेत, पण आमचे परिचीत आहेत त्यांनी आम्हांला सांगीतल की आमच्या शेजारी आहेत ते बाहेरुन आलेले आहेत. पण आमच नाव न सांगता तुम्ही हे पालीकेला कळवा. तर ते त्यांनी दोन तासाच्या आत त्या पेशंटला उचलून नेऊन उपाययोजना केलेल्या आहेत. त्यांची मी क्षमा मागीतली की रात्री मला फोन करावा लागतो, आम्ही फोन करायला नको आम्ही महीला आहोत. ते म्हणाले ताई का असा विचार करता अशावेळेला. असा विचार करु नका तरी मी डॉ. रॉय सरांचे आणि डॉ.साळवे सरांचे धन्यवाद मानेल. हार्डीकरांची जी ही टिम आहे म्हणजे आतापर्यंत जे कॉमेन्ट झाले होते तीन वर्षापर्यंत आम्ही असे ऐकत आहोत की सध्या हार्डीकरांची बदली होणार आहेतर मला सगळयांच्या वतीने असं म्हणायच आहे की त्यांची

बदली तुम्ही करु नका, जर केलीतर महामारी पावसाळयामुळे तर पसरेलच पण बाकीच्या दुकान उघडले त्यांनी पसरेल. पण आता त्यांच जे काम चालल आहे ते खुप चांगल चाललेल आहे. जर त्यांची बदली केलीतर महामारी वाढलीतर जास्तीचे जबाबदार आपण धरु. आपण म्हणतो माणूसकी कुठेतरी हारवलेली आहे. पण ती माणूसकी मला या काळामध्ये खुप छान दिसली. प्रभागातच नाहीतर प्रभागाच्या बाहेरचे जरी लोक काही आलेले आहेत मी तर मागे एकनाथजीनां सांगीतल तर दोन चार ठिकाणी एकनाथजीन पुरवल कारण की माझे लोक जाऊ शकत नव्हते. वाल्हेकरवाडीच्या लोकांचे आमच्याकडे फोन आले, म्हणजे असे ठरवलेले नाही की माझा प्रभाग आहे म्हणून माझ्या प्रभागातीलच काम करणार, नगरसेवक म्हणून कोणीही काम केल नाहीतर जनसेवक म्हणून माझ्या बंधु-भगिनीनी सगळयांनी काम केलेलं आहे. महापौर ताई आपणही ज्येष्ठ आहात मी पण ज्येष्ठ आहे, ज्येष्ठाना जास्त भीती आहे पण तुम्ही ज्या हिरीरीने उतरला आहात ते खरच आहे. मंगलाताईनी म्हणल्याप्रमाणे एका रथाचे दोन चाक आहेत तुम्ही आणि प्रशासन ते खुप चांगल्या प्रकारे काम करतात. पण हार्डीकरांना मी परत सांगेन आपले पुर्ण शहरातले जे दवाखाने आहेत तीथ पेशंटला घ्याव. काही काही वेळेला पेशंट अक्षरशः दोन दोन दिवस बाहेर बसलेला आहे. वायसीएमच तर काम चांगलच आहे. जे प्रायव्हेट दवाखाने आहेत जस स्टर्लींग आहे, बिर्ला आहे, आमच्याकडे धन्वंतरी आहे अशा सगळयांना घेवून काही जी माणस आहेत की ज्यांची परिस्थिती नाही त्यांना काही तरी कन्सेशन्स दयाव. दुसर म्हणजे आपण जशी गॅसची सबसिडी सोडली तसे आपल्यासारखे काही लोक आहेत की जे सदन आहेत विचाराने आणि परिस्थितीनी सुध्दा त्यांनी सबसिडी न घेता जे टॅक्स भरु शकत नाहीत त्यांना खरोखरच सवलत दयावी, हा विषय त्यांनी खुप चांगला मांडलेला आहे. मी सगळया प्रशासनाच, आरोग्याच आणि त्यांनी म्हणल्याप्रमाणे चतुर्थश्रेणीच खरोखरच मी धन्यवाद म्हणेल. पाच वाजताच ते झाडायला लागतात. सगळयांनीच खुप छान काम केल आहे. पण हार्डीकरजी मी परत सांगेल तुम्ही जिथे जिथे योजना राबवायला सांगता, हे असं करा ते तसं करा इथली फवारणी झाली पाहीजे. परंतु या गोष्टी न होता ती परत परत तेवढया दिवसापुरती होती का नाही, तीथे भेटायला येणारे लोक खरच येतात की नाही का ते थांबलेल आहेत. ही तुम्हांला शाबासकीची थाप मिळालेली आहे, मी असं म्हणत नाही पण त्याच्याबाबत जबाबदारी पण जास्ती मोठी झालेली आहे. ती जबाबदारी तुमची नाहीतर त्या जबाबदारीची वागणूक आम्ही सुध्दा लोकांना देणार आहोत. तेवढीच जबाबदारी आमचीही वाढलेली आहे. पण तेवढ प्लीज बघाव एवढ मी म्हणत आणि थांबते, जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. केंद्रशासन, राज्यशासन आणि महापालिकेत ख-या अर्थाने ते शाबासकीचे हाक्कदार आहेत. परवा आयुक्त साहेब आपली मुलाखत पाहील्यानंतर आम्ही सगळयांनी सांगीतल की हार्डीकर पॅटर्न हा संपुर्ण राज्यभर राबवला गेला पाहीजे. आम्ही खुप आयएएस अधिकारी पाहीले, कार्यक्षम पण पाहीले. नियमाला धरुन चालणारे पण पाहीले, अत्यंत प्रामाणिक पाहीलेत. परंतु आपल्याला सर्व पक्षाला बरोबर घेवून चालणारा आम्ही एकमेव अधिकारी पाहीलेत आणि ते म्हणजे आपल्या महानगरपालिकेचे सन्मा.आयुक्त श्रावणजी हर्डीकर यांच मी मनापासून अभिनंदन करते आणि आभारही मानते की तुम्ही खुप चांगल या शहराला संभाळल. त्याच बरोबर त्यांचे सहकारी असतील, अति.आयुक्त दोन्ही संतोष पाटील साहेब, आणि अजीत पवार साहेब यांनी चांगल काम केल आहे. पासच्या संदर्भात अत्यंत उत्कृष्ठ असं काम केलेल आहे. नगरसेवकांची तक्रार आली की लगेच जायचे त्याठिकाणी जाऊन पाहणी करायचे, आपल काय कर्तव्य आहे, नगरसेवकांनी काय केल पाहीजे, तीथल्या स्थानिक लोकांनी काय केल पाहीजे. खूप उत्कृष्ठ अशी टिम आयुक्त साहेब आपण याठिकाणी बांधली होती. मा.महापौरांच विशेष करुन अभिनंदन. आपण आम्हांला फोन केला ताई कशा आहेत, ब-या आहेत का. खरतर आम्ही तुम्हांला फोन करायला पाहीजे होता की महापौर तुम्ही काळजी घ्या. तुम्हांला खुप लोक भेटायला, समस्या सांगायला येतात. मग आम्ही तुम्हांला फोन करायला पाहीजे होता तर तुम्हीच आम्हांला फोन केला तुमचही याठिकाणी मनापासून अभिनंदन करते आणि आभार मानते की आपण वेळोवेळी योग्य मार्गदर्शन केल. आमचे पक्षनेते आहेत, स्थायी समिती चेअरमन या सगळयांनी खुप चांगल काम केलं. चांगल काम करत असताना आपल्या राज्यातून अनेक कामगार जेव्हा स्थलांतरीत होतात, आम्ही माहिती घेतली तेव्हा चार ते साडेचार लाख कामगार आपल्या शहरातून बाहेर गेले. इतका आपल्याकडे रोजगार आहे, इतक आपल शहर सदन आहे आणि ते सदन असण्याच एक घमेंड पण आहे तो अभिमान पण खुप वाटला की, हो माझ शहर अनेक लोकांच पोट भरु शकतं. त्या कामगारांचे जाताना जे हाल झाले बीचा-यांचे अनेक लोकांचे व्हीडीओ, यु-टयूब वरती, गुगलवरती आम्ही पाहीलेत. बीहारी नागरीकांनी त्यांच्या राज्यात गेल्यानंतर किंवा ज्याच्या त्याच्या राज्यात गेल्यानंतर अनेक नागरिकांनी महाराष्ट्र राज्याच खास करुन त्यांनी आभार मानलेल आहे की खुप चांगली त्यांनी आमची व्यवस्था केलेली होती. त्या सगळया कामगारांनी परत रोजीरोटीसाठी या राज्यात याव अजूनही त्यांना याठिकाणी विनंम्रपणे आवाहन करेन. आयुक्त साहेब, आपण ज्याप्रकारचे पावल उचलले आहेत, तुम्ही योध्दा आहात, रणांगणांत उतरल्यानंतर दोन्ही हातात तलवार घेवून

समोर कोण आहे याची परवा न करता त्या प्रकारच तुम्ही काम केलं तुमच्या त्या कार्याला हजारदा आमचा सलाम आहे. जी टिम आहे आणि टिमवर्कवर तुम्ही विश्वासाच वातावरण निर्माण केलं ते खूप कमी वेळामध्ये इतक चांगल वातावरण करणं शक्य नव्हत पण तुम्ही अशक्याला शक्य करुन दाखवलं. मी तर विचार करते भाऊसाहेब आपण सगळे राजकीय पुढारी आहोत. तुम्ही आम्ही इलेक्शनला उभ राहीलोतर दुसर कोणतरी उभा राहत आणि एकमेकाच वाईट बोलंत. हार्डीकरांना कोणाच्याबद्दल वाईट बोलाव लागल नाही, लोकांना फक्त सांगाव लागल की तुमचा जीव कसा वाचेल आणि तुम्ही काय केल पाहीजे. साहेब, २५ लाख लोकसंख्येच्या शहरामध्ये राज्य करणं सोप नाही आणि लोकांनी तुमच तन-मन-धनांनी ऐकलेलं आहे. इतकी कमांड यापुर्वी ना कुठल्या नेत्याला जमली ना कुठल्या अधिका-याला जमली जे तुम्हांला जमली आहे आणि तुमच यश आहे. सर्व पक्षाच्या लोकांच ऐकूण घ्यायच, प्रत्येकाला विश्वासात घ्यायच हो तुम्ही म्हणताय तसच मी करणार. नुसत तो विश्वास नाहीतर त्यादृष्टिने पाऊल सुध्दा उचलायची, जोक नाही. काम करतो तो चुकतो आणि काम करत असताना थोडयाफार जर का चुका झाल्या असतीलतर त्या ऍक्सेप्टेबल आहे. कारण का शहर, शहराची लोकसंख्या वेगवेगळया असणा-या व्यक्ती तीतक्या प्रकृती आणि त्यातन तुम्ही घेतलेले निर्णय. तुम्ही म्हणले मंडई बंदतर, बंद. तुम्ही म्हणले रिक्षा बंदतर, बंद. मिरॅकल होतना, मिरॅकल अभिप्राय आहे. आणि मिरॅकल एका हार्डीकर नावाच्या व्यक्तीच्यामुळे या शहरामध्ये घडलं. त्याचबरोबर या शहरामध्ये ज्या पक्षाच्या वतीने इथे सत्ता आहे त्या सत्तेत सहभागी असणा-या सगळया माझ्या नेत्यांच सुध्दा आहे. जे या ठिकाणी विरोधी पक्षात आहेत पण राज्यात सत्तेत आहेत त्यांच सुध्दा तीतकच यश आहे कारण की कुणीही तुमच्या निर्णयाच्या विरोधात ब्र शब्द सुध्दा काढलेला नाही. आमचे दोन्ही आमदार असतील, लक्ष्मणभाऊ जगताप असतील, महेशदादा असतील तीसरे आमदार पिंपरीचे आण्णा बनसोडे असतील, दोन्ही खासदार असतील सगळयांनी, अगदी विरोधी पक्षातील असतील, सत्तेतील असतील सगळयांनी तुमच्या बरोबर मिटींग घेतल्या, महानगरपालिकेची वॉररुम बघायला आले आणि काय उपाययोजना केलेल्या आहेत त्याच लोकांनी भरभरुन कौतूक केलेलं आहे. अनेक विषय आहेत, आयुक्तांनी चांगल केल, आयुक्तांनी लॅब चालु करावी म्हणून आम्ही मागणी केली. साहेब, आपण लॅब सीएसआरमधुन करता असं आता एक मी पत्र वाचलेल आहे. आम्ही त्याच्यावरती काही गोष्टी सुचवलेल्या आहेत त्याच्यावरती अंमलबजावणी करावी. तुम्ही करु नयेत या मताचे नाहीत परंतु करत असालतर ते योग्य पध्दतीने झाल पाहीजे म्हणून आमची एक सुचना आहे. ती मांडायची का नाही हे निश्चितपणे तुम्ही तेवढे जबाबदार आहात आणि

इतक चांगल शहर तुम्ही सांभाळलेल आहे आणि पुढेही चांगलच सांभाळणार आहात. आमच्या ज्या सुचना आहेत त्याच्यावर आपण अंमलबजावणी निश्चितपणे करावी याच मताची मी आहे. या शहरातील अनेक मंडळ असतील त्यामध्ये चिंचवड भागातल्या अनेक मंडळानी याठिकाणी खुप चांगल काम केलं. आमचा राष्ट्रीय सेवकसंघ आहे (आरएसएस) यांनी सुध्दा अत्यंत उत्तम काम याठिकाणी केलेलं आहे. मा.पवार साहेब आपल्याबरोबर उभे राहून त्यांनी जेवण वाटपाच असेल, जेवण तयार करण्याच असेल, औषध पुरवण्याच असेल, विश्व हिंदू परिषद असेल, अनेक मंडळ आहेत, पिंपरीतले तर अगदी कौतूक कराव असं व्यापारी मंडळ डब्बू आसवाणीच मित्र मंडळ आहे. उत्कृष्ठ अस काम केलेल आहे. संदिप वाघेरे यांच्या मंडळानी काम केलेलं आहे. या सगळयांनी भरभरुन काम केलेलं आहे. त्याच बरोबर आपण धान्यासाठी रेशनिंगच्या दुकानावरती लाईन लावण्यासंदर्भात आमच्या सारख्या नगरसेवकांवरती जबाबदारी टाकली आम्ही पण ती जबाबदारी अत्यंत उत्तम पणे पार पाडली. आपली जेवणाची व्यवस्था २० तारखेला बंद केलेली आहे. वृत्तपत्रामध्ये बातम्या पण झळकल्या, मी निगेटीव्हली नाही घेत मी सगळ पॉझिटीव्हली घेते, त्या बातम्याचा मी बाकीचा विषय सोडून मी असे म्हणेल की सगळया नगरसेवकाला आपल्याला सगळयांना माहितीच आहे की आपण इलेक्शनच्या काळामध्ये अनेक दिवस अनेक कार्यकर्ते आपल्यासाठी झटत असतात तर आपल्याकडे जेवणाची व्यवस्था आपण करतोच. महापालिकेच जे कर्तव्य होत तेतर होतच त्यांनी त्यांच कर्तव्य पार पाडलेलच आहे. आपल एक कर्तव्य आहे की ते आपण दोनशे, चारशे लोकांची नियमीतपणे जबाबदारी आपण उचलू शकतो. सगळयाच गोष्टी सरकारवरती टाकून होणार नाहीततर स्वतःच्या खीशाला सुध्दा आपल्याला झळ दयावी लागणार आहे. माझ्या वॉर्डामध्ये, अजूनही माझ्या स्लम ऐरीयामध्ये खंडे वस्ती असेल, बालाजीनगर असेल, गणेशनगर असेल, गवळीमाथा असेल, या एकाही स्लम मध्ये एकही अजून पॉझिटीव्ह रुग्ण सापडलेला नाही. साहेब, स्लममध्ये लोकांनी स्वतःला क्वॉरंटाईन करुन घेतलेलं आहे. स्वतः रस्ते बंद केलेल आहेत. तुम्ही जरी २० तारखेला जेवण बंद केलेल असलतरी आज त्याठिकाणी माझ्या वतीने दररोज ४०० लोकांच जेवण चालू आहे. कारण की साहेब, हातावर पोट असणारी लोक आहेत. काकानी अनेक नगरसेवकांनी तुम्हांला सुचना केलेल्या आहेत की ज्यांच हातावरच पोट आहे अजून कंपन्या चालू झालेल्या नाहीत. ज्या ज्या कंपनीवाल्यांना सांगीतल होतं की तुम्ही अर्धा पगार करा, निम्मा पगार करा त्यांनी कुणीही कामगाराला पगार दिलेला नाही. उपासमार आहे, स्लम मध्येतरी काही प्रमाणात आमच्यासारखे लोक असतील, अनेक स्वयंसेवी संस्था असतील काम करतात. पण ख-या अर्थानं जो छोटया फ्लॅटमध्ये राहतो, छोटया घरामध्ये राहतो

चाळीमध्ये राहतो त्यांची खरच अडचण आहे. “आई जेऊ घालीना आणि बाप भिक मागू देईना” ईज्जतीचा विषय आहे त्यामुळे कुठे जाता येत नाही. आता आपण पाच पाच किलो तांदूळ देणार आहोत. अजीत पवार साहेब तुम्ही सांगीतल की ज्यांच्याकडे रेशन नाही किंवा घरामध्ये रेशनकार्ड आहे पण माझ नाव त्याच्यामध्ये नसेलतर मला सुध्दा पाच किलो तांदूळ तीथे मिळणार आहेत. साहेब, माझ्या वॉर्डातून जवळपास चार हजार अर्ज माझ्याकडे आलेले आहेत. तीस तारीख लास्ट डेट होती तुमच्या ऑफिसला सुट्टी होती म्हणून फॉर्म दिलेला नाही परत ते फॉर्म घ्यावे आणि खास करुन आमच्या भागातले सर्वात जास्त त्याठिकाणी लाभार्थी आहेत तर तीथे तुम्ही कुठल दुकान दिलेल नाही. तरी त्याठिकाणी दुकान आपण चालू करुन दयाव. त्याच बरोबर इंद्रायणीनगरला सोळासे फॉर्म झालेले आहेत त्याठिकाणी सुध्दा एक नवीन किंवा जे कुठल असेल ते दुकान चालू करुन दयाव. विशेष आपल्याला विनंती अशी आहे की आपण सगळया अधिका-यां बरोबर बोलता. परवाला इंद्रायणीनगरमध्ये तुरीची डाळ रेशनिंगवरती आली आणि पारेख म्हणून नावाचा दुकानदार आहे त्यानी हारबारा डाळ दिली. आणि ज्यांना मार्च महीन्यात किंवा एप्रिल महीन्यात धान्य दिल त्यांना मे महीन्याचा शिक्का मारुन दिला. एका माणसाच्या पाठीमागे पाच किलो धान्य होततर आख्ख्या कुटूंबाला पाचच किलो धान्य दिलं. अशा अनेक तक्रारी तुम्हांला मिळणार आहेत. माझी विनंती आहे की त्याच्यासाठी सुध्दा तुम्हांला अधिकारी स्तरावरती की जे रेशनिंगचे आहेत त्या लोकांना आपण बरोबर घेवून जर का त्यांनी निश्चित करुन दिले, आम्हांला जर का तुम्ही संधी दिलीतर निश्चितपणे आम्ही आमची जबाबदारी त्याठिकाणी पार पाडणार आहोत. कारण की सेंट्रल गव्हर्मेंट असेल किंवा राज्यशासन असेल यांनी एवढी मेहनत घेतलेली आहे यांच्या पर्यंत धान्य पुरवण्याची आणि हे जर धान्य या लोकांच्या घशापर्यंत जात नेसलतर ज्यांनी याचा काळाबाजार करायचा प्रयत्न केलेला आहे यांच्या घशात हात घालून काढायची वेळ आलेली आहे. चिड येते, कारण की तुम्ही बाकीच काय करता त्याच्याशी आम्हांला घेणं देणं नसतं. परंतु यावेळेस खरच लोकांना त्याची गरज आहे आणि त्या गरजेपासून काही लोकांना वंचित ठेवण्याच काम केलेल आहे. वायसीएमची टिम आहे, डॉ.वाबळे असतील, डॉ.साळवे असतील आणि आरोग्याची टिम डॉ.रॉय आणि चतुर्थश्रेणी कर्मचा-यांच किती कौतूक कराव तेवढ कमी आहे. आम्ही सगळे पांढरपेसे म्हणजे अनेकदा जीवाला घाबरुन घरात बसतो. पण ज्यांना खरच मी बाहेर नाही गेलोतर माझ्या घरी चुल पेटणार नाही असे जेवढे कामगार होते ते सगळे कामगार रस्त्यावरती होते आणि बक्षीस म्हणून त्यांना जर काही आपल्याला एखादी रक्कम देता आलीतर साहेब, त्यांच कौतूक करता आलतर अजीबात हात आखडता घेवू नका.

सर्वपक्षीय नगरसेवक आम्ही तुमच्या बरोबर आहोत. कारण या टिमनी स्वतःचा जीव धोक्यात घालून काम केलेलं आहे. वायसीएमला जेवढे डॉक्टर आहेत त्या डॉक्टरांना वेळेवर पगार दिला पाहीजे. डिसेंबर महीन्यामध्ये आपण डॉक्टरांच्या मुलाखती घेतल्या होत्या ७४ डॉक्टर आहेत. विधी समितीला तुम्ही विषय पाठवला त्यांचा नियमतीकरणाचा जो पीसी वरती झाला, प्रोफेसर म्हणून घेत होतो वेगवेगळया डिपार्टमेंटसाठी डॉक्टर लोकांची आपण भरती केली अजून पर्यंत तो विषय तसाच पेंडीग आहे. आयुक्त साहेब तुम्हांला विनंती आहे की आमच्या कमिटयावरती अवलंबून न राहता जे अधिकार तुमचे आहेतना त्याच्यावर तुम्ही खरोखर अंमलबजावणी करा. ते डॉक्टर सेवेत आहेत. आज त्यातला एक डॉक्टर पॉझिटीव्ह आहे. तुम्हांला माहीती आहे वायसीएमला काम करणारा आपला एक रेडीओलॉजीस्ट पॉझिटीव्ह आहे, काय संबंध आहे साहेब. जे पोलीस रात्रंदिवस रस्त्यावरती डयूटी करत होते हे पण माझ्या रक्तानात्यातले कोणच नव्हते, त्यांनीही डयुटया केलेल्या आहेत, महापालिकेच्या चतुर्थश्रेणी कर्मचारी, महापलिकेचे अधिकारी असतील, अनेक संस्था असतील ज्यांनी लोकांच्यासाठी काम केलं आणि जिथे लोकांच हित आपल्या डोळयापुढे येते की ज्या कठोरपणे तुम्ही या शहरामध्ये या सगळया गोष्टी राबवल्यात तेवढयाच कठोरपणे डॉक्टरांच्या बाबतीत आपल्याला निर्णय घ्यावा लागेल. याच्यासाठी जास्त वेळ वाट पाहू नका. कुणाला राग येतो कुणाला काही वाटत काही देणंघेणं नाही साहेब. विषय आला त्या दिवशी मंजूर झाला पाहीजे नाही झालातर इट्स ओके. आता ईमरजन्सी आहे, ईमरजन्सीमध्ये अजून सुध्दा आपण वाट बघता. अनेक डॉक्टरांना मोठमोठे हॉस्पिटल पगार देवून बोलवतात. कोव्हीडच्यामुळ देशविदेशातून मागणी आहे डॉक्टरांना. पुढच वर्षभरतरी आपल सुधारणार नाही. मा.मुख्यमंत्री यांनी सांगीतल की आपल्याला कोव्हीड बरोबर जगायच. मा.पी.एम.साहेबांनी सांगीतल की आपल्याला कोव्हीड बरोबर जगायच आणि जगायच असेलतर तुम्हांला आरोग्याच्या सुविधा सुध्दा तीतक्याच टॉपमॉस्ट लागतील. कायमस्वरुपी आता म्हणजे असं की हातपाय धुवूनच घरात यायच, घराबाहेर चप्पल काढायची. आम्ही आधुनिकतेच्या मध्ये हे सगळ विसरलो होतो आता त्याची परत आम्ही अंमलबजावणी करतो. मी जर म्हणत असेलतर तीन महीने एकही कुठलही पेनक्यूलर घेतल नाही, कुठलही औषध घेतल नाही काहीच नाही म्हणून काहीच झाल नाही. पण हे जर काही रेग्यूलर असतंतर माझ पोट काहीतरी दुखत होत मी डॉक्टरकडे पळत होते. जो हॉस्पिटलवरचा ताण होता तो ऍटोमॅटीक कमी झाला. म्हणजे मानसीकता बदलली. त्याच श्रेय तुम्हांला गेल पाहीजे या गोष्टींच सुध्दा. आता ज्या प्रायव्हेट डॉक्टरांवरती ज्या प्रकारचा ताण येतो किंवा घाबरल्या जातात, घाबरुन लोकांनी हॉस्पिटल उघडलेले नाहीत. तुमच परत

एकदा अभिनंदन करेन की तुम्ही वायसीएमला कोव्हीडचे पेशंट ठेवले त्याच बरोबर तुम्ही आदित्य बिर्ला मध्ये, तुम्ही सांगत का नाहीत, तुम्ही सांगीतल पाहीजे. आयुक्त साहेब तुम्ही किती चांगल काम केलेल आहे. आदित्य बिर्लाला आपल्या वायसीएम मधुन रेफरन्स घेवून गेलतर कुठल्याही आजारावर तीथही आपण मोफत सोय केलेली आहे. केवढा मोठा विषय आहे हा. माहीतच नाही, मला कसं माहीत झालतर माझ्या वॉर्डातली बालाजीनगरची एक महीला गरोदर होती आणि तीच सिझर करायच, डॉक्टरांनी रेफर केल. वायसीएममध्ये घेतल नाही, डीवाय पाटीलमध्ये व्यवस्था नाही होवू शकली. मॅडमला फोन केला त्या म्हणाल्या ताई पाठवा माझ्याकडे भोसरीला किंवा मग आदित्य बिर्लाला पाठवू शकता. मी म्हणल आहो, स्लम मधली बाई आहे त्या म्हणाल्या अजीबात काही काळजी करायच कारण नाही. इथला रेफरन्स घेवून गेले की आपण तीची काळजी घेणार आहोत. एवढा मोठा साहेब, तुम्ही विषय करता आणि तुम्ही तस सांगाना. आवडेल आम्हांला तुमच ऐकायला साहेब. आम्हांला अभिमान वाटतो तुम्ही एवढया सगळया गोष्टी केल्यात, अनेक हॉस्पिटल तुम्ही ताब्यात घेतले आहेत. काही हॉस्टेल्स ताब्यात घेतले. आमच्याकडचे घेतलेले आहेत आम्ही कुठेही वाच्छता केलेली नाही. आज या सगळया ठिकाणी इतक छान तुम्ही नियोजन केलेल आहे. त्या तुमच्या नियोजनाला जितकी दाद दयावी तेवढी कमी. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे जितके नगरसेवक आहेत जेवढया संस्था आहेत त्या सगळयांच मी मनापासून अभिनंदन करते, आभार मानते आणि ज्यांनी ज्यांनी कोव्हीड पेशंट पासून बचाव झाले आहेत, घरी आलेले आहेत त्यांचे अभिनंदन केलेले आहे त्या सगळया नगरसेवकांच याठिकाणी आभार आणि आयुक्त साहेब परत एकदा तुमच मनापासून आभार मानते तुमच अभिनंदन करते तसेच संपुर्ण टिमच अभिनंदन करते आणि वायसीएमच्या संदर्भात ज्या काही सुचना आहेत, आता आम्ही दररोज बातम्या वाचतो. त्रास होतो साहेब, बातम्या वाचताना परंतु पॉझिटीव्हली घ्या, दुरूस्ती करा नसेलतर पुढे जा पुढचा कोण असेल त्याला घ्या. विषय आला, विषय तुम्ही जागेवर मिटवलातरच आम्हांला आनंद आहे. कारण की आज तुमच्या अभिंनदनाचा ठराव आहे म्हणून मगाशी म्हणल मी बोलता बोलता थांबू यात. बोलल पाहीजे कारण बोलण्यातच आपण सुधारणार आहोत. मा.महापौर साहेब, आपण विशेष करुन काळजी घ्या आपण सगळयांची काळजी घेता. तुम्ही माई आहात आमच्या आईसारख्या आहात तुमच्या प्रकृतीची तुम्ही तेवढीच काळजी घ्यावी. याठिकाणी मी या भागातील सर्व लोकप्रतिनिधीच मनापासून आभार मानते आणि थांबते, जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सभागृहाच्या वतीने, शहराच्या वतीने मा.महापौर साहेब मी तुमच अभिनंदन करतो. तुम्ही या शहराचे प्रथम नागरीक आहात, तुम्ही म्हणजेच नागरीक आणि नागरीकांनी चांगल्या पध्दतीने साथ दिली, कारण आपण किती निर्बंध टाकले, किती त्यांच्यावर मार्गदर्शन करतो त्यांच्यावर लादायचा प्रयत्न केलातर ते कितपत मान्य करतात आणि सहकार्य करतात त्यावर खर त्याच नियंत्रण आहे. आणि म्हणून शहरातील तमाम नागरीकांच सुध्दा अभिनंदन. एवढी कमी संख्या रोखण्यामध्ये आपल्याला हे यश आलेलं आहे. त्यासाठी तुम्ही स्वतः महापौर म्हणून, पदाधिकारी सर्व, प्रशासन सर्व मा.आयुक्त असतील, पवार साहेब असतील, संतोष पाटील साहेब असतील डॉक्टर्स असतील त्यांची सर्व टिम्स, पोलीस कर्मचारी, पत्रकार या सर्वांचेच प्रयत्न आहेत. अनेक नगरसेवकांनी सुध्दा आपआपल्या पध्दतीने आपआपल्या वॉर्डामध्ये त्यांनी मदत करायचा प्रयत्न केलेला आहे. लोकांना सहकार्य करायचा प्रयत्न केलेला आहे. सर्वांच्याच प्रयत्नाला हे यश आहे. मा.महापौर साहेब, अशाच पध्दतीने पुढल्या काळात सुध्दा आपल्याला काळजी घ्यायची आहे. मगाशी मंगलाताईनी एक विषय मांडला होता की एखादा पेशंट जर त्या भागामध्ये सापडलातर आपण साधारणतः ५०० मी. किंवा १००० मी. ऐरीया सिल करतो. मुंबईमध्ये चहल साहेब आयुक्त आहेत त्यांनी पर्टीक्यूलर त्या बिल्डींगलाच सिल करायचा प्रयत्न केला आणि तीथ ते यशस्वी झाले. एखादा फ्लॅट असेलतर त्याला शंभर टक्के सिल करता येत का आणि तीथ आपल्या वॉर्डातील वॉलींटरस आहेत ते वॉलींटरस आम्ही स्वतः तीथ तास दोन तास त्याची डयुटी ठेवून नेमू शकतो. त्यांना काही लागणा-या गोष्टी असतीलतर त्या आम्ही देवू शकतो. संततुकाराम नगरमधले मी तुम्हांला उदाहरण देतो. गंगास्काईज म्हणून सोसायटी आहे त्या सोसायटीमध्ये साधारणतः चारशे फ्लॅटस आहेत. त्याठिकाणी त्या लोकांनी त्यांची मिटींग बोलवून त्यांनी ठरवल की बाहेरच्या लोकांना येवू दयायच नाही. सिक्युरीटीवाल्यांना त्यांनी चेक करुन घेतल आणि कुणालाच परवानगी दिली नाही जायला पण नाही आणि यायला पण नाही. काही दिवसानंतर सोसायटीतली लोक बाहेर यायला लागली दरम्यानच्या काळात सोसायटीचे जे चेअरमन शर्मा म्हणून आहेत त्या शर्माचा मुलगा आणि त्याची सुण हे कॅनडावरुन आले. डॉ.रॉय सरांनी डॉक्टर पाठवून त्यांची तपासणी केली ते ओके होते त्यांचा काही प्रॉब्लेम नव्हता परंतु सोसायटीच्या लोकांनी त्यांना चौदा दिवस अस क्वॉरंटाईन केल की त्या फ्लॅटच दारच उघडू दिल नाही. त्यांना काय लागेल ते सोसायटीचे वॉचमेन जावुन त्यांना तीकडे दयायचे आणि ते फोन वरुन सांगायचे. मग अशा पध्दतीच सुध्दा क्वॉरंटाईन होवू शकतं जेणे करुन इतरांना त्रास होणार नाही. कारण ते

राहतात तीस-या मजल्यावर कॉमन लिफ्ट वापरलीतरी त्याचा संसर्ग होवू शकतो. त्यामुळे त्यांनी बाहेर यायचच नाही. त्यामुळे त्यांच म्हणण असं होत की एखादयामुळे दुस-याला प्रॉब्लेम आलातर इतर सर्वाना वेठीस धरता कामा नये. त्यासठी आपल्याला काही सोल्यूशन काढता येतं का हे बघण पण तीतकच गरजेच आहे. तरी त्यात कसं आपल्याला सहकार्य करता येईल हे आपण पाहण गरजेच आहे. दुसरी गोष्ट म्हणजे फुलेनगर मध्ये काल परवा एक रुग्ण सापडला. आमच्याकडे चार लोकांच्या डॉक्टरांची एक टिम आहे. त्यांनी सांगीतले की आम्ही रोज तीन तास तुम्ही म्हणाल तीथे काम करायला तयार आहोत. त्यांना किट दयायचे आहे. व्हिटॅमीन सी च्या गोळया, बी कॉम्प्लेक्स गोळया वगैरे देतील. ते स्वतः त्याठिकाणी लोकांना चेक करतील. ते म्हणाले कॅम्प भरवा चारशे लोकांना रोज आम्ही तपासू. तशा पध्दतीच कोणी आम्हांला पॉझिटीव्ह वाटलतर डायरेक्ट वायसीएमला कळवू. अशा प्रकारची डॉक्टरांची टिम सुध्दा आहे. माझी पण विनंती आहे की इतर वॉर्डातील नगरसेवकांनी पण आपआपल्या वॉर्डामध्ये अशा पध्दतीने काही एनजीओ असतील, काही डॉक्टर्स असतील ते स्वतःहून पुढे येवून अशाप्रकारे सहकार्य करणारे असतीलतर आपल्याला तो हातभार लागणार आहे. आम्ही आता तो प्रयोग फुलेनगरमध्ये करणार आहोत. आम्ही अधिकृत पत्र आयुक्त साहेबांना लिहीणार आहोत. यामध्ये आम्ही काय काय काळजी घ्यायला पाहीजे आणि काय काय केल पाहीजे कारण ते स्वतः डॉक्टर्स आहेत. त्या डॉक्टरांनी सांगीतल की आम्हांला फक्त तुम्ही किट दया आणि टेम्परेचर चेक करण्याच जे मशिन आहे ते मशीन आणि व्हिटॅमीन सी च्या गोळया ज्या आहेत त्या गोळया आम्हांला दिल्यातर आम्ही तीथे जागेवर चेकआऊट करतो. फुलेनगरमध्ये एक सापडला आहे तर त्याच्या आजूबाजचे जे दोन-चारशे घर आहेत त्या ठिकाणी तुम्ही ठरवा तसं त्याला नंबरीग देवू त्या नंबरींग प्रमाणे त्यांच्या घरातील लोकांनी यायच आणि ते चेकींग करुन आपल्याला सहकार्य करायला तयार आहेत. तरी अशा पध्दतीने प्रयत्न केलातर तो ऐरीया बंदिस्त करण्यापेक्षा त्या लोकांना आपण लवकर चेक करु शकतो आणि जे बाधित असतील त्यांना क्वॉरंटाईन करता येईल. अशा पध्दतीचा प्रयत्न आपण करावा अशी आपल्याला विनंती आहे. पुन्हा एकदा आपण सर्वानी खुप अतीशय सुंदर अस काम केलेल आहे त्याबद्दल तुम्हांला धन्यवाद दयावेत तेवढे कमी आहेत. आयुक्त साहेब तुमच कौतूक कराव तेवढ कमी आहे, धन्यवाद.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मला खरतर नामदेवरावांच मनापासून अभिनंदन करायच आहे. कोरानाच्या या तीन महीन्याच्या लढाईमध्ये मा.आयुक्त असतील त्यांच्या सर्व टिमच, पोलीसांच, सफाई कर्मचा-यांच, वैदयकीय डॉक्टरांच,

सगळयांच अभिनंदन करण्याचा ठराव याठिकाणी मांडला गेला. मला अभिमानही तेवढाच वाटला की सगळया पक्षाच्या सगळयाच नेत्यांनी मनापासून म्हणजे कुठेतरी थोडस आपल्या मनामध्ये एखादयाच अभिनंदन करायला अभाव ठेवावा अशा पध्दतीची परिस्थिती नाही केली. सगळया नगरसेवकांच मी याठिकाणी अभिनंदन करतो आणि विशेषतः या दोन आडीच महीन्याच्या कालावधीमध्ये सगळयांनी म्हणजे सगळयांच्या कुटूंबातील माणस सांगत होती की तुम्ही बाहेर नका पडू तुम्ही स्वतःची काळजी करा परंतु समाजासाठी तुम्ही जर का रस्त्यावर येवून या शहरामधल्या लोकांना मदत केली तर खरतर त्यांच मनापासून अभिनंदन करतो. मी अधिक वेळ घेणार नाही मला माहिती आहे की तीन तास झाले हीच चर्चा आपण करतो आणि सगळयांच्या भाषणामध्ये तेच तेच विषय निश्चितच आहेत. पण एवढ निश्चित सांगेल की आयुक्त साहेब तुमच ज्या ज्या वक्त्यांनी अभिनंदन केलं. मला खात्री होती की सगळेजण या निमीत्तान तुमच कौतूक करतात. परंतु यापुढचा काळ खरतर सगळयांसाठी अवघड काळ आहे. म्हणजे आज अभिनंदन केलेली ऊर्जा पुढच्या पाच सहा महीने आपल्याला घेवून जाव लागणार आहे. लॉकडावून संपत यायला आणि खरतर थोडी थोडी लोकांना सवलत मिळते. पावसाळा असल्यामुळ व लौंकही एकमेकांना भेटत असल्यामुळे यापुढील काळामध्ये थोडासा संसर्ग वाढण्याची शक्यता आहे. अजीत गव्हाणे असतील, मंगलाताईनी सांगीतल की आपल्याला याठिकाणी लॅबची व्यवस्था केली पाहीजे. ही जर परिस्थिती बघीतलीतर या सभागृहातल्या सगळया पक्षाच्या नेत्यांनी मनापासून तुम्हांला सांगीतल तुम्ही कोरोनाच्या संदर्भातील जे जे निर्णय असतील ते घ्या आम्ही सर्वजण तुमच्या बरोबर आहोत. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब माझी आपल्याला विनंती आहे की या स्थितीला आपली जी लॅब आहे ती करण्याची खरतर गरज आहे. एका बाजुला कुणीतरी सांगीतल की पुणे हे आपल्या शेजारच शहर आहे. पुण्यामधली पेशंटची संख्या बघीतलीतर जवळपास पाच हजारच्या पुढे गेलेली आहे. पिंपरी चिंचवडची परिस्थिती बघीतलीतर आपण पाचशे ते साडेपाचशेचा आकडा आज आपण ओलांडलेला आहे. खरतर हे सगळयात मोठ यश आहे. पुण्या मधल्या परिस्थितीमध्ये मागच्या एक महीन्यापुर्वी महाराष्ट्र शासनाने चांगला निर्णय घेतला की चार आएएस अधिका-यांना तीथल्या आयुक्तांना मदत करण्यासाठी दयावे लागले. मी महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन करीन परंतु आपल्या इथ याठिकाणी आयुक्तांनी आणि त्यांच्या सगळया टिमनी कुणाच्या आदेशाची वाट नाही बघीतली. एखादा पेशंट निघाला कन्टेन्मेंट झोनच्या बाबतीत होवू शकेल पाचशे मीटर सील करायचा का ती बिल्डींग सील करायची. परंतु आपल्या अधिका-यांनी त्याठिकाणी जावून कन्टेन्मेंट झोन केला आणि लोकांना त्रास झाला परंतु हे शहर अटोक्यामध्ये

आणण्याचे काम खरतर आपल्या सगळया अधिका-यांनी केलं. मी दोन महीने या महापलिकेमध्ये येवून बसतो, या सगळयांना बघतो यांच काम, खरतर आठ वाजता आलेला माणूस कधी घरी जाईल म्हणजे कमीशनर साहेब असतील त्यांचे दोन्ही ऍडीशनल अजीत पवार साहेब, संतोष पाटील साहेब आहेत, डॉ.साळवींची टिम आहे, डॉ.रॉयची टिम आहे, डॉ.वाबळेंची टिम आहे. या सगळयांच आपण मनापासून अभिनंदन केल पाहीजे. आज शहरवासीयांवर वेळ आहे यांनी आज थोडस चांगल काम केलं म्हणून आपण त्यांचे अभिनंदन करतो. परंतु यापुढच्या काळामध्ये आपल्या शहरवासीयांमध्ये अशाप्रकारचा संसर्ग अधिकाअधिक वाढणार नाही याची खरतर खबरदारी त्यांच्या कामातून करणे गरजेचे आहे. या सभागृहाच्या माध्यमातून आपल्याला विनंती करतो आपण खरतर लॅबचा विषय हा लवकरात लवकर मार्गी लावावा. एक आठवडाभरामध्ये लॅबचा विषय केलातर आपण निश्चितच यापुढच्या काळामध्ये चांगल काम करु शकू. मंगलाताई आज तुम्ही खरच बोललात एवढयासाठी की तुम्ही आरोग्य कर्मचा-यांची बाजू घेतली. चीनमधुन जो माल येतो वस्तू येतात त्याच्यावर आपण बंदी घातली पाहीजे. आपल्या देशामध्ये निर्माण केलेल्या वस्तूला आपण बाजारपेठ निर्माण करुन दिली पाहीजे. मा.पंतप्रधानाने आत्मनिर्भरतेमध्ये तेच सांगीतले. तुम्ही खरच ताई चांगल्या बोललात, तुमच मनापासून मी याठकाणी अभिनंदन करतो. माझी दुसरी विनंती आहे की आज वायसीएम हॉस्पिटलमध्ये आपण सगळयांच अभिनंदन करतो परंतु जे आरोग्य विभागाचे कर्मचारी रस्त्यावर येवून आपल्या जीवाची परवा न करता गेले दोन ते आडीच महीने जे आपल्या स्वत:चा जीव आपल्या कुटूंबाचा जीव धोक्यात टाकून त्याठिकाणी आरोग्याच काम करतात. त्यांना खरतर पगाराशिवाय आपण दुसर काहीच देत नाहीत. अशा कर्मचा-यांना महाराष्ट्र शासनाला विनंती करुन वैदयकीय विभागातले डॉक्टर असतील, नर्सेस असतील, लॅब टेक्निशियन असतील आपल्या स्वत:चा जीव मुठीत घेवून, आपल्या कुटूंबापासून अनेकवेळा दुर राहून जे काम करतात मग ती वायसीएमची टिम असेल, भोसरी हॉस्पिटलची टिम असेल, क्वॉरंटाईन करणारे जे जे अधिकारी असतील, कर्मचारी असतील किंवा कॉन्ट्रॅक्टवरील लेबर असतील, माझी तुम्हांला विनंती आहे की सभागृहामध्ये आपण म्हणतो की आपल साडेपाच हजार कोटीच बजेट आहे. पण ज्या संकटाचा मुकाबला करतात जी मंडळी स्वत:चा जीव मुठीमध्ये घेवून लढतात. सिमेवर एखादया सैनिकाच जर निधन झालतर त्याच कुटूंबीय उघड पडू नये म्हणून आपण एखादा पेट्रोल पंप असेल, एखादी शेती असेल त्याची मदत केंद्रशासन करते मला असं वाटते की पिंपरी चिंचवड महानगरपालिकाही तेवढी श्रीमंत महापालिका आहे. जे आरोग्य, वैदयकीय विभागामध्ये स्वत:चा जीव मुठीमध्ये

ठेवून कर्मचारी काम करतात त्यांनाही नैतीक अधिकारान आपण एक गोष्ट सांगीतली पाहीजे की या सर्व कर्मचा-यांना यापुढच्या काळामध्ये मी म्हणत नाही परमनन्ट करा परंतु यापुढच्या काळामध्ये सातत्याने सेवेमध्ये ठेवून जर निश्चितपणे आपण त्याच उत्तरदायित्व त्यांच्या ऋणातून आपण मुक्त होणार नाहीत अशाप्रकारची परिस्थिती येईल. मी या निमीत्तान आपल्या सर्वांच मनापासून अभिनंदन करतो आणि मंगलाताईनी ज्या पध्दतीने सांगीतल आत्मनिर्भरता म्हणजे खरतर केंद्रसरकारन् म्हणजे वीस लाख कोटीच बजेट या लोकांना दिलं. या सगळयांच्या सयमांच्या निमीत्तानं आज एवढच सांगेल की मा.पंतप्रधान असतील, मा.मुख्यमंत्री असतील आणि आपण सर्वजण या कोरोनापासूनच्या मुक्ततेच्या लढाईमधील आपण ज्यांनी ज्यांनी काम केलं त्याला सॅल्यूट करुन या पुढच्या काळामध्ये म्हणजे सांगीतल की हा कोरोना दोन वर्षे चालणार आहे कुठपर्यंत चालणार हे माहीत नाही परंतु आपल्याला कोरोना बरोबरची लढाई सोबत घेवून आपणा सर्वांना खरतर अशाच पध्दतीचे म्हणजे कोरोनाच्या या दोन तीन महीन्याच्या कालवधीमध्ये सगळयांनी राजकीय बाजूला ठेवून एक दिलांन मा.आयुक्तंच्या मागे, त्यांच्या टिमच्या मागे उभ राहीलात त्याबद्दल मी आपल सगळयांच याठिकाणी मनापासून अभिनंदन करतो आणि याठिकाणी थांबतो, धन्यवाद, जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.राहुल कलाटे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह.खरंतर नामदेवरावांनी अभिनंदनाचा ठराव मांडला आहे. चांगल काम करणा-या अधिका-यांच कौतूक केल पाहिजे. कोरोनाने संपुर्ण जगात आणि भारत देशात हाहाकार माजवला आहे. असं असताना आपण मागच्या वेळेस आपण चायनाची देखील आकडेवारी देखील क्रॉस केलेली आहे. परंतु आपण ही आकडेवारी क्रॉस करीत असताना मला वाटत १ लाख ९१ हजार पॉझीटीव्ह आणि ५३९४ ही कालपर्यंतची आकडेवारी आहे.९१ हजार पर्यंत आपण रिकव्हर केलेले आहेत. कुठं तरी पॉझीटीव्ह आपण यांच्याकडे पाहिले पाहिजे. हे करीत असताना मागच्या २/३ महिन्यामध्ये आयुक्त साहेब असतील त्यांची जी टीम असेल ज्या ज्या वेळेस टीम बदलत गेली सुरुवातील दुबईची फ्लाईट आली आणि त्यामधुन आपल्याकडे पॉझीटीव्ह पेशंट आले. त्यानंतर परिस्थीती बदलत गेली. लॉकडाऊन सुरु झाले ८ दिवस काही नव्हते. परत धान्य वाटप असेल, लोकांना पास द्यायचे असेल म्हणजे ज्या ज्याठिकाणी कमी पडेल त्या त्याठिकाणी आयुक्तांचे दोन हात पुढे असं म्हणलं तरी वावगं ठरणार नाही. एकीकडे संतोष पाटील साहेबांकडे वैदयकीयची पूर्ण जबाबदारी आणि दुसरीकडे अजित पवार यांनी या शहरात कोणाला काहीच कमी पडणार नाही याची जबाबदारी घेतली मग ते नगरसेवक असतील,नागरीक असतील आपण सर्वांनी

आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली खोत, गोफणे, डॉ.साळवी, डॉ.रॉय असतील, डॉ.वाबळे या सर्वांनी टीमवर्क काम केलेले आहे. शहरामध्ये सुरुवातीला कोरोनाचे पेशंट वाढत गेले होते आणि आयुक्त साहेब काळजी करु नका असे का म्हणतो आपण टेस्ट कमी करीत आहोत पण पुढे,पुढे टेस्ट वाढत गेल्या आम्ही मुंबईला गेलो त्यावेळेस या कोरोनाची नुकतीच सुरुवात झाली होती. त्यानंतर आपण मुंबई,पुणेची परिस्थिती सांगितली तर आपण सर्वांनी बजाज,इस्कॉनच्या माध्यमातून आपण जेवणाचे डब्बे दिले. त्यानंतर रेशनिंग चालू झालं त्यानंतर ब-याचशा लोकांनी किट वाटप केले. त्यानंतर परप्रांतीयांचा प्रवास सुरु झाला. म्हणजे जसजशी परिस्थिती बदलत गेली म्हणजे त्यामध्ये ईद असेल आमच्याकडे एक नगर जिल्हयातील कुटूंब रहात होतं त्यामध्ये ४ आणि ७ वर्षाची नगरला सोडलं आणि लॉकडाऊन सुरु झाला त्यानंतर त्या कुटूंबाला नगरला जायचं होतं त्यांना पासची आवश्यकता होती. मी अजित पवार साहेबांना फोन केला आणि त्यांच्याकडे अर्ज केला दुस-या दिवशी मी त्या व्यक्तीला म्हणले पास आणला का तर ते म्हणले की रात्रीच पास आणला आहे. म्हणजे आपले अधिकारी इतक्या तत्परतेने काम करीत असतात. त्या पालकांना आपल्या मुलांना भेटण्याची ओढ लागलेली होती. दुसरा एक अनुभव आला की, एका अधिका-याने सांगितले की, पास चालणार नाही. त्यांच्या हे लक्षात आलं नाही की, हे पिंपरी चिंचवड महापालिकेचे अजित पवार आहेत की, अजितदादा पवार आहेत मला आयुक्त साहेबांची कधी, कधी भिती वाटत होती की, आयुक्त साहेब पॉझिटीव्ह झाले तर आपणही पॉझीटीव्ह होतो की, काय परंतु अतिशय चांगल्या पध्दतीने ही परिस्थिती हाताळलेली आहे. आम्ही चांगल्या कामाला चांगलंच म्हणतो. यापुर्वीचे लोकप्रतिनिधी असतील, आयुक्त असतील म्हणजे सर्वच ज्यांनी ज्यांनी या शहरासाठी लिडरशिप केली त्यांना देखील धन्यवाद देतो. मुंबई-पुणे यांची डेव्हलपमेंट पाहिली आणि पिंपरी चिंचवड शहराची जी डेव्हलपमेंट पाहिली तर त्याला सुध्दा क्रेडीट द्याव लागणार आहे. आणि ते क्रेडीट देण्याचं काम एकनाथ पवार यांनी दाखवली आहे. या शहरासाठी ज्यांनी,ज्यांनी काम केले आहे त्यांना धन्यवाद दिले पाहिजे. एक कुटूंब कर्नाटकमधुन आले होते ते ज्या सोसायटीमध्ये रहात होते त्या सोसायटीमध्ये त्या कुटूंबाला घेतच नव्हते. सोसायटीच्या लोकांना सांगावं लागले की, त्यांना त्यांच्या घरामध्ये प्रवेश द्या असे आयुक्त साहेबांनी सांगितलेनंतर त्या कुटूंबाला घरामध्ये घेतले होते. म्हणजे आयुक्त साहेब ज्या ज्या ठिकाणी अडचण येईल त्याठिकाणी मदत करीत होते. मग ते परप्रांतीयांचे पासेस असतील, किंवा पीएमपीएमएलच्या बसेसची आवश्यकता असेल त्यावेळेस त्यांच्याकडुन मदत झालेली आहे. रात्री/अपरात्री ज्या ज्यावेळेस आम्ही संबंधित अधिका-यांना फोन केले असतील त्या त्यावेळेस

त्यांनी आम्हांला मदत केलेली आहे. संदीप वाघेरे यांनी पत्र दिलं होतं की, भविष्याची परिस्थिती खुप खराब होईल तेंव्हा तुम्ही आजपासूनच काळजी घ्या. मला वाटते आपल्या प्रशासनाने खुप  चांगल्या प्रकारे काळजी घेतली आहे. त्यामुळे आपल्या शहरासाठी विशेषता पोलीस कर्मचारी असो की, स्थापत्य विभागाचे कर्मचारी, वैदयकीय विभागाचे कर्मचारी यांनी चांगल्या प्रकारे कामकाज केलेले आहे. त्यामुळे आपण त्यामध्ये यशस्वी झालो आहे. आता येथून पुढे आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. आता लॉकडाऊन शिथिल होत आहे तरी आपल्याकडे रोज ४०/५० केसेस निर्माण होत आहेत.याचे कारण आता लोक घराबाहेर  पडत आहेत. येथून पुढची गाईडलाईन्स  लोकांना समजुन सांगितली पाहिजे. फिजीकल डिस्टंन्स, सामाजिक डिस्टन्स  पाळून   कामकाज करावे. दादांनी मागे सांगितले की, तुमचा लॅबचा प्रश्न मिटवतो. आनंदनगर मध्ये कोव्हीड १९ चा जो फैलाव झालेला आहे या झोपडपट्टीतील लोकांना तुम्ही बाहेर काढा आणि त्याठिकाणी या झोपडपट्टीचे   डेव्हलपमेंट महापालिकेला करता आलं तर बघावे. झोपडपट्टीतील लोकांकडे आपण सजग नागरीक म्हणुन पाहावे. आता बरेचशी लोक गावाला गेलेली आहेत या सर्व लोकांचा विचार करुन झोपडपट्टीचा विकास करावयाचा असेल तर संपुर्ण विचार करुन करणेत यावा. आता दिवाळीची सुट्टी येईल, नाताळचा सण येईल या सगळयांचा विचार करुन करणेत यावा.शैक्षणिक वर्षाचा अभ्यासक्रम जो आहे तो आपल्याला भरुन काढता येईल.आमच्या वाकडच्या गावातील लोक हे ५० टक्के गावाला गेलेली आहेत. या सर्वांचा अभ्यास करुन निर्णय घ्यावा अशी विनंती करतो आणि संपुर्ण राज्यामध्ये हार्डीकर पॅटर्न राबवला पाहिजे. आपण सर्वांनी एक चांगल्या प्रकारे कामकाज केलेले आहे. आपल्या कौतुकाचा भाग म्हणुन  पुन्हा एकदा आपल्या सर्वांच हार्दीक अभिनंदन करतो धन्यवाद.

**मा.तुषार हिंगे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह पक्षनेते मा.नामदेव ढाके यांनी जो अभिनंदनाचा ठराव मांडला आहे आणि त्याला अनुमोदन नाना काटेनी दिलं आहे याच्यावरुनच लक्षात येत आहे की, आपण सर्व पक्षांनी मिळून चांगल्या पध्दतीने मार्क्स करण्यासाठी प्रशासनाला मदत केली आहे. त्यामुळे सर्व पक्षाच्या गटनेत्यांचे मी आभार मानतो की, महापौरांना आणि प्रशासनाला योग्य प्रकारे साथ दिली त्याचप्रमाणे पोलिस आयुक्त आणि पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्त यांच्यामध्ये चांगला समन्वय होता त्यामुळे हे होऊ शकलं कारण बाकीच्या महापालिकेची परिस्थिती बघितली तर आज खुप वेगळी आहे. कारण मी आयुक्तांच्या बरोबर पहिल्या दिवसापासून काम करतोय की, नेहमी आयुक्तांनी जे आदेश दिलेले आहेत ते पोलिस मित्रानी पाळले  आहेत  त्यामुळे आपण ऐरिया सिल करीत होतो. आपण

चांगल्या पध्दतीने कोरानावर मात केलेली आहे. मला आयुक्त साहेबांना सांगायचं आहे की, पावसाळयात शहरामध्ये मोठया प्रमाणात रोगराई पसरेल त्यासाठी आपण प्रत्येक वॉर्डात फ्ल्यू क्लिनीक सुरु करावे कारण लोक मोठया हॉस्पिटल मध्ये जायला खुप घाबरतात यासाठी आपण प्रयत्न करावेत. झोपडपट्टीतील नागरीक असतील किंवा फ्लॅटमध्ये राहणारे नागरीक असतील आपण त्यांना हॉस्पिलची सेवा कशा प्रकारे देवु शकतो. यासाठी आपण प्रयत्न करावा. त्याचप्रमाणे आपण अन्नदान सर्व नागरीकांना देण्याची सोय केली आहे. तसेच हॉस्पिटलची मोफत सेवा नागरीकांना उपलब्ध करुन देणेत यावी. यासाठी प्रयत्न करणेत यावा त्याचप्रमाणे सर्व नगरसेवकांच लक्ष वेधतो की, गेली २२ वर्ष घंटागाडीवर जे लोक काम करतात तो विषय खुप वर्षांनी प्रलंबीत आहे तर त्यांना कशा पध्दतीने कायम करता येईल यासाठी आपण प्रयत्् करावा. कारण त्यांनी कोरोनाची भिती न बाळगता शहर कसं स्वच्छ राहील यासाठी प्रयत्न केले आहेत त्यातील काही कर्मचारी हयात नाहीत. परंतु त्याला कशा प्रकारे न्याय देता येईल यासाठी ही चांगली संधी आहे. त्यांनी चांगल्या प्रकारे काम केलेले आहे. त्याचप्रमाणे आशाताईंनी सांगितले की, इस्कॉन असेल, बजरंग दल , विश्व हिंदु परिषद असेल यांनी या कोरोनामध्ये चांगल्या प्रकारे काम केले आहे. यांना एक कोरोना योध्दा असं सन्मानचिंन्ह देवुन गौरव करणेत यावा. त्याचप्रमाणे आयुक्त साहेब आपण ज्या ज्या उपाययोजना केलेल्या आहेत त्या उल्लेखनिय आहेत त्यामुळे आपल्या शहराचे नांव महाराष्ट्रात दिसुन येत आहे. आपल्याला माझी विनंती आहे की, ज्येष्ठ नागरीकांसाठी काही स्कीम राबविता येईल का त्यासाठी आपण प्रयत्न करावा. कारण येत्या काळात अनेक ज्येष्ठ नागरीक बाहेर पडतील तर त्यांची सुरक्षा कशी करता येईल यासाठी प्रयत्न करावा. त्याचप्रमाणे मा.लक्ष्मण जगताप,आमदार आणि मा.महेशदादा लांडगे यांनी प्रत्येक ठिकाणी भाजी मंडई चालू केली आहे. आयुक्त साहेब, आपल्याकडे पोस्टमार्टमला काम करणारे कर्मचारी आहेत त्यांचाही विशेष सत्कार याठिकाणी करावा. कारण घरातील सुध्दा लोक त्याठिकाणी थांबु शकत नाहीत किंवा मयतीला जावु शकत नाहीत. त्याचप्रमाणे आयुक्त व त्यांच्या सर्व टीमचे मी आभार मानतो अभिनंदन करतो कारण त्यांनी महाराष्ट्रामध्ये आपल्या शहराचे नांव उज्वल केलेले आहे. त्यामुळे अभिनंदन करतो आणि थांबतो जयहिंद,जयमहाराष्ट्र.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह जवळपास ३ तासापासून आपल्या सर्व नगरसदस्यांनी कोरोनावरती प्रशासनाने नेमकं कशा पध्दतीने कामकाज केलेले आहे यावर चर्चा केलेली आहे. मला असं वाटत सन्मा.महापौर साहेब, ज्यावेळेस ११ मार्चला आपल्या शहरामध्ये कोरोनाची सुरुवात झाली आणि संपुर्ण राज्यामधुन चौकशी व्हायला

लागली की, पिंपरी चिंचवड शहरामध्ये एवढया मोठया प्रमाणात कोरोनाचे रुग्ण आहेत आणि कदाचित या गोष्टी लक्षात घेता आपले सन्मा.आयुक्त साहेब यांनी तातडीने ज्यावेळेला देशामध्ये ७/८ परदेशामधुन आलेल्या लोकांची तपासणी केली पाहिजे. असे आदेश असताना त्यावेळी सन्मा.आयुक्त साहेबांनी आपल्या स्तरावरती, शहराच्या स्तरावरती त्यावेळी प्रत्येक देशामधुन आलेल्या नागरीकांची त्यावेळची हिस्ट्री तपासून त्याला क्वारंटाईन तपासणी अशा पध्दतीचं नियोजन त्याठिकाणी केलं. आणि मला वाटतं ख-या अर्थानं ज्यावेळेला सुरुवात झाली ती मोठया प्रमाणावर आपल्या शहरामध्ये झाली त्याचवेळेला सन्मा.आयुक्तांनी त्याच्यावर लक्ष केंद्रीत केलं आणि त्या काळामध्ये मला आठवतं की, मगाशी सन्मा.सदस्यांनी उल्लेख केला की, सोसायटयामध्ये परदेशातुन आलेल्या लोकांना  विरोध केला जात होता परंतु त्यांना आपण सर्वांनी आणि प्रशासनाच्या माध्यमातुन सांगण्याचा प्रयत्न केला. त्याच बरोबर कमिशनर साहेबांनी त्यांच्या संपुर्ण टीमच्या माध्यमातून दवाखान्याच्या माध्यमामधुन त्यांच्या सर्व मंडळीच्या माध्यमामधुन प्रयत्न केला की,त्यांच्या प्रत्येक मंडळीशी हायरिस्क कॉन्टॅक्ट कसा आला, कोणाशी आला,कुठल्या सोसायटीमध्ये आला हे संपुर्णता त्याठिकाणी प्रयत्न केले गेले आणि ख-या अर्थांनं आपण त्या दिवसापासून कोरोनावरती कंट्रोल करण्याचा प्रयत्न केला गेला. त्यानंतर आपण मग कुठे तरी स्टेबल झालो त्यानंतर आपल्या शहरामध्ये  दिल्लीहून तबलीदीचे लोक आल्यानंतर आपल्या शहरामध्ये रुग्णांची संख्या वाढत गेली. मला असे वाटते आपल्या सर्वांना माहिती आहे त्यामुळे मी पुन्हा,पुन्हा तोच उल्लेख करणार नाही. परंतु आयुक्त् साहेब, तसेच अति.आयुक्त १ आणि २ या दोन्ही अधिका-यांच्या वरती आयुक्तांनी जबाबदारी दिली. आणि मला कळतंय की, माझी त्यावेळेला सत्तारुढ पक्षनेता म्हणुन नुकतीच नियुक्ती झाली होती. त्यानंतर हा कोरोना आला आणि त्या दिवसापासून आजतागायतपर्यंत सन्मा.आयुक्तांच्या बरोबर आम्ही त्यांच काम कशा पध्दतीनं केलं जातं याच्यावरती नियंत्रण त्यांच्याकडुन कशा पध्दतीने  केलं जातं यासंदर्भात बघत आहोत. सन्मा.आयुक्तांनी त्या कामाला सुरुवात केली गेली असे अनेक विषय आणि त्या विषयाच्या माध्यमातून आपण हाय रिस्कची तपासणी केली गेली. मोठया स्वरुपामध्ये आपण क्वारंटाईन केलं गेलं सर्व्हिलन्स टीमची नियुक्ती केली गेली. या टिमच्या माध्यमातून पॉझीटीव्ह झालेल्या रुग्णांची तपासणी केली गेली सेकंड हायरिस्क कोण आहे त्याची तपासणी केली गेली, म्हणजे ख-या अर्थाने आपण कोरोनावरती कसं कंट्रोल करु शकतो याचं आदर्श उदा. आपल्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये सन्मा.आयुक्त साहेब आणि त्यांच्या टिमच्या माध्यमातुन याठिकाणी केलं गेलं पुण्यामध्ये ज्यावेळेला या योध्दा कर्मचा-यांच्या माध्यमातुन ज्यावेळेस डॉक्टर, नर्स, सफाई

कर्मचारी, लॅब टेक्नीशियन हे सर्व कर्मचारी काम करीत असतात त्यांच मनोधैर्य वाढविण्यासाठी आपण त्यांना एक सुरक्षा कवच म्हणुन रुपये १ कोटीचे सुरक्षा कवच म्हणुन सुरु केलं. आणि ख-या अर्थांनी कमिशनरसाहेबांनी त्याठिकाणी उल्लेख केला ज्यावेळेस आपण १ कोटीचं सुरक्षा कवच देवु त्यावेळेस त्यांनी कुठल्याही प्रकारचा विचार केला नाही की, हा कंत्राटी कामगार आहे, हा अधिकारी आहे, तो परमनंन्ट कर्मचारी आहे असा कुठलाही विचार न करता तो झाडुखात्यातील कंत्राटी कर्मचारी असला तरी त्याला १ कोटीचं सुरक्षा कवच लागू केलं. मला असं वाटतं की, दुर्दैवाने घंटागाडीचा कर्मचारी त्याठिकाणी गेला आणि या सर्व लोकांना वाटलं की, आपल्या मागे कोणी तरी आहे आणि आपल्या परिवाराची जबाबदारी कोणी तरी घेत आहे या भूमिकेतून त्यांना सुरक्षा कवच या माध्यमातून त्यांना काम करण्याचं प्रोत्साहन मिळालेले आहे आणि मग दुस-या बाजुला कोरंटाईन करीत असताना फिवर फिलींगच्या माध्यमातून आपल्याला जवळपास ३९ रुग्ण सापडण्यासाठी मदत झालेली आहे. छोटया,छोटया दवाखान्याच्या माध्यमातुन सुध्दा हे फिवर फिलींगची स्थापना त्याठिकाणी केलेली आहे. त्यामुळे हा कोरोना रोखण्यासाठी सुध्दा आपल्याला मदत झालेली आहे. आपण जर बघीतलं असेल की, कोरोनांच्या संदर्भामध्ये आपण ३२ प्रभागामध्ये ३२ टिम्स कार्यान्वीत केल्या आणि या ३२ टिम्समधुन कंट्रोल ठेवण्यासाठी त्या त्या घरावर लक्ष ठेवण्यासाठी त्याठिकाणी येणारा बाहेरुन आलेला किंवा दुस-या जिल्हयातून आलेला माणुस आहे त्यावर लक्ष ठेवण्यासाठी मदत झाली. मध्यंतरीच्या काळामध्ये खुप मोठया प्रमाणावर भाजी विक्रेत्यांची संख्या वाढली कारण प्रत्येकाला वाटलं की, आपलं पोट भरण्यासाठी काही तरी व्यवसाय करावा आणि त्यामुळे भाजी विक्रेत्यांची संख्या वाढत गेली.आणि त्याच्यावर कुठं तरी कंट्रोल येण्यासाठी आमच्या शहराचे दोन्ही आमदार मा.लक्ष्मणभाऊ जगताप आणि मा. महेशदादा लांडगे यांच्या माध्यमातून मिटींग झाली सातत्याने त्यांच मार्गदर्शन झालं आणि या भाजी विक्रेत्यावर कंट्रोल आणण्यासाठी सर्व प्रभाग स्तरावरती एक योजना आखली आणि एक सेंट्रलाईज मंडई चालू केली आणि त्या माध्यमातुन प्रत्येक ग्राहकाची तपासणी केली जात होती. यामुळे प्रत्येक आलेल्या व्यक्तीची हिस्ट्री तयार करता आली एखादा रुग्ण जरी सापडला तरी त्याला कंट्रोल करता आले असते असा त्यामागचा उद्देश होता. आपण बघितल आहे की, आपल्या शहरामध्ये ज्यावेळेला चार लॉकडाऊन झालेले आहेत. आणि संपुर्ण शहरामध्ये आपण सगळे मंडळी असो, की पदाधिकारी असो यांनी आपआपल्या प्रभागामध्ये चांगल्या प्रकारे कामकाज केलेले आहे. आणि या शहरामधील अनेक संघटना यांनी आपआपल्या परीने चांगल्या प्रकारे काम केलेले आहे. त्यांचा याठिकाणी उल्लेख करणे गरजेचे आहे इस्कॉन,

अग्रेसन महाराष्ट्र समिती, काळभैरव उत्सव समिती, टाटा मोटर्स कंपनी, बजाज ऍटो गणपती मंडळ असतील यांनी आपल्या शहरामधील नागरीक कोणी भुकेपासून वंचित राहणार नाही याची काळजी आपण सर्वांनी घेतलेली आहे. आणि मला सांगायला आनंद होतो की, आणि मला सांगायला आनंद होतो की, जवळपास १ लाख २५ हजार पेक्षा जास्त लोकांना आपण गरजु लोकांना भोजन,रेशन,अन्नधान्य देण्याचं काम केलेले आहे. विशेष करुन सर्व पक्षाच्या गटनेते सातत्याने अचानक होणा-या मिटींगला उपस्थित रहात होते. त्या मिटींगाच्या माध्यमातून सुध्दा चर्चा मसलत करुन आम्ही सर्व मंडळी करीत होतो. आणि याचाच अर्थ असा आहे की, आणि याचाच अर्थ असा आहे की, या शहरामध्ये अजुन एक गोष्ट केली कमिशनरसाहेबांच्या माध्यमातून ज्यावेळेस शहरातील लोक परराज्यात जायला लागली त्यावेळेला आपल्या भागामध्ये अडकलेले जे मजुर होते त्यांना आपण एक निवारा केंद्र चालू केलं १२ शाळांमध्ये निवारा केंद्र चालू केलं परराज्यातील लोकांना त्यांच्या सीमापर्यंत पाठविण्याचं काम केलं एस.टी.महामंडळाच्या वल्लभनगरच्या आगारातून बसेस मार्फत त्यांना त्यांच्या सिमेपर्यंत पोहचवण्याचं काम केलं. आणि मग आपण त्याठिकाणी विचार केला मगाशी आपली चर्चा झाली की, डी.वाय.पाटील यांच्या बरोबर ज्यावेळेला आपण करार केला आणि आपलं वायसीएम हॉस्पिटल कोव्हीड करण्याच्या संदर्भात मग आपले येणारे जे रुग्ण आहेत ते आपल्याला कशा पध्दतीने करता येतील यासंदर्भात सुध्दा सन्मा.कमिशनर साहेबांनी ऍग्रीमेंट केल्यानंतर जवळपास ८ हॉस्पिटल मगाशी सांगितल्याप्रमाणे त्यानी जनरल रुग्णासाठी त्यांनी उपलब्ध करुन दिलेले आहेत. अशा अनेक गोष्टी आहेत परंतु मी याठिकाणी आवर्जुन उल्लेख करीन की, या सर्व गोष्टी ज्यावेळेला कमीशनरच्या माध्यमातून केल्या जात होत्या याचा अर्थ असा आहे की, आपण आज या शहरामध्ये कोरोनावर कंट्रोल करण्यासाठी या संपुर्ण टिमच्या माध्यमातून मोठं कार्य याठिकाणी केलं गेलेल आहे आणि त्यामुळेच कदाचित आपण इतर शहराच्या तुलनेत आपण मगाशी सांगितल्याप्रमाणे आपण सुरुवात केली आणि सुरुवात केल्यानंतर अनेक जिल्हे, अनेक महानगरपालिका आपल्या पुढे किती तरी गेल्या याचा अर्थ असा आहे की,आपण जे काही आगोदर पासून प्लॅनिंग केलं आणि मायक्रो प्लॅनिंगच्या माध्यमातून आपल्याला हा कोरोना रोखता आलेला आहे. अजुन एक मगाशी उल्लेख केला की, स्वदेशीच्या संदर्भामध्ये आमचे दोन्ही आमदार आले त्यावेळेस त्यांनी सांगितलं की, ख-या अर्थानं आपण आपल्या शहराच्या स्तरावरती चर्चा करु शकतो का, काही निर्णय घेऊ शकतो का कारण आपला भाग जो आहे तो आत्मनिर्भर बनवायचा आहे. आणि त्या अनुषंगाने आपण आपल्या छोटेखानी महापालिका स्तरावरती एक चांगला निर्णय करु

शकतो अशा प्रकारची देखील चर्चा झालेली आहे. या कोरोनाच्या संदर्भात अनेक गोष्टी झाल्या त्यावेळेला मला असं वाटत की, आपण विशेष कौतुक केलं पाहिजे. आणि ते कौतुक म्हणजे आपण जी चर्चा केली जे कोरोना पॉझिटीव्ह रुग्णाच्या बरोबर आपल्या जीवाची पर्वा न करता वायसीएमएच हॉस्पिटल, भोसरी रुग्णालय, तालेरा रुग्णालय, जिजामाता हॉस्पिटल, बालेवाडी याठिकाणी सेंटर तयार केलेले आहे त्याठिकाणचे जे कर्मचारी असतील  किंवा जे कर्मचारी घरोघरी जाऊन आपल्या जीवाची पर्वा न करता त्याठिकाणी त्यांच्या घरामध्ये बिनधास्त जात होती तसेच जे छोटे दवाखाने असतील त्याठिकाणचे डॉक्टर, नर्स, वॉर्डबॉय हे कुठल्याही जीवाची पर्वा न करता थेट आपल्या पॉझिटीव्ह रुग्णांकडे जाऊन हिस्ट्री जमा करण्याचं काम त्यांनी केलेले आहे मला असं वाटतं की, ख-या अर्थानं या गोष्टी आदरणीय श्रावणजी हार्डीकर साहेबांनी हे काम मोठया प्रमाणावर उभं केलं त्याही पेक्षा जास्त योगदान हे वायसीएमएच चे डॉक्टर, नर्स, वॉर्डबॉय, सफाई कर्मचारी असतील त्यांनी सुध्दा आपल्या जीवाची पर्वा न करता त्याठिकाणी कोरोनाचा सामना केलेला आहे. म्हणुनच आपल्या सर्वांच्या वतीने सभागृहाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करतो आहे. खरं म्हणजे आपण बघितलं असेल की, आपण स्वत: ज्यावेळेला पॉझिटीव्ह रुग्ण आपल्या भागामध्ये येत होते त्यावेळेला मगाशी कुठल्या तरी नगरसेवकांनी उल्लेख केला की, आपल्या घरुन सुध्दा आपल्याला तशा प्रकारच्या सुचना होत्या पण ख-या अर्थाने आपल्यातील कार्यकर्ता जागरुक केला आणि मी नगरसेवक नाही, पदाधिकारी  नाही तर मी एक कार्यकर्ता आहे समाजाचं मला काही तरी देणं लागत आणि वंचितासाठी मला काही तरी करायचं आहे या भूमिकेतून प्रत्येकाच्या मनातील कार्यकर्ता जागा झाला आणि कार्यकर्ता जागा झाल्यामुळेच या शहरातील  जे गोरगरीब मजुर आहेत त्यांना आपण जेवणापासून वंचित राहू दिलं नाही. त्यांना सांभाळण्याचं कार्य याठिकाणी केलं त्यामुळे सर्व सदस्यांचे मी याठिकाणी विशेष आभार व्यक्त करतो. तसेच सर्व गटनेत्यांनी वेळोवेळी मदत केली त्यांचेही मी याठिकाणी आभार व्यक्त करतो आणि या सभागृहाला विनंती करतो की, पॉझिटीव्ह रुग्ण रोखण्याकरीता त्यांनी मदत केलेली आहे आणि अहोरात्र तीन महिने वायसीएमएच हॉस्पिटल असो की इतर दवाखान्यामध्ये त्यांची ज्या ठिकाणी नेमणुक केलेली आहे त्याठिकाणी त्यांनी प्रामाणिकपणे काम केलेले आहे. अशा सर्व कोरोना योध्दासाठी मी सर्व सभागृहाला विनंती करतो की, कोरोना योध्दयासाठी सर्वांनी उभे राहून त्यांच टाळया वाजवून स्वागत आणि अभिनंदन करावे. धन्यवाद.

( सर्वांनी उभे राहून कोरोना योध्दयांचे टाळया वाजवून अभिनंदन केले.)

**मा.विठ्ठल उर्फ नाना काटे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह खरं तर सभागृह सुरु होण्यापूर्वीच मी निवेदन दिलं होतं आणि मा.आयुक्त साहेब, डॉक्टर्स, नर्स,वॉर्डबॉय व इतर अधिकारी यांच्या अभिनंदनाचा ठराव दिला होता. त्यानंतर नामदेव ढाके यांनी अभिनंदनाचा ठरावा दिला आणि त्याला अनुमोदन दिलं आणि सभागृहामध्ये भाषणं चालू झाली खरंतर नामदेव ढाके यांनी ठराव मांडल्यानंतर सर्वांनी बोलणं उचित नव्हतं कारण सर्व सदस्य बोलले होते. आणि म्हणुन मला परत बोलावं लागलं आहे. पिंपरी चिंचवड मध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव वाढलेला होता तो रोखण्यासाठी मा.आयुक्त साहेब आपल्या टिमने अतिशय चांगल्या पध्दतीने काम करीत होती. त्याच बरोबर आपल्या जिल्हयाचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी आपल्या शहराला भेट दिली आणि सर्व माहिती घेतली तसं पाहिलं तर आपल्याला रोज दादांचा फोन येत होता त्यांना आपल्याकडे जी माहिती उपलब्ध आहे ती त्यांना देत होता आणि दादांनी या संपुर्ण जिल्हयाची माहिती घेतलेली आहे आणि फौंडेशनच्या वतीने सॅनीटायझरचं देखील वाटप करण्यात आलं मा.अजितदादा पवार यांच्या माध्यमातुन शहरातील गोरगरीब,मजुर लोकांना दररोज ५ हजार जणांना दररोज जेवणाची सोय केलेली होती. अशा अनेक संस्था पिंपरी चिंचवड शहरामध्ये काम करतात. अनेक संस्था आहे, सोसायटया आहेत, गणेश मंडळे आहेत, कार्यकर्ते आहेत आणि आपण सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते या सर्वांच मी याठिकाणी अभिनंदन करतो. आणि थांबतो धन्यवाद.

अ) मा.महापालिका सभा क्रमांक - ३३ दिनांक २०/७/२०१९, दि.२५/७/२०१९, दि.६/८/२०१९ व दि.२०/८/२०१९ (दु.१.००) दि.२१/८/२०१९ (दु.१.३०) व दि.३/९/२०१९ (दु.१.००) व दि.७/९/२०१९ (दु.१.००) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

ब) मा.महापालिका सभा क्रमांक – ३४ दिनांक २०/८/२०१९(दु.२.००) व दि.२१/८/२०१९ (दु.१.४५) व दि. ३/९/२०१९ (दु.१.३०) व दि.७/९/२०१९ (दु.१.३० वा.) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

क) मा.महापालिका सभा क्रमांक - ३५ दि.२०/९/२०१९ (दु.२.०० वा.) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

ड) मा.महापालिका सभा क्रमांक - ३६ दि.१९/१०/२०१९ व दि.२०.११.२०१९ (दु.१.३०

वा.) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

इ) मा.महापालिका सभा क्रमांक – ३७ दि.२०/११/२०१९ (दु.२.००) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.नगरसचिव** - मा.महापौर साहेब, प्रश्नोत्तरे- मा.संदिप बाळकृष्ण वाघेरे, नगरसदस्य यांना विचारावयाचे प्रश्न.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह. याठिकाणी जे दोन प्रश्न आहेत ते पुढील जनरल बॉडीमध्ये घेऊ आणि मा.भाऊसाहेबांचा जे बँकेच्या संदर्भातील प्रश्न आहे त्याची माहिती द्यावी म्हणजे विषय संपुन जाईल.

**मा.संदीप वाघेरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४४ अन्वये प्रश्न विचारले होते. पवना, इंद्रायणी आणि मुळा नदीचे पुनरुज्जीवन करण्याच्या संदर्भात आपल्या महापालिकेने कोणकोणती कामे केलेली आहेत महापालिकेचे कार्यकारी अभियंता संजय कुलकर्णी यांनी प्रत्येक प्रश्नाला उत्तर दिलेलं आहे मी ५ प्रश्न विचारलेली आहेत

१) अ) पवना, इंद्रायणी व मुळा पुनरुज्जीवन प्रकल्प राबविणे अंतर्गत कोणती कामे करण्याचे नियोजन आहे ? कशी करणार आणि त्यासाठी काही ठोस योजना केल्या आहेत काय ?
ब) पवना, इंद्रायणी व मुळा पुनरुज्जीवन प्रकल्प राबविणे अंतर्गत प्राथमिक आभ्यास झाला आहे की नाही तसेच नद्यांची साफसफाईसाठी किती पर्याय दिले
आहेत तसेच महानगरपालिकेतील इतर विभागातील अभियंत्यांना योजनेच्या कामकाजाविषयी माहिती आहे काय तसेच यंत्रणेच्या अपयशाला कोण जबाबदार असणार आहे ?

२) अ) पवना, इंद्रायणी व मुळा पुनरुज्जीवन प्रकल्प राबविणे अंतर्गत भूसंपादन झाले आहे की नाही त्यासाठी किती निधी उपलब्ध आहे ?
ब) पवना, इंद्रायणी व मुळा पुनरुज्जीवन प्रकल्प राबविणे अंतर्गत एकूणकिती क्षेत्र ताब्यात आलेले आहे व किती क्षेत्र ताब्यात आलेले नाही ?

३) अ) पवना, इंद्रायणी व मुळा पुनरुज्जीवन प्रकल्प राबविणे अंतर्गत किती टप्प्यात काम केले जाणार आहे व कसे तसेच किती ठिकाणी स्क्रीन चॅनेल बसविण्यात येणार आहे व दुर्गम ठिकाणी त्यावर महापालिका कशा पध्दतीने देखरेख ठेवणार आहे तसेच यासर्व स्क्रीन चॅनेल देखभालीचा खर्च विचारात घेतला आहे का ?

४) केंद्र व राज्य शासनाकडून अनुदान स्वरुपात किती व कश्या प्रकारे रक्कम मिळणार आहे ?

५) अ) शहरामध्ये मलनि:सारण केंद्रे किती व कोठे आहेत ? त्यांची कार्यपध्दती कशी आहे ?

ब) मलनि:सारण केंद्रांना कोणकोणत्या भागातील सांडपाणी जोडणे गेले आहेत, एकूण किती शुध्द केले जाते व शुध्द केलेल्या पाण्याचा वापर कोठे केला जातो ?या पाच प्रश्नांची उत्तरे मला कुलकर्णी साहेबांकडुन आलेली आहेत आज पवना,इंद्रायणी आणि मुळा नदी आजच सकाळ पेपरला मुळा आणि पवना नदीचा फोटो आहे नदी स्वच्छ झाली म्हणुन ब-याचशा लोकांनी पाहिलं पण असेल गेली ३ वर्षापासून मी पवना, मुळा आणि इंद्रायणी नदीसाठी प्रयत्न करतो आहे की, नदी सुधारचा प्रकल्प राबवला गेला पाहिजे. मा.आयुक्त साहेब, त्या अनुषंगाने गेल्या ३ वर्षामध्ये काहीच काम झालेले नाही. आणि इतर सेक्टर सेव्हरच लाईन टाकण्याचे काम चालू आहे ते नदीपात्राच्या कडेने चालू आहे. समजा ३१० चेंबर करणार आहात त्यानंतर नाल्याला स्क्रीन बसविणार आहेत.माझा प्रभाग क्र.२१ मध्ये ३ वर्षापुर्वी परिस्थिती होती की, ड्रेनेजलाईन स्ट्रॉमवॉटरला जोडल्या होत्या आणि स्ट्रॉमवॉटरच्या लाईन नाल्यामधनं कंन्टीन्यु २४ तास नदीत मिसळत होत्या आज माझ्या प्रभागात ९९.९९ टक्के मी ब-यापैकी क्लीअर करुन घेतलेले आहे. म्हणजेच स्ट्रॉमवॉटरला ड्रेनेज लाईन कुठेच ठेवलेली नाही. ड्रेनेज, स्थापत्य, पर्यावरण डिपार्टमेंट हे सुसंगत नाहीत. ड्रेनेजलाईन नदीच्या कडेने टाकताय समजा ती लाईन आता माझ्या प्रभागामध्ये एक लाईन करुन घेतली अमृतयोजने अंतर्गत ७ ते ८ कि.मी. काम चालू आहे अजुन ती योजना पूर्ण झालेली नाही. ३ वर्ष मी पाठपुरावा करीत आहे. कासारवाडी एसटीपी पासून भाटनगरपर्यंत ती लाईन करतो आहे. साधारपणे जमीनीच्या ६ मीटर खाली आहे. एवढे मोठ मोठे चेंबर आहेत हीच लाईन आता नदीच्या पात्राच्या कडेने जाणार आहे. ६ मीटर जर खाली खोदून जवळपास ४७ कि.मी. करणार आहात करणार आहात. ही लाईन पावसाळयात फक्त ३ ते ४ महिने

चालणार आहे. भाटनगर,कासारवाडी याठिकाणच्या एसटीपीला जाऊन आलो आहे प्रत्येक एसटीपीचं दरमहिन्याचं लाईट बील चेक करा रात्रीचा खेळ चाललाय असा प्रकार त्याठिकाणी चालू आहे. आपले डायरेक्ट पाणी नदीमध्ये सोडलं जात आहे. चिखलीमध्ये दत्ताकाका साने यांच्या प्रभागामध्ये एसटीपीचं काम चालू आहे. ते काम पर्यावरण विभागाने थांबवलं आहे. आपल्या वकीलाला त्याठिकाणी बाजु मांडता आली नाही. महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाचे जीआर आहेत एरिगेशन डिपार्टमेंटच्या जीआर नुसार आपण ब्ल्यु लाईन मध्ये आपण काम करु शकतो का स्विमींग टँक असेल, एसटीपी आपण करु शकतो. यामध्ये मी आपल्याला व्हॉटस् अप पण केलेले होते. आणि आता ते प्रकरण दिल्लीमधन आपल्याला क्लीअरन्स होणार बाकीच्या गोष्टी ६/८ महिने याच्यामध्येच गेले. कुठलेही प्रोजेक्ट मंजुर करताना पहिल्या सगळया एनओसी लागतात १० महिन्यापुर्वी आपण नदीपात्रातून ड्रेनेजलाईन करणेच्या कामाचे १४० कोटीच टेंडर काढलं त्याची आपण पुर्ण चौकशी केली का? हा प्रोजेक्ट कसा राबविणार कसा नाही याची सभागृहाला माहिती दिली का? परत त्याचाअजुन डीपीआर मंजुर नाही. पर्यावरण विभागाची, शासनाची त्याला मान्यता नाही. आपण २०० कोटीचे बॉण्डस् काढलेले आहेत त्याचीही अजुन पुर्ण प्रोसेस झालेली नाही. मग याचे टेंडर काढण्याची घाई का केली. म्हणजे याच्यामध्ये कोणाचे हितसंबंध आलेले आहेत. मा.आयुक्त साहेब, आपल्याला ३ वर्ष होऊन गेलेले आहेत हे जर आज मंजुर झाले तर पुढच्या पिढया म्हणतील की, तुम्हांला हे सांभाळता आलं नाही. आपल्यावर निसर्गाची कृपा आहे या ३ महिन्यामध्ये आपली नदी आपोआप स्वच्छ झालेली आहे. जसजशी नदी पुढे वाहत जाईल तशी तशी ती आपोआप स्वच्छ होईल. कार्यकारी अभियंता कुलकर्णी यांच काय योगदान आहे. आता हे म्हणणार ३ महिन्यामध्ये आम्ही नदी स्वच्छ केली. प्रत्येक एसटीपीची परिस्थिती बघा आपण पाणी सोडतो कसं आपण ड्रेनेजच पाणी स्वच्छ करुन परत नदीमध्ये सोडतो वरुन नाल्याचे पाणी येते आणि ते नदीमध्ये सोडतो अशाने नदी स्वच्छ होणार नाही ही पर्यावरणाची सुधारणा नाही पुर्ण डीपीआर तयार होऊन, पुर्ण परमिशन एरिगेशनची, पर्यावरण विभागाच्या आल्या, नदीपात्रातील शेतक-याच्या जमीनी आहेत त्यांच्या एनओसी आल्या आहेत का या कामाचा पुर्ण सर्व्हे करुन त्याचा डीपीआर तयार करुन मंजुर झाल्यानंतर हे काम हाती घेतलं पाहिजे. आपण काम अर्धवट पेपर असतानाच काम चालू केलेलं आहे. म्हणजे आज आपल्याकडे पैसे आहेत म्हणुन घालवणार आहात का अर्धवट विषय पास करु नका, करायचं असेल तर पूर्ण करा दोन वर्षापुर्वी शहर अभियंता रिटायर झाले त्यांनी त्यांच्या काळात चिंचवडचा काही भाग सुरु केला होता. हे कुलकर्णी फक्त कागदी

घोडे नाचवितात असं करणार,तसं करणार पण प्रत्यक्षात काहीच काम करीत नाही. हे जे काही चाललंय त्याची पूर्ण चौकशी करावी आणि निर्णय घेताना संपुर्ण सभागृहाला सहभागी करुन घ्या. नुसते चार नेते मंडळी जमा केले आणि बाकीच्यांना विचारायचं नाही असं करु नका. याठिकाणी प्रत्येक नगरसेवकाला तितकचं महत्व आहे. आपण हे करीत असताना त्या कामाचं प्रेझेंटेशन या सभागृहात दाखवलं पाहिजे. आणि तांबे यांनी या प्रश्नांचे उत्तर दिलेले आहेत त्यांनी या सभागृहात खुलासा करावा की, नेमकं आपण काय करणार आहे.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह. या पर्यावरणाचा जो –हास झालेला आहे याठिकाणी चांगले प्रश्न उपस्थित केलेले आहेत संजय कुलकर्णी हे या विषयामध्ये उत्तर देताना अतिशय माहिर आहेत. मा.आयुक्त साहेब, मी आपल्याला काही प्रश्न विचारतो की, विधानसभा निवडणुकीच्या आधी आम्ही एक भल्या पहाटे एक आरती बघीतली आणि आम्हांला खुप आनंद वाटला की, या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये आचारसंहिता लागण्याच्या आदल्या रात्रीला रात्री १० ते पहाटे ४.०० पर्यंत स्टँडींगमध्ये जो काही गोंधळ झाला होता त्याच पत्र देखील मी आपल्याला दिलं होतं की, त्या स्टँडीगमध्ये जे व्यवहार झाले त्यामध्ये जो काळंबेरा कारभार झाला आणि त्याचवेळेस स्टॅडींगमध्ये पवना सुधार योजना आणि इंद्रायणी नदी सुधार योजनेचा विषय झाला आणि पहाटे त्या नदीवर एक पुजा झाली आम्हांला सुध्दा आनंद वाटला की, बाबा एक चांगल्या विषयाला हातभार लागलेला आहे नदीपात्रातील जो भाग आहे त्या भागातील जे पाणी नदीमध्ये जात आहे ते जाणार नाही आणि आमची जी पवित्र नदी आहे ती स्वच्छ होईल अशा माध्यमातून एक निर्णय त्या काळामध्ये घडला गेला आणि असं असताना हे टेंडर कुठल्या धुंदीत काढलं गेलं कोणाच्या प्रेशरनी काढलं गेलं अ) पवना, इंद्रायणी व मुळा पुनरुज्जीवन प्रकल्प राबविणे अंतर्गत भूसंपादन झाले आहे की नाही त्यासाठी किती निधी उपलब्ध आहे? पवना, इंद्रायणी व मुळा पुनरुज्जीवन प्रकल्प राबविणे अंतर्गत एकूण किती क्षेत्र ताब्यात आलेले आहे व किती क्षेत्र ताब्यात आलेले नाही ? मुळात आपल्या ताब्यात जागा नाही, इथं डीपीआर नाही, पर्यावरणाची तुम्हांला परमिशन नाही तरी याचं टेंडर कसं निघालं,कशा पध्दतीनं निघालं याची माहिती मिळाली तर संदीप वाघेरेच्या सगळया प्रश्नांची उत्तरे याठिकाणी मिळतील. दुसरा प्रश्न आहे की, पवना, इंद्रायणी व मुळा पुनरुज्जीवन प्रकल्प राबविणे अंतर्गत एकूण किती क्षेत्र ताब्यात आलेले आहे व किती क्षेत्र ताब्यात आलेले नाही ? आपण यामध्ये उत्तर दिलेलं आहे परंतु हा विषय नदीसुधारचा आहे. प्रश्न एक आणि उत्तर दुसरीकडचं दिलेल आहे असं नक्की काय आहे. आयुक्त साहेब, संबंधित अधिकारी हा त्या पदावर बसण्याचा लायक नसेल पिंपरी

चिंचवड महापालिकेचे वाटोळं केलं असेल, आज ड्रेनेजलाईनची काय अवस्था आहे प्रत्येक कंपन्याच सांडपाणी हे नदीत  का येत आहे हे पाणी कोणामुळे जात आहे आणि आपण हे किती वर्ष सहन करणार आहोत कुलकर्णी यांनी आतापर्यंत नदीसुधार प्रकल्प असेल, किंवा जे काही नाले,ओढे नदीला जोडलेले आहेत त्याच्यासाठी आजपर्यंत यांनी काय केलेले आहे याची आपण कधीच चौकशी केलेली नाही. ज्यावेळेस विषय येतो तेवढयापुरत आपण बोलतो. मा.महापौर साहेब, हा खरोखरचं फार गंभीर प्रश्न आहे.त्यांनी जी उत्तरे दिलेली आहेत ती एकही प्रश्नाला धरुन नाही.  कुठलीही मान्यता नसताना टेंडर निघतातच कसे? आजही इंद्रायणी नदीचं पाणी खराब आहे काही दिवसानंतर आता पालखी निघणार आहे.खराब पाण्याच्या संदर्भात आपण काय नियोजन करणार आहे. हे सगळं काम नदीपात्रात आहे हे मी आपल्याला जीव तोडून सांगितल होतं आपण जो नदी सुधार  प्रकल्प करीत आहोत तो पुर्णपणे नदीपात्रात आहे. शेवटी आम्हांला हरीत लवादाकडे जावं लागलं आणि तिथनं हा विषय घ्यावा लागला. आपल्याला नदीपात्रामध्ये दुसरं काही काम करावं म्हणलं तर तुमची परमीशन घ्यावी लागते आणि तुम्हांला नदीपात्रामध्ये काही प्रकल्प राबवायचा असेल तर त्याला इतर विभागाची परमीशन लागत नाही का? आता जो प्रकल्प केला तो पाण्यात गेला त्याठिकाणी केलेला खर्च कोण देणार,त्याठिकाणी केलेल्या खर्चास कोण जबाबदार आणि परमीशन नाही म्हणुन काम बंद पडल्यास जबाबदार कोण, याचंही उत्तर आपल्याला पाहिजे. हा जो पैसा आहे तो गोरगरीब नागरीकांकडुन टॅक्सच्या रुपाने येत आहे. टेंडर काढण्याच्या आधी आपण त्या जागेची पहाणी  केलेली होती तरीही आपण हा प्रकल्प नदीपात्रात काढण्याच्या कामाचं टेंडर काढलं मा.आयुक्त साहेब, असे अनेक  प्रकल्प काढून या महापालिकेचा बट्टयाबोळ करण्याचं काम  केलेले आहे. मा.आयुक्त साहेब मला इंद्रायणी नदीमध्ये  एसटीपी प्रकल्पाच्या माध्यमातून आतापर्यंत किती खर्च केला याची माहिती देणेत यावी. इंद्रायणी आणि पवना नदी सुधार प्रकल्पाची माहिती देणेत यावी. चिखलीच्या एसटीपीच्या कामाची माहिती देणेत यावी ही विनंती. धन्यवाद.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह अनेक वर्षाच्या कालखंडानंतर आपण पहिल्यांदाच प्रश्न दाखल करुन घेतलेले आहेत त्याबद्दल मा.महापौर आणि मा.नामदेवराव ढाके यांचे अभिनंदन करतो. मी संदीप वाघेरे यांना धन्यवाद देतो की, त्यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न विचारलेला आहे. आणि मा.महापौर साहेब, मी आपल्याला विनंती करतो की, या शहराच्या दृष्टीकोनातून महत्वाचे प्रश्न सन्मा.सदस्यांनी विचारले असतील तर आपण ते जरुर स्विकारावे. याचं कारण आपण या सभागृहामध्ये पुर्वीपासून

आहात. या प्रश्नोत्तरामुळे नगरसेवकांच चिंतन होत, वस्तुस्थिती समजते कदाचित चुकीचं असेल तर नाकारावे. असे काही प्रश्न आहेत की, ते कोरोनाच्या आजाराचं संशोधन झाल्यानंतर हा काळ कालमर्यादीत असु शकतो पण संदीप वाघेरे यांनी जो प्रश्न विचारलेला आहे हा रोग अनंतकाळ टिकणारा आहे. तो आपल्याला फक्त दिसत नाही. त्याचं हळुहळु स्लो पॉयझन सुरु होत असते. यासंदर्भात मी अनेकवेळा भाषण केलेलं आहे.परंतु प्रशासनाला त्यावर आजपर्यंत निश्चित मार्ग निघालेला नाही. त्यामुळे माझ्या प्रश्नाचं उत्तर मिळालेलं आहे त्यामुळे मी या सभागृहामध्ये वारंवार मागणी करीत असतो की,सर्वपक्षीय सदस्यांची एक कमीटी तयार करावी. हे जे करतात त्यामध्ये काहींची दुकानं चालू असतात, काहीचं नियोजन चालू असतं आणि काय करायचं, काय करायचं नाही यावर भाष्य नसतं आणि मग आम्ही या सभागृहात त्रागा करुन प्रश्न मांडतो. त्यामुळे हे कुठं तरी आता थांबल गेलं पाहिजे. जागतीक संकट आल्यानंतर सगळे कसे सुधारतात सगळे एकत्र होतात आणि आज सगळेजण या सभागृहात उपस्थित आहेत. त्यामुळे या महापालिकेला सुध्दा आर्थीक संकट येणार आहे. त्यामुळे या शहराची नैतिक जबाबदारी म्हणुन या संस्थेचे विश्वस्त म्हणुन आपली आहे. आणि तो प्रश्न याला धरुन उपयुक्त असा आहे. आणि म्हणुन या सर्व गोष्टीवर मात करण्यासाठी संदीप वाघेरे यांनी जो प्रश्न विचारलेला आहे तो पुन्हा एकदा या सभागृहाच्या पटलावर यावा. संजय कुलकर्णी हे त्याठिकाणी अधिकारी म्हणुन काम करतात त्यामुळे त्यांच्यावर आगपाखड होती. जो हया कामाची जबाबदारी स्विकारतो तो कॅप्टन म्हणुन त्याला सगळी जबाबदारी स्विकारावी लागते. त्यामुळे या महापालिकेचे काही अधिकारी दत्तक पुत्रच आहेत कुठं काही झालं तरी ते हसतात ते का हसतात? हे समजुन घेणं गरजेचं आहे. माझ्या प्रश्नाच्या उत्तरामुळे माझं समाधान झाले आहे परंतु संदीप वाघेरे यांचे प्रश्नावर मार्ग काढण्यासाठी एक कमिटी तयार करावी. मी येस बँकेच्या संदर्भात जो प्रश्न विचारला होता त्याची समाप्ती करावी. परंतु आयुक्त साहेब, कोणतीही बँक डबघाईला येते ती २/३ महिन्यामध्येच येते. ऑडीटरला त्याची कल्पना असते. १/२ वर्षाचा कालखंडामध्ये त्या बँकेची आर्थीक स्थिती आपल्याला दिसते की, ही बँक डबघाईला जाणार आहे. औरंगाबाद महापालिकेला कळलं होतं, पुणे महापालिकेला कळलं होत तर आपल्या महापालिकेला का कळलं नाही. आपण काय सावकार नाही ज्याठिकाणी जास्त व्याज मिळेल त्याठिकाणी ठेवी ठेवायच्या नाही ज्या बँका राष्ट्रीयकृत आहेत त्याठिकाणी ठेवी ठेवल्या पाहिजेत. ठिक आहे त्यांनी आपल्या ठेवी वर्ग केलेल्या आहेत त्यामुळे त्यांचे अभिनंदन करतो परंतु आपली

रक्कम काही कमी नव्हती ९२३ कोटी रु. होती ही रक्कम काही थोडी नाही. ती आपल्याला मिळाली आहे हा पुरावा मला मिळालेला आहे त्यामुळे मी माझा प्रश्न मागे घेतो.धन्यवाद.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह, मा.महापौरांनी प्रश्नोत्तरं स्विकारली आहेत आणि त्या प्रश्नोत्तरावरती सभागृहामध्ये चर्चा होते हे खुप चांगलं लक्षणं आहे. हे निरोगी लोकशाहीचं लक्षण आहे आणि एखादया विषयावर चर्चा पण होते. प्रत्येक गोष्ट म्हणली की, सत्ताधारी आणि विरोधक अशा पध्दतीचा अर्वीभाव असलाच पाहिजे असं काही नाही. भाऊसाहेबांनी खुप चांगलं उदा. दिलं आहे की, कोरोना हा ६ महिन्यामध्ये जाईल पण नदीसुधार प्रकल्पामुळे आपल्याला या शहरामध्ये पुढील अनेक वर्ष काम करावं लागणार आहे. या प्रश्नांच्या संदर्भात संजय कुलकर्णी किंवा तांबेनी स्पष्टीकरण देवुन हा प्रश्न सुटणार नाही मा.महापौर साहेब,मी आपल्याला विनंती करतो की, या संदर्भामध्ये भाऊसाहेबांनी एक चांगली सूचना केली आहे की, एक १०/१२ नगरसेवकांची त्वरीत एक कमिटी तयार करुन त्यामध्ये मा.आयुक्त साहेब,तांबे साहेब, संजय कुलकर्णी यांच्या बरोबर चर्चा करुन खरंच यामध्ये काय परिस्थिती आहे हे पुढील जनरल बॉडीच्या मिटींगमध्ये हे सभागृहासमोर मांडण्यात यावं. कारण आता उत्तर देताना ते थातुरमातुर दिलं आणि तो प्रश्न पुढं गेला. अशा पध्दतीची परिस्थिती होणार नाही.म्हणजे सभागृहात दूध का दूध आणि पाणी का पाणी हे जर का आपल्याला पाहिजे असेल तर पुढच्या चार दिवसांमध्ये मा.महापौरांच्या नेतृत्वामध्ये मा.आयुक्तांकडे एक मिटींग आयोजित करणेत यावी. आणि त्यामध्ये सगळे पक्षाचे मिळुन ८/१० नगरसेवक घेवुन शहर प्रदुषणमुक्त करण्यासाठी जे अहोरात्र काम करणारी मंडळी आहेत त्यांनाही आपल्या सोबत घेण्यात यावे आणि या संदर्भात पुढच्या महापालिका सभेमध्ये अहवाल देणेत यावा. अशा पध्दतीचे आदेश मा.महापौरांनी मा.आयुक्तांना देणेत यावे अशी विनंती करतो.

**मा. महापौर -** मा.भाऊसाहेबांनी विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर त्यांना मिळालेले आहे. परंतु संदीप वाघेरे यांनी विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर पाहिजे. पर्यावरणाची आपल्याला पुर्ण माहिती घ्यायची असेल तर त्यासाठी आपल्याला एक सर्वपक्षीय सदस्यांची एक कमिटी तयार करुन त्याची माहिती घेवु त्या प्रश्नांच उत्तर आपल्याला बरोबर कसे मिळेल यासाठी आपण प्रयत्न करु आणि आपण पुढील विषयाला सुरुवात करु या आणि मी मा.आयुक्तांना विनंती करते की, या संदर्भात एक कमिटी तयार करावी. पवना,इंद्रायणी,आणि मुळा नदी या नद्यांमध्ये सोडण्यात येणारे पाणी हे अतिशय घाण असते आणि याला संदीपनी प्रश्नोत्तराच्या माध्यमातून वाचा फोडली त्याबद्दल मी संदीपचं अभिनंदन करते. हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे कमिटी

नेमल्यानंतर त्यामध्ये आपल्याला प्रश्नांची योग्य ती उत्तरे मिळतील यासाठी मा.आयुक्त साहेबांनी यासंदर्भात एक कमिटी लवकरात लवकर स्थापन करावी आणि त्या मिटींगमध्ये आम्ही विचारलेल्या प्रश्नांची योग्य ती उत्तरे देण्यात यावी आणि उत्तरे दिल्यानंतर ती कृतीत कशी उतरतील असेच उत्तर पाहिजे अशी मी आयुक्तांना विनंती करते. आणि पुढील विषयाला सुरुवात करणेत यावी.

(मा.भाऊसाहेब भोईर यांचे प्रश्न वगळले)

**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक -५२८ विषय क्रमांक -१

दिनांक-१/६/२०२० विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ -** १) मा महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र.

क्र.वैद्य/१४अ/कावि/११९०/२०१९ दिनांक ११/१२/२०१९

२) मा.महापालिका सभा ठराव क्र.४९१ दि.१०/१/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड मनपाच्या सेवेतील व सेवानिवृत्त कर्मचारी व अधिकारी यांचेसाठी दि.०१/०९/२०१५ पासून धन्वंतरी स्वास्थ योजना सुरु करण्यात आली आहे. तथापी मा.महापालिका ठराव क्र.३८८, दि.२२/०२/२०१९ अन्वये धन्वंतरी स्वास्थ योजना धोरण २०१३ बंद करून त्याऐवजी वैद्यकिय विमा बाबतचे नव्याने निश्चित केलेले धोरण लागू करणेस मान्यता दिलेली आहे. त्यानुसार प्रस्तावित वैद्यकिय विमा लागू करणे संबंधी निविदा मागविणेत आल्या असून निविदा स्विकृतीची कार्यवाही चालू आहे. सन २०१९-२०२० मध्ये या योजनेसाठी र.रु.१५ कोटी इतकी तरतूद करणेत आलेली होती. तथापी सध्या चालू असलेल्या धन्वंतरी योजनेतील प्रलंबित बिले भागविणेकामी तरतूद कमी पडत असलेने विमा योजनेच्या र.रु.१५ कोटी तरतूदी मधून र.रु.६ कोटी धन्वंतरी स्वास्थ योजना या लेखाशिर्षावर वर्ग करणेत आलेली आहे. त्यामुळे सध्या विमा योजनेसाठी र.रु.९ कोटी इतकीच तरतूद शिल्लक आहे. विमा योजनेसाठी प्रिमिअमचा पहिला हप्ता भागविणे कामी आणखी र.रु.५ कोटीची आवश्यकता लागणार असून सदरची तरतूद वैद्यकिय मुख्य कार्यालयाकडील स्थायी अस्थापना या लेखाशिर्षा वरील शिल्लक रक्कमेतून वर्ग करुन उपलब्ध करणे शक्य आहे. त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे –

| अ.क्र. | लेखाशिर्ष | सन २०१९ –२०२० मूळ तरतूद | वाढ | घट |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकिय मुख्य कार्यालय स्थायी अस्थापना | ४८ कोटी | - | ५ कोटी |
| २ | वैद्यकिय विमा | ९ कोटी | ५ कोटी | -- |

तरी वरील प्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घटर.रु. ५,००,००,०००/-)

**मा.राजेंद्र गावडे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

( गोंधळ )

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब, आम्हांला या विषयावर बोलायचे आहे. या विषयावर मतदान घ्यावे.

**मा.महापौर** – या विषयावर काय बोलणार आहे आयुक्तांना माहिती विचारावी.

**( गोंधळ )**

**मा.महापौर** – मा.नगरसचिव यांनी या विषयावर मतदान घ्यावे.

**मा.नगरसचिव** – मा.महापौर यांच्या सूचनेनुसार, विषय क्रमांक १ वर मतदानाची प्रक्रिया सुरु केली असता.....

**( गोंधळ )**

**मा.एकनाथ पवार** – मा.महापौर साहेब, आपण याठिकाणी विषय काय आहे ते नीट वाचा धन्वंतरीच्या याच्यामध्ये इंन्शुरन्स करायचा की नाही करायचा हा नंतरचा प्रश्न आहे. हा विषय स्टँडींगमध्ये होता तर मागच्या स्थायी समितीमध्ये तुमचे सदस्य होतेच नां.

**( गोंधळ )**

**मा.महापौर** – सर्वांनी खाली बसावे.

( गोंधळ )

**मा.महापौर** – विषय कर्मचा-यांचा आहे त्यामुळे या विषयाला कोणाचाच विरोध नाही.

( गोंधळ )

**मा.योगेश बहल** – या विषयावर मतदान घ्यावे अशी आम्ही मागणी केलेली आहे.

( गोंधळ )

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ३७ प्रतिकुल- २३

अशी मते पडली व सदर ठराव बहुमताने मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.राजेंद्र लांडगे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ५२९ विषय क्रमांक- २
दिनांक – १/६/२०२० विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ -** १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जशुके/पापु/९९/२०२०, दि.३०/०१/२०२०
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६६३३ दि.५/२/२०२० अन्वये.
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.५१० दि.२६/२/२०२० अन्वये.

मा.महापालिका सभा ठराव क्र.१४७, दिनांक २८|०२|२०१८ तसेच मा.महापालिका सभा ठराव क्रमांक १८७, दिनांक २०|०४|२०१८अन्वये पाणीपट्टी दरामध्ये सुधारणा करण्यात आलेली असून त्यानुसार पाणीपट्टी आकारण्यांत येत आहे. सद्यस्थितीत शहरात पाण्याचे समन्यायी पध्दतीने वाटप करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. तथापि प्रत्येक नळजोडावरील पाणीवापरावर नियंत्रण ठेवणे शक्य नाही. सबब ज्या ठिकाणी विशेषत: उतारावरील भागात जास्त पाणी उपलब्ध होते. त्यामुळे तेथे मानकापेक्षा जास्त पाणीवापर

करण्याची प्रवृत्ती दिसते व उंचावरील भागात पाण्याचा तुटवडा जाणवतो. समन्यायी पाणीपुरवठा करण्यासाठी १०० LPCD पेक्षा जास्त पाणी वापरकरणा-या ग्राहकांवर वचक ठेवण्याच्या दृष्टीने १०० LPCD पेक्षा जास्त पाणीवापरासाठी जास्त दर लावणे आवश्यक आहे. उपरोक्त बाबी विचारात घेऊन पाणीपट्टीचे सुधारित दर प्रस्तावित करण्यांत येत आहेत, तसेच त्यानंतर दरवर्षी प्रस्तूत आदेशातील सर्वप्रकारच्या दरांमध्ये वार्षिक ५ टक्के वाढ प्रस्तावित करणेत येत आहे.

## पाणीपट्टी प्रस्तावित दर

### १) निवासी वापरासाठी प्रति कुटुंब / सदनिका प्रतिमहिना

(झोपडपट्ट्यांमधील व झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील नळजोड वगळून)

| अ.क्र. | LPCD | प्रति माह प्रति सदनिका पाण्याचा वापर ( लिटर्स मध्ये) | पाणीदर ( प्रति १००० लिटर्स साठी ) सन २०१९-२० | पाणीदर ( प्रति १००० लिटर्स साठी ) सन २०२०-२१ |
|---|---|---|---|---|
| १ | ४० | १ ते ६००० | र.रु.०.०० | र.रु.०.०० |
| २ | ४१-१०० | ६००१ ते १५००० | र.रु. ४.२० | र.रु.८.०० |
| ३ | १०१-१३५ | १५००१ ते २०००० | र.रु.४.२० | र.रु.४०.०० |
| ४ | १३५ च्या पुढे | २०००१ च्या पुढे | र.रु.८.४० | र.रु.१००.०० |

प्रति माह प्रति सदनिका २०००१ लिटर्सपेक्षा ( १३५ LPCD ) जास्त पाणी वापरकरणा-या ग्राहकांना उपरोक्त तक्त्यात नमूद केलेली पहिल्या ६००० लिटर्सप्रति माह प्रति सदनिका इतक्या पाणी वापरासाठीची शून्य दराची सूट लागूराहणार नाही. अशा ग्राहकांना १ ते ६००० लिटर्स पाणी वापरासाठी उपरोक्त तक्त्यातील ६००१ ते १५००० या स्लॅब मधील दर लागू राहील, म्हणजे अशा ग्राहकांना प्रति माह प्रति सदनिका १ ते १५००० लिटर्स या स्लॅबसाठी उपरोक्त तक्त्यातील र.रु.८.०० हा दर लागू राहील.

### २) वाणिज्य वापरासाठी प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट हॉटेल्स, रेस्टॉरंटस, दुकाने, इ.

| आर्थिक वर्ष | दर प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट |
|---|---|
| सन २०१९-२० | र.रु.५२.५० |
| सन २०२०-२१ | र.रु.५५.०० |

३) खाजगी शैक्षणिक संस्था, वसतिगृहे, शासकीय-निमशासकीय कार्यालये, रेल्वे स्टेशन्स, ईएसआय हॉस्पीटल, ऑटो क्लस्टर, औंध ऊरो रुग्णालय.

| आर्थिक वर्ष | दर प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट |
|---|---|
| सन २०१९-२० | र.रु.१५.७५ |
| सन २०२०-२१ | र.रु.१७.०० |

४) धार्मिक स्थळे, अनाथाश्रम, वृध्दाश्रम, धर्मादाय आयुक्त यांची मान्यता असलेली ना नफा ना तोटा या तत्वावर चालविण्यात येणारी मंडळे.

| आर्थिक वर्ष | दर प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट |
|---|---|
| सन २०१९-२० | र.रु.१०.५० |
| सन २०२०-२१ | र.रु.११.०० |

**५) स्टेडीयम**.

| आर्थिक वर्ष | दर प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट |
|---|---|
| सन २०१९-२० | र.रु.२१.०० |
| सन २०२०-२१ | र.रु.२२.०० |

**६) मनपा इमारती / मिळकती – Book Adjustment करिता**

| आर्थिक वर्ष | दर प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट |
|---|---|
| सन २०१९-२० | र.रु. १०.५० |
| सन २०२०-२१ | र.रु.११.०० |

**७) हद्दीबाहेरील निवासी इमारती – देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्ड**

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीबाहेरील देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीतील निवासी इमारतींसाठी देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डास खालील प्रमाणे सरसकट दराने पाणी देण्यात येईल.

| आर्थिक वर्ष | दर प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट |
|---|---|
| सन २०२०-२१ | र.रु.११.०० |

**८) झोपडपट्टीसाठी धोरण** – झोपडपट्टीतील ग्राहकांसाठी पध्दतीने दर प्रस्तावित करणेत येत आहेत.

अ) प्रस्तावित दर (मीटर बसविलेल्या झोपडपट्टी/झोपडपट्टी पुनर्वसनप्रकल्पातील नळजोड ग्राहकांसाठी निवासी वापरासाठी प्रति कुटुंब। सदनिका प्रति महिना)

| अ.क्र. | LPCD | प्रति माह प्रति सदनिका पाण्याचा वापर (लिटर्स मध्ये) | पाणीदर ( प्रति १००० लिटर्स साठी ) सन २०१९-२० | पाणीदर ( प्रति १००० लिटर्स साठी ) सन २०२०-२१ |
|---|---|---|---|---|
| १ | ४० | १ ते ६००० | र.रु.०.०० | र.रु.०.०० |
| २ | ४१-१०० | ६००१ ते १५००० | र.रु.२.१० | र.रु.४.०० |
| ३ | १०१-१३५ | १५००१ ते २०००० | र.रु.३.१५ | र.रु.४०.०० |
| ४ | १३५ च्या पुढे | २०००१ च्या पुढे | र.रु.८.४० | र.रु.१००.०० |

प्रति माह प्रति सदनिका २०००१ लिटर्सपेक्षा (१३५ LPCD) जास्त पाणी वापर करणा-या ग्राहकांना उपरोक्त तक्त्यात नमूद केलेली पहिल्या ६००० लिटर्स प्रति माह प्रति सदनिका इतक्या पाणी वापरासाठीची शून्य दराची सूट लागू राहणार नाही. अशा ग्राहकांना १ ते ६००० लिटर्स पाणी वापरासाठी उपरोक्त तक्त्यातील ६००१ ते १५००० या स्लॅबमधील दर लागू राहील, म्हणजे अशा ग्राहकांना प्रति माह प्रति सदनिका १ ते १५००० लिटर्स या स्लॅबसाठी उपरोक्त तक्त्यातील र.रु.४.०० हा दर लागू राहील.

आ) मीटर न बसविलेल्या झोपडपट्टीतील/ झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील ग्राहक

i) झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प (वापर १३५ LPCD प्रमाणे) झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील इमारतींना प्रति सदनिकाप्रमाणे मासिक बिल देण्यात यावे.

| आर्थिक वर्ष | दर प्रति महिना प्रति सदनिका |
|---|---|
| सन २०१९-२० | र.रु.३६.७५ |
| सन २०२०-२१ | र.रु.३८.६० |

ii) झोपडपट्टी वैयक्तिक नळजोड (वापर ९० LPCD प्रमाणे) झोपडपट्ट्यांमधील वैयक्तिक नळजोडाची पाणीबिले वार्षिक पध्दतीने देण्यात यावीत.

| आर्थिक वर्ष | दर प्रति वर्ष प्रति वैयक्तिक नळजोड |
|---|---|
| सन २०१९-२० | र.रु.१९८.०० |
| सन २०२०-२१ | र.रु.२१०.०० |

iii) झोपडपट्टीतील गट नळजोड (Group Connection)
१५ मिमी व्यास -५ कुटुंबे (वापर ७० LPCDप्रमाणे)

| आर्थिक वर्ष | दर प्रति वर्ष प्रति वैयक्तिक नळजोड |
|---|---|
| सन २०१९-२० | र.रु.५६७.०० |
| सन २०२०-२१ | र.रु.६००.०० |

अनधिकृत नळजोड नियमित करणे व त्यांना आकारावयाच्या पाणीदराबाबत यापूर्वीचेच धोरण कायम ठेवण्यात येत आहे.सदर धोरणाच्या अर्थनिष्पत्तीबाबत (Interpretation) अथवा अन्य कोणताहीप्रासंगिक वाद उद्भवल्यास त्यासंबंधी निर्णय घेण्याचा अधिकार मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना राहील.तरी उपरोक्तप्रमाणे पाणी दर बदला बाबतच्या धोरणास मान्यता देणेकामी मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सदरचा विषय दप्तरी दाखल करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा. संतोष लोंढे** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता---

अनुकुल- ८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.ज्ञानदेव थोरात** **-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ५३० विषय क्रमांक- ३
दिनांक – १/६/२०२० विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वि/गक्षे/थेर/१/२१९/२०२०, दि.३१/०१/२०२०
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६६६२ दि. १७/२/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नव्याने सुरु होणा-या काळेवाडी फाटा ते देहु-आळंदी या बी.आर.टी रस्त्यावरील (CarridorNos 4) बस स्थानकांत रस्ता ओंलाडुन जाणे करीता व उतरल्यानंतर परत रस्ता ओंलाडुन येण्यासाठी नागरीकांच्या सुरक्षेतेच्या दृष्टीने ट्राफीक सिग्नल यत्रंणा बसविणे अत्यंत आवश्यक आहे. त्या प्रमाणे त्याच रस्त्यावरील मुख्य चौक जवळ-जवळ असल्याने, तेथील वाहतुक दिवे यंत्रणा सिक्रोनायजिंग करणे बाबत दि. १७/९/१९ च्या संयुक्त सभेत व दि. कळविणेत आले आहे.

१) वाहतुक नियत्रंक यंत्रणा बसविणे व सिक्रोनायजिंगच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास अंदाजे र.रु.३४,००,०००/- इतका खर्च आपेक्षीत आहे.

२) मा.सहा. पोलीस आयुक्त, वाहतुक शाखा, पिपरीं चिंचवड यांनी त्यांच्या कडील पत्र क्रसपोअ/वाहतुक/६६७/२०१९ दि.२६/७/२०१९ अन्वये थेरगाव फाटा येथे नविन ट्राफीक सिग्नल बसविणेची मागणी केली आहे. या कामाकरीता अंदाजे र.रु.१०,००,०००/- इतका खर्च आपेक्षीत आहे.

३) ग प्रभागातील वाहतुक नियंत्रण यंत्रणे करीता टायमर व बजर बसविणे या कामाकरीता अंदाजे र.रु.१५,००,०००/- इतका खर्च आपेक्षीत आहे.

४) प्रभाग क्र.२१ जयहिंन्द चौकात नविन वाहतुक नियंत्रण दिवे बसविणे करीता मा.नगरसदस्य श्री.संदीप वाघेरे यांनी मागणी केली असुन त्यांस अंदाजे र.रु.१२,००,०००/- इतका खर्च आपेक्षीत आहे.

या सर्व कामाची मागणी सन २०१९-२० चे अंदाजपत्रक मंजुर झाल्यानंतर आली

असल्याने या कामाकरीता ग प्रभागात तरतुद करण्यात आलेली नाही त्यामुळे सदरच्या कामासाठी तरतुद वर्गीकरण करावे लागणार आहे. सांगवी-किवळे या बी.आर.टी.एस. रस्त्यावरील कावेरीनगर व पार्क स्ट्रीट येथे नव्याने बांधणेत येणा-या सबवेस अडथळा होणारी १३२ केव्ही टॉवर लाईनची उंची वाढविणे ह्या कामासाठी सन २०१९-२० या वर्षात र.रु.६०,००,०००/- तरतुद करण्यात आली असुन ती पुरेशी नसल्याने हे काम स्थापत्य विभागाच्या तरतुदीतुन निविदा काढणेत आलेली आहे. त्यामुळे सदरची तरतुद शिल्लक असल्याने, वर नमुद केलेल्या कामा साठी वर्गीकरण करणे शक्य आहे. त्याची सविस्तर माहीती सोबतच्या तक्त्यात दिली आहे. सबब, तक्त्यात नमुद अ.क्र.२ व ५ या कामाचे नाव व अनुक्रमे र.रु.३०,००,०००/-, ८,००,०००/-, १२,००,०००/- व १०,००,०००/- अशी एकुण र.रू.६०,००,०००/-(अक्षरी र.रु.साठ लाख फक्त), सन २०१९-२० चे मनपाचे अंदाजपत्रकात समाविष्ट करणेस, तसेच त्यास आवश्यक तरतुद (सोबतच्या तक्त्या मधील रकाना क्र.९) मनपाच्या मंजुर अदांजपत्रकातील पान क्र.३५९ अ.क्र.१ येथील मुख्य कार्यालय भांडवली अंर्तगत स्थापत्य विषयक प्रक्लपातंर्गत विदयुत विषयक कामे करणे या लेखाशिर्षकातुन, “ट्राफीक सिग्नल, ग प्रभागत्रत ” या लेखाशिर्षातंर्गत (भांडवली खर्च) वर्ग करणेस व अ.क्र.२ व ५ च्या नविन कामास तक्त्या मधील रकाना क्र ५ मधील रक्कमेचे वर्गीकरण करणेस व कामास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.नायर प्रेमकुमार उर्फ बाबू -** मा.महापौर साहेब, सदर ठरावास अनुमोदन देतो.

**मा.मंगला कदम –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. वाहतुकीच्या संदर्भातील जरी विषय असला तरी याला जोडूनच सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा विषय घेतला पाहिजे. या सीसीटीव्ही मुळे सिग्नल तोडणारे पण दिसतील यासाठी या विषयामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी आणखी काय करता येईल हे बघुन घ्या. लोक सिग्नल तोडतात आणि त्यामुळे अपघात होत असतात पिंपरी चिंचवड शहरामध्ये गुन्हेगारीचे प्रमाण वाढत चालली आहे. आज ही गोष्ट सर्व सभासदांच्या मनामध्ये असेल आज लॉकडाऊन संपलेले आहे आणि जी लोक घरामध्ये बसलेली आहेत ते बाहेर पडतील. आणि ज्याठिकाणी सिग्नल बसविलेले आहेत ते कार्यरत आहेत का, कुठल्या,कुठल्या चौकात कॅमेरे बसविलेले आहेत ते कार्यरत आहेत का ते बघा ना तुम्ही संपुर्ण शहरामध्ये केबल टाकण्यासाठी रस्ते खोदून ठेवलेले आहेत पावसाळा तोंडावर आलेला आहे. स्मार्ट सिटीच्या नावाखाली सगळे रस्ते खोदून ठेवलेले आहेत. सिग्नलला गाडी थांबली लोक दरवाजा काढून थुंकतात. लॉकडाऊन संपलेले आहे प्रत्येक नगरसेवकांनी आपआपल्या वॉर्डामध्ये बारीक लक्ष ठेवावे लागणार आहे. या शहरामध्ये वाईट परिस्थिती येणार आहे. यासाठी हे

सीसीटीव्ही कॅमेरे उपयोगी पडतील. स्मार्ट सिटीच्या प्रकल्पामध्ये या कॅमे-याचा विषय का घेतला नाही. ज्याठिकाणी सिग्नल बसविलेले आहेत त्याच्यावरच हे कॅमेरे बसवता येतील. काही वेळेस आम्हांला अपघातामुळे हा सिग्नल पडलेला आहे आणि हे आम्हांला संबंधितांना सांगाव लागतय. चार दिवस उलटून गेलेले आहेत पुलाजवळ सिग्नल नसल्यामुळे अपघात होतात. आयुक्त साहेब, तुमच्या बंगल्यासमोरुन येणा-या पूलावरुन ज्याठिकाणी उतरतो त्याठिकाणचा सिग्नल पडलेला आहे हे आम्हांला अधिका-यांना ४/५ वेळेस फोन करुन सांगावं लागतय तो सिग्नल तुटलाय आणि तो सिग्नल बसवा ज्याठिकाणी सिग्नल बसवण्याची गरज आहे त्याठिकाणी सिग्नल बसवले पाहिजे. नगरसेवकांना विचारलं पाहिजे की, तुमच्या वॉर्डामध्ये कुठे,कुठे सिग्नल बसवण्याची आवश्यकता आहे. आहे का तुमच्याकडे ही माहिती. याठिकाणी विषयामध्ये फक्त लिहीलं आहे की, एवढे लाख रु., एवढे लाख रु. संपला विषय मा.महापौर साहेब, मी मगाशी आपल्याला सांगितलं की, एका दिवशी एकच जीबी ठेवा आणि यामध्ये बाकीच्या सदस्यांना सुध्दा यामध्ये घ्या ना आता यांचे ३ वर्ष संपलेली आहेत. या सदस्यांनी कधी बोलायचे त्यांना बोलण्याची संधी द्या ज्यावेळेस आपण सर्वजण चर्चा करतो त्याचवेळेस त्यामधुन काही निष्पन्न होतं जर बोललच नाही तर काय समजणार आहे का, कमिशनर साहेब काय अमृत पिऊन आलेले आहेत का सगळया गोष्टी समजायला ते काय म्हणतात पदाधिकारी ठराव करतात त्याची मी अंमलबजावणी करतो. महापालिकेचे पैसे विमा योजनेमध्ये किती जातात आणि धन्वंतरी मध्ये किती जातात हे सर्व सदस्यांना समजलं पाहिजे. आपली बचत कोणत्या योजनेमध्ये झाली तुम्ही आमच्या घरातील कर्ते आहात आम्ही तुम्हांला सांगणार नाही तर कोणाला सांगणार सभागृहात बोलूच देत नाही. आईपाशी रडायचं नाही,बापापाशी रडायचं नाही मग काय यांना मुख्यमंत्र्यांचा फोन आणायचा का, प्रत्येकाला बोलण्याची संधी दिली पाहिजे. तुम्हांला जर कंटाळा येत असेल तर उपमहापौरांना थोडा वेळ बसु देत जावा आणि तुम्ही रेस्ट करीत जा. अशी आम्ही आपल्याला सूचना करते.

**मा.महापौर** – हे पहा याठिकाणी विषयांतर होत आहे. कंटाळा वगैरे काही नाही.

**मा.मंगला कदम –** मा.महापौर साहेब, प्रत्येक विषयावर चर्चा झाली पाहिजे. आज १ जुन आहे पावसाळयाचे दिवस आहेत रस्ते खोदाईस परवानगी देणेत येऊ नये. मा.आयुक्त साहेब आपण आणि पदाधिकारी यांना विश्वासात घेवुन एकत्रित निर्णय घेत जा यामध्ये मेंन्टेनंस्ची पण रक्कम टाकणेत यावी अशी विनंती करते.

**मा.सीमा सावळे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह. खरंतर या विषयाचा तसा आता काहीच संबंध राहीलेला नाही. वर्गीकरणाचा विषयाचं आज बजेट आहे आणि एकदा बजेट आहे म्हणल्यानंतर आता या वर्गीकरणाला तसाही काही अर्थ उरलेला नाही. विषयपत्रिकेवर दोन्ही विषय असल्यामुळे त्याच्यावर आज चर्चा होत आहे. चर्चा करीत स्मार्ट सिटीमध्ये सुध्दा आपण प्रामुख्याने ४४४ कोटीचं एक टेंडर काढलेलं आहे त्यामध्ये सिग्नल कंट्रोलींग असेल, सीसीटीव्ही कॅमेरे आहेत पर्यावरणाच्या संदर्भात काही नुतनीकरण करतो आहे. मा.आयुक्त साहेब,आपण या महापालिकेत गेली ३ वर्ष आयुक्त म्हणुन आहात आपण हे सगळं स्मार्ट सिटीमध्ये घेतलं असतं आणि एका वेळेस म्हणजे तुम्हांला सगळं माहिती आहे. जसं आपण पोलीसांच्या सूचना घेतल्या आणि आपण स्मार्ट सिटीचं काम करतोय तसंच आमचे १३३ नगरसेवक आहेत यांना आपआपल्या भागातले प्रश्न खुप चांगल्या प्रकारे माहिती असतात कुठल्या चौकात ट्रॅफिक जॅम होतं,कुठ सिग्नल बसवायचे आहेत सीसीटीव्ही कॅमेरे कुठे बसवायचे आहेत कोणी सिग्नल तोडत असेल, कोणी कोणाची पर्स मारली असेल, कोणी धक्का मारला म्हणुन मारामारी होत असतात अनेक गोष्टी आहेत ज्या यामध्ये सगळया कव्हर झाल्या असत्या एकच टेंडर काढलं असत तर आणि जसंजस आपण हे टेंडर फॉलोप करतो हा वर्गीकरणाचा विषय आहे आणि हे संपुर्ण वर्ष संपल्यानंतर आलेला आहे. याच्यापुर्वीचा विषय होता तो ही तसाच आहे. त्या विषयामध्येही काही तथ्य नाही आणि या विषयामध्ये सुध्दा काही तथ्य नाही. पण विषय सभागृहापुढे आल्यानंतर त्यावर बोललं तर पाहिजे नां आणि चर्चा करुन त्यातलं चांगलं काय आणि वाईट काय मगाशी मा.महापौर यांना वारंवार विनंती करीत होते की, त्या विषयावर दोन मिनिटे बोलाव लागल असतं म्हणजे त्यांनी त्यांची भूमिका स्पष्ट केली असती त्यांनी तर सांगितलं होत की, याचा आता काही उपयोग नाही, ही योजना लागु होणार नाही. योगेश बहलनी म्हणले की, मागच्या स्टँडींगने ७ कोटी रु.घेतले जे काही आरोप केले ते एका मिनीटांत निरस्त झाले असते. मा.आयुक्त साहेब यांना खुलासा करु द्यायला पाहिजे होता.त्यांनी खुलासा न केल्यामुळे आपल्याला रोज रोज तेच तेच ऐकायला मिळेल मा.आयुक्त साहेब, माझी आपल्याला विनंती आहे की, स्मार्ट सिटीमध्ये आपण काम करीत असताना एवढं मोठं टेंडर आपण काढलेलं आहे गेल्या ३/४ महिन्यापासून आपली सगळी कामे ठप्प आहेत आपण स्मार्ट सिटी प्रकल्पासाठी जागोजागी रस्ते खोदलेले आहेत ड्रेनेज लाईन जवळ खोदकाम केलेले आहे. आणि आता पावसाळा सुरु झालेला आहे त्यामुळे ते दुरुस्त सुध्दा करता येणार नाही. एखादं ॲडीशनल टेंडर काढुन हे काम आपल्याला करता येईल का ते बघावे हे दोन्ही विषय तुम्हांला सुरु करता येईल अशी सूचना करते. आणि या विषयाचा तसा काही संबंध नाही.तरतुद वर्गीकरणाचा विषय

आहे. आजच आपली बजेटची सुध्दा मिटींग आहे. धन्यवाद

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता---

अनुकुल- ८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.तुषार हिंगे -** मा.महापौर साहेब विषय क्रमांक ४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक- ४

दिनांक – १/६/२०२० विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वृक्ष/४/कावि/७३/२०२०, दि.०७/०२/२०२०

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६६८२ दि. १७/२/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे जतन अधिनियम १९७५ प्रकरण ६ कलम १६ अन्वये मा.वृक्षप्राधिकरणाने तयार केलेले व मंजुर केलेले अंदाजपत्रक असुन २०१९-२० चे सुधारीत र.रू.२८,६७,१६,०००/- व सन २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रक र.रू.३२,०३,८१,०००/- इतके आहे. सदर अंदाजपत्रकास मान्यता देणेत यावी.

**मा. केशव घोळवे** – मा.महापौर साहेब. ठरावास अनुमोदन देतो.

**मा.ज्ञानदेव थोरात** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- मनपा मार्फत मोठया प्रमाणात वृक्षारोपण करणेत येते त्याचप्रमाणे हरीतवारी अंतर्गत देहूरोड जकातनाका ते देहुगांव या रस्त्याचे कडेने दुतर्फा वृक्षारोपण करणे त्याचप्रमाणे सी.एम.ई. व इतर मिलीटरी हद्दीमधील ५ कि.मी.परीसरामध्ये वृक्षारोपण करुन त्याची देखभाल ३ वर्षे करणेस व त्याकरीता येणा-या खर्चास मान्यता देणेत यावी.

**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.तुषार हिंगे** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसुचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक – ५३१ विषय क्रमांक- ४
दिनांक – १/६/२०२० विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वृक्ष/४/कावि/७३/२०२०, दि.०७/०२/२०२०
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६६८२ दि. १७/२/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे जतन अधिनियम १९७५ प्रकरण ६ कलम १६ अन्वये मा.वृक्षप्राधिकरणाने तयार केलेले व मंजुर केलेले अंदाजपत्रक असुन २०१९-२० चे सुधारीत र.रू.२८,६७,१६,०००/- व सन २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रक र.रू.३२,०३,८१,०००/- इतके आहे. सदर अंदाजपत्रकास मान्यता देणेत येत आहे. तसेच मनपा मार्फत मोठया प्रमाणात वृक्षारोपण करणेत येते त्याचप्रमाणे हरीतवारी अंतर्गत देहूरोड जकातनाका ते देहुगांव या रस्त्याचे कडेने दुतर्फा वृक्षारोपण करणे त्याचप्रमाणे सी.एम.ई. व इतर मिलीटरी हद्दीमधील ५ कि.मी.परीसरामध्ये वृक्षारोपण करुन त्याची देखभाल ३ वर्षे करणेस व त्याकरीता येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

अनुकुल- ८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.केशव घोळवे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक- ५
दिनांक – १/६/२०२० विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.भुजि/०६/कावि/१७८/ २०२०, दि.१७/०२/२०२०
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६८१३ दि.२८/२/२०२० अन्वये.

कै.अण्णासाहेब मगर स्टेडीअम नेहरूनगर, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून

मनपाकडे हस्तांतरीत झाले आहे. सन १९९२ साली महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाने सदर चा प्रकल्प मनपाच्या ताब्यात देणेकामी दि.२१/०९/१९९२ रोजी करारनामा करून प्रकल्प हस्तांतरणाच्या बदल्यात महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे कर्मचारी मनपा सेवेत समाविष्ठ करून महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळास र.रु. १ कोटी व खालील प्रमाणे ५ भुखंड ताब्यात देण्याचे ठरविले होते.

| अ.क्र. | भूखंडाचे वर्णन | ठरावा प्रमाणे देय जागांचे क्षेत्र | देय जागांचे क्षेत्र (चौ.फुट) मध्ये. |
|---|---|---|---|
| १) | से.नं.२५ मधील प्लॉट क्र.२९० जवळील भुखंड | २५,००० चौ.फुट | २५,०००चौ.फुट |
| २) | से.नं.०५ मधील मोशी येथील भुखंड | २ एकर | ८०,००० चौ.फुट |
| ३) | से.नं.२६ मधील आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळील जागा. | १ एकर | ४०,००० चौ.फुट |
| ४) | सर्व्हे क्र.१९५,आरक्षण क्र.१९० चिंचवड येथील मनपा शाळेच्या मैदानाची आरक्षणाची जागा. | २०,००० चौ.फुट | २०,००० चौ.फुट |
| ५) | थेरगाव येथील सर्व्हे नं.९ येथील १.५ एकर जागा | १.५ एकर | ६०,००० चौ.फुट |
| | | एकूण देय क्षेत्र :- | २,२५,००० चौ.फुट |

करारनाम्यात नमूद महानगरपालिकेकडून महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळास १ कोटी रुपये देण्यात आलेले असून जागेच्या मोबदल्यात से.नं.२५ व २६ मधील नमूद दोन जागे ऐवजी सर्व्हे नं.१९५ चिंचवड येथील ८८,५६० चौ.फुट व अतिरिक्त ८७१.५ चौ.फुट असे एकूण ८९४३१.५ चौ.फुटजागा ३ ठिकाणचे जागांच्या बदल्यात २७/०५/१९९३ रोजी हस्तांतरित करण्यात आलेली आहे. त्या पैकी २०,००० चौ.फुट जागा महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळास आवश्यक असल्याने सदर जागा का.क.मंडळास ठेवून उर्वरित जागा मिळावी अशी मागणी आहे. त्यानुसार ०५ ठिकाणी देय क्षेत्र २,२५,००० चौ.फुट मधून का.क.मंडळास ताब्यात दिलेल्या क्षेत्रा पैकी त्यांना जी जागा आवश्यक आहे ते क्षेत्रफळ वजा करून उर्वरीत जागा देण्याचे विषयपत्र सादर करण्यात आले आहे. तथापी समक्ष चर्चेअंती एकाच ठिकाणी जागा देणे सोयीचे असलेने पिंपरी येथील खालील वर्णनातील जागा देणे योग्य राहील म्हणून यापूर्वी सादर केलेले विषयपत्र रद्द करून पिंपरीचे जागेबाबत विषयपत्र सादर करणेत येत आहे.

| अ.क्र. | भूखंडाचे वर्णन | भूखंडाचे क्षेत्रफळ (चौ.फुट) | मागणी केलेले क्षेत्र | प्रयोजन |
|---|---|---|---|---|
| १) | पिंपरी स.नं.१५०पै.१५१पै.आरक्षणक्र. ९५ अजमेरा - क्षेत्र २२,५०० चौ.मी. | २,४२,१०० चौ.फुट | २,०५,००० चौ.फुट | बहुउद्देशीय कलाकेंद्र |

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळास उपरोक्त जागे पैकी २,०५,००० चौ.फुट जागा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७९ मधील तरतुदीनुसार ३० वर्षे कालावधी साठी देणेबाबत कार्यवाही करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.बाबासाहेब त्रिभूवन** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू** – मा.महापौर साहेब, मी पुढील प्रमाणे उपसूचना मांडतो- तसेच महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांना पिंपरी स.न. १५० पै. १५१ पै. आरक्षण क्र. ९५ अजमेरा क्षेत्र २२५०० चौ. मी. पैकी. २०५००० चौ. फुट जागा हस्तातंरीत करणेत येत आहे. तरी सदरहु भुखंडामध्ये बहुउद्देशीय कलाकेंद्र व तत्सम प्रकल्प महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळांचे वतीने विकसित करणेत येणार आहे. तरी या भुखंडाचे प्रकल्पांचे लाभ प्राधान्याने मोरवाडी म्हाडा कॉलनी, अजमेरा व पिंपरी चिंचवड शहर हद्दीमधील सर्व नागरिकांना मिळणेस मान्यता देणेत यावी. व महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ व महानगरपालिका करारामध्ये सदर मुद्दा घेवुन मान्य करणेस मान्यता देणेत यावी सदर प्रकल्प ३ वर्षाचा कालावधीमध्ये पुर्ण करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.ज्ञानदेव थोरात** –मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.
**मा.केशव घोळवे** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक – ५३२ विषय क्रमांक- ५
दिनांक- १/६/२०२० विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.भुजि/०६/कावि/१७८/२०२०, दि.१७/०२/२०२०
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६८१३ दि.२८/२/२०२० अन्वये.

कै.अण्णासाहेब मगर स्टेडीअम नेहरूनगर, महाराष्ट्र कामगारकल्याण मंडळाकडून

मनपाकडे हस्तांतरीत झाले आहे. सन १९९२ साली महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाने सदर चा प्रकल्प मनपाच्या ताब्यात देणेकामी दि.२१/०९/१९९२ रोजी करारनामा करून प्रकल्प हस्तांतरणाच्या बदल्यात महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे कर्मचारी मनपा सेवेत समाविष्ठ करून महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळास र.रु. १ कोटी व खालील प्रमाणे ५ भुखंड ताब्यात देण्याचे ठरविले होते.

| अ.क्र. | भूखंडाचे वर्णन | ठरावा प्रमाणे देय जागांचे क्षेत्र | देय जागांचे क्षेत्र (चौ.फुट) मध्ये. |
|---|---|---|---|
| १) | से.नं.२५ मधील प्लॉट क्र.२९० जवळील भुखंड | २५,००० चौ.फुट | २५,०००चौ.फुट |
| २) | से.नं.०५ मधील मोशी येथील भुखंड | २ एकर | ८०,००० चौ.फुट |
| ३) | से.नं.२६ मधील आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळील जागा. | १ एकर | ४०,००० चौ.फुट |
| ४) | सर्व्हे क्र.१९५,आरक्षण क्र.१९० चिंचवड येथील मनपा शाळेच्या मैदानाची आरक्षणाची जागा. | २०,००० चौ.फुट | २०,००० चौ.फुट |
| ५) | थेरगाव येथील सर्व्हे नं.९ येथील १.५ एकर जागा | १.५ एकर | ६०,००० चौ.फुट |
| | | एकूण देय क्षेत्र :- | २,२५,००० चौ.फुट |

करारनाम्यात नमूद महानगरपालिकेकडून महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळास १ कोटी रुपये देण्यात आलेले असून जागेच्या मोबदल्यात से.नं.२५ व २६ मधील नमूद दोन जागे ऐवजी सर्व्हे नं.१९५ चिंचवड येथील ८८,५६० चौ.फुट व अतिरिक्त ८७१.५ चौ.फुट असे एकूण ८९४३१.५ चौ.फुटजागा ३ ठिकाणचे जागांच्या बदल्यात २७/०५/१९९३ रोजी हस्तांतरित करण्यात आलेली आहे. त्या पैकी २०,००० चौ.फुट जागा महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळास आवश्यक असल्याने सदर जागा का.क.मंडळास ठेवून उर्वरित जागा मिळावी अशी मागणी आहे. त्यानुसार ०५ ठिकाणी देय क्षेत्र २,२५,००० चौ.फुट मधून का.क.मंडळास ताब्यात दिलेल्या क्षेत्रा पैकी त्यांना जी जागा आवश्यक आहे ते क्षेत्रफळ वजा करून उर्वरीत जागा देण्याचे विषयपत्र सादर करण्यात आले आहे. तथापी समक्ष चर्चेअंती एकाच ठिकाणी जागा देणे सोयीचे असलेने पिंपरी येथील खालील वर्णनातील जागा देणे योग्य राहील म्हणून यापूर्वी सादर केलेले विषयपत्र रद्द करून पिंपरीचे जागेबाबत विषयपत्र सादर करणेत येत आहे.

| अ.क्र. | भूखंडाचे वर्णन | भूखंडाचे क्षेत्रफळ (चौ.फुट) | मागणी केलेले क्षेत्र | प्रयोजन |
|---|---|---|---|---|
| १) | पिंपरी स.नं.१५०पै.१५१पै.आरक्षणक्र. ९५ अजमेरा - क्षेत्र २२,५०० चौ.मी. | २,४२,१०० चौ.फुट | २,०५,००० चौ.फुट | बहुउद्देशीय कलाकेंद्र |

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळास उपरोक्त जागे पैकी २,०५,००० चौ.फुट जागा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७९ मधील तरतुदीनुसार ३० वर्षे कालावधी साठी देणेबाबत कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांना पिंपरी स.न. १५० पै. १५१ पै. आरक्षण क्र. ९५ अजमेरा क्षेत्र २२५०० चौ. मी. पैकी. २०५००० चौ. फुट जागा हस्तातंरीत करणेत येत आहे. तरी सदरहु भुखंडामध्ये बहुउद्देशीय कलाकेंद्र व तत्सम प्रकल्प महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळांचे वतीने विकसित करणेत येणार आहे. तरी या भुखंडाचे प्रकल्पांचे लाभ प्राधान्याने मोरवाडी म्हाडा कॉलनी, अजमेरा व पिंपरी चिंचवड शहर हद्दीमधील सर्व नागरिकांना मिळणेस मान्यता देत आहे. व महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ व महानगरपालिका करारामध्ये सदर मुद्दा घेवुन मान्य करणेस मान्यता देणेत येत आहे. सदर प्रकल्प ३ वर्षाचा कालावधीमध्ये पुर्ण करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.विकास डोळस** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक- ६

दिनांक – १/६/२०२० विभाग- मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्तयांचे पत्र
क्र.मसाभां/५/कावि/१०३/२०२०, दि.२८/०२/२०२०
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६८९९ दि.२८/२/२०२०
अन्वये.

मनपाच्या परिसरातील रुग्णालये व इतर संलग्न (मनपासह) जैव वैदयकीय संस्थामधून

निर्माण होणा-या जैव वैदयकीय कच-याची याबाबतचा कायदा, नियम व मागदर्शक सुचना या गोष्टींच्या योग्य त्या अंमलबजावणी बाबत गांर्भियाने विचार करणे आवश्यक आहे. या सर्व बाबींचा विचार करता मोशी येथे जैव वैदयकीय घनकचरा विल्हेवाटीचा Plant स्थलांतरीत करण्यासाठी M/s.Pasco Environmental Sol. Pvt. Ltd., यांनाच करारनामा अट क्र.२२ नुसार चालू Terms वर नवीन Plant स्थापन करुन संचालन पुढील १५ वर्षे करावे की नव्याने निविदा काढावी ? याबाबत विचारणा करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७२ (ब) नुसार सोबत जोडलेल्या प्रपत्र - अ, ब, क व ड चे अवलोकन करुन मान्यता देणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी असली तरी, प्रस्तुत विषयातील काम मे.पास्को इन्व्हायरमेंटल सोल्युशन प्रा.लि. यांचे कडून अट क्र.२२ नुसार चालू Terms वर नवीन Plant स्थापन करून पुढील १५ वर्षे संचालन करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.कुंदन गायकवाड** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.तुषार हिंगे** -मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ तहकुब ठेवणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा. अभिषेक बारणे** – मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सुचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता---

ठराव क्रमांक – ५३३ विषय क्रमांक- ६

दिनांक – १/६/२०२० विभाग- मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्तयांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/१०३/२०२०, दि.२८/०२/२०२०

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६८९९ दि.२८/२/२०२० अन्वये.

विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकुल- ८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.ज्ञानदेव थोरात** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक- ७

दिनांक १/६/२०२० विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.सागर आंगोळकर, मा.पंकज भालेकर यांचा प्रस्ताव–

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६९२१ दि.२८/२/२०२० अन्वये.

महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीमध्ये मनपाच्या विविध विभागांचे कार्यालय कार्यरत आहे. यामुळे येथे खुप मोठ्या प्रमाणावर नागरीक तसेच अधिकारी व पदाधिकारी यांची वर्दळ कायम असते. मनपा कार्यालयामध्ये कामकाजानिमित्त आलेल्या पदाधिकारी व्यक्तिंना मनपा आवारात वाहन लावणेकामी जागा अपुरी पडत असल्या कारणाने मनपाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरील कै.अण्णासाहेब मगर यांच्या पुतळ्या पर्यंतची सर्व जागा हि पदाधिकारी व नगरसदस्य यांचेकरिता कायमस्वरुपी राखीव ठेवावी. तसेच मा.महापौर, मा.स्थायी समिती सभापती यांचे वाहनास मुख्यप्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूस व मा.उपमहापौर व मा.आयुक्त यांचे वाहनास मनपा मुख्य प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजुची जागा राखीव ठेवण्यात आलेली आहे. तसेच सत्तारुढ पक्षनेता, विरोधी पक्षनेता यांचे वाहनास मनपा मुख्य प्रवेशद्वारा समोरील खांबाच्या प्रवेशद्वाराकडील बाजुच्या पुढील दोन जागा राखीव ठेवण्यात याव्यात. तसेच मनपा मुख्य इमारतीच्या मागील बाजुचा परीसर व कामगार कल्याण विभागापासून मनपाच्या आऊट गेट पर्यंतचा परिसर कर्मचारी व नागरीक यांचे वाहनांकरिता तसेच दिव्यांगासाठी आरक्षित असलेल्या वाहनांच्या आरक्षीत जागेच्या शेजारील परिसर माजी आमदार, माजी महापौर, माजी सभापती यांचे वाहनांकरिता खुला ठेवणेस मान्यता देणेस तसेच मनपा परीसरात वाहन पार्किंगचे नियोजन व नियंत्रण सुरक्षा विभागामार्फत करण्यास व मा.महानगरपालिका सभा अथवा महत्वाचे कार्यक्रमाचे वेळी मा.पदाधिकारी यांचे वाहनाशिवाय इतर वाहनांच्या पार्किंगबाबत परीस्थितीनुसार तात्पुरत्या स्वरुपात बदल करण्याचे अधिकार सुरक्षा विभागास देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.तुषार हिंगे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ दसरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.अभिषेक बारणे** – मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सुचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक - ५३४ विषय क्रमांक – ७

दिनांक -१/६/२०२० विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.सागर आंगोळकर, मा.पंकज भालेकर यांचा प्रस्ताव–
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६९२१ दि.२८/२/२०२० अन्वये.

विषय क्रमांक ७ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकुल- ८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा. भिमाबाई फुगे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ८

दिनांक -१/६/२०२० विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.भिमाबाई फुगे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव –
२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.६९७३, दि.११/०३/२०२०

पिंपरी चिंचवड शहरात मोठया संख्येने सैनिक कुटूंब शिक्षण आणि रोजगाराच्या उद्येशाने स्थायिक झालेले आहेत. आज शहरात कित्येक वर्षापासून राहत असलेल्या या सैनिक परिवारातील मुले सैन्यात देशसेवा करत आहेत. जम्मू काश्मिरसह लेह-लडाख व इतर भागात अत्यंत कठीण परिस्थितीमध्ये सीमेवर देश रक्षणासाठी तैनात आहेत. राज्यातील विविध जिल्हयातील जवान शहीद झाल्यावर केंद्र शासन तसेच राज्य सरकार व स्थानिक पातळीवर शहीद परिवारास आर्थिक मदत केली जाते. खुप मोठा नावलौकीक आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा आज राज्यात व देशात आहे. आपल्या पिंपरी चिंचवड शहरात स्थायिक असलेल्या सैनिक परिवारातील जवान देशसेवा करताना यापुढील काळात शहीद झाल्यास त्या कुटूंबाला महानगरपालिकेच्यावतीने आर्थिक मदत रुपये ५,००,०००/- (अक्षरी र.रु.पाच लाख फक्त) त्वरित देणेस मान्यता देणेकामी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने उपलब्ध झालेला हा निधी शहीद कुटूंबातील मुलांच्या शिक्षणासाठी व भविष्यासाठी खूप मोठा हातभार लावेल आणि सैनिक परिवाराचे मनोबल निश्चितपणे उंचावले जाईल आणि जवानांच्या सर्वोच्च बलिदानाचा मान-सन्मान राखण्याचे कार्य या निमित्ताने निश्चित होईल. याबाबत धोरण ठरविणेची संपूर्ण कार्यवाही नागरवस्ती विभागाकडून करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.योगीता नागरगोजे** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.तुषार हिंगे –** मा.महापौर साहेब, मी पुढील प्रमाणे उपसुचना मांडतो- टाटा ग्रुपचे सर्वेसर्वा उद्योगपती मा. रतन टाटा यांनी कोरोना विरुध्दच्या लढाईत मदतीचा हात पुढे केला आहे. त्यासाठी टाटा उद्योग समुहाच्या वतीने तब्बल १ हजार ५०० कोटीची मदत केली आहे. शिवाय मुंबई येथील हॉटेल ताज विनामोबदला कोरोना विरुध्दच्या लढ्यामध्ये काम करणा-या वैद्यकीय अधिकारी व कर्मचा-यांना राहण्यासाठी उपलब्ध करुन दिले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत कोरोनाचा प्रतिबंध करण्यासाठी भरीव अशी मदत केली आहे. त्याचप्रमाणे त्यांनी देशावर ज्या ज्या वेळी संकटे आली अशा वेळेस सर्वतोपरी मदत केली आहे.

वास्तवत: टाटा उद्योग समुह हा पिंपरी चिंचवड शहराच्या जडणघडणीत व नावलौकीकात भर टाकणारा मोठा उद्योग समुह आहे. टाटा उद्योग समुहाच्या माध्यमातुन पिंपरी चिंचवड शहरातील अनेक तरुणांना उद्योग व्यवसाय व नोक-या उपलब्ध करुन देण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे. म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महासभेच्या माध्यमातुन मा. रतनजी टाटा साहेब यांना सर्वोच्च असा भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करणेत यावे अशी राज्य व केंद्रशासनाकडे शिफारस करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.केशव घोळवे –** मा.महापौर साहेब, उपसुचनेस अनुमोदन देतो.

**मा. भिमाबाई फुगे** – मा.महापौर साहेब, उपसुचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता--

ठराव क्रमांक - ५३५ विषय क्रमांक – ८
दिनांक -१/६/२०२० विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.भिमाबाई फुगे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव –
२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.६९७३, दि.११/०३/२०२०

पिंपरी चिंचवड शहरात मोठया संख्येने सैनिक कुटूंब शिक्षण आणि रोजगाराच्या उद्येशाने स्थायिक झालेले आहेत. आज शहरात कित्येक वर्षापासून राहत असलेल्या या सैनिक परिवारातील मुले सैन्यात देशसेवा करत आहेत. जम्मू काश्मिरसह लेह-लडाख व इतर भागात अत्यंत कठीण परिस्थितीमध्ये सीमेवर देश रक्षणासाठी तैनात आहेत. राज्यातील विविध जिल्हयातील जवान शहीद झाल्यावर केंद्र शासन तसेच राज्य सरकार व

स्थानिक पातळीवर शहीद परिवारास आर्थिक मदत केली जाते. खुप मोठा नावलौकीक आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा आज राज्यात व देशात आहे. आपल्या पिंपरी चिंचवड शहरात स्थायिक असलेल्या सैनिक परिवारातील जवान देशसेवा करताना यापुढील काळात शहीद झाल्यास त्या कुटूंबाला महानगरपालिकेच्यावतीने आर्थिक मदत रुपये ५,००,०००/- (अक्षरी र.रु.पाच लाख फक्त) त्वरित देणेस मान्यता देणेत येत आहे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने उपलब्ध झालेला हा निधी शहीद कुटूंबातील मुलांच्या शिक्षणासाठी व भविष्यासाठी खूप मोठा हातभार लावेल आणि सैनिक परिवाराचे मनोबल निश्चितपणे उंचावले जाईल आणि जवानांच्या सर्वोच्च बलिदानाचा मान-सन्मान राखण्याचे कार्य या निमित्ताने निश्चित होईल. याबाबत धोरण ठरविणेची संपूर्ण कार्यवाही नागरवस्ती विभागाकडून करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच टाटा ग्रुपचे सर्वेसर्वा उद्योगपती मा. रतन टाटा यांनी कोरोना विरुध्दच्या लढाईत मदतीचा हात पुढे केला आहे. त्यासाठी टाटा उद्योग समुहाच्या वतीने तब्बल १ हजार ५०० कोटीची मदत केली आहे. शिवाय मुंबई येथील हॉटेल ताज विनामोबदला कोरोना विरुध्दच्या लढ्यामध्ये काम करणा-या वैद्यकीय अधिकारी व कर्मचा-यांना राहण्यासाठी उपलब्ध करुन दिले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत कोरोनाचा प्रतिबंध करण्यासाठी भरीव अशी मदत केली आहे. त्याचप्रमाणे त्यांनी देशावर ज्या ज्या वेळी संकटे आली अशा वेळेस सर्वतोपरी मदत केली आहे.

वास्तवत: टाटा उद्योग समुह हा पिंपरी चिंचवड शहराच्या जडणघडणीत व नावलौकीकात भर टाकणारा मोठा उद्योग समुह आहे. टाटा उद्योग समुहाच्या माध्यमातुन पिंपरी चिंचवड शहरातील अनेक तरुणांना उद्योग व्यवसाय व नोक-या उपलब्ध करुन देण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे. म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महासभेच्या माध्यमातुन मा. रतनजी टाटा साहेब यांना सर्वोच्च असा भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करणेत यावे अशी राज्य व केंद्रशासनाकडे शिफारस करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.योगीता नागरगोजे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ५३६ विषय क्रमांक – ९
दिनांक -१/६/२०२० विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिकाआयुक्त यांचे पत्र क्र.बक्षेका/१४/२०२० दि.१०/०२/२०२०
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.३१ दि.२०/२/२०१० अन्वये.

मुकाई चौक ते भक्तीशक्ती चौक बीआरटीएस रस्त्याचे काम चालु आहे. या कामांतर्गत निसर्गदर्शन सोसायटी जवळ रेल्वे ओव्हर ब्रिजचे कामात महाराष्ट्र राज्य विज पारेषण कंपनीचा इएचव्ही टॉवर हलविणे व टॉवरची उंची वाढविणे आवश्यक आहे. या कामाचे महाराष्ट्र राज्य विज पारेषण कंपनीकडून सुधारीत अंदाजपत्रक प्राप्त झालेले आहे. तसेच कामासाठी रेल्वे ब्लॉक व महाराष्ट्र राज्य विज पारेषण कंपनीचा २२० कि.व्हो. दाबाचा विज पुरवठा बंद करणेसाठीचे चार्जेस यांचा एकुण अंदाजे खर्च र.रु.२५,००,००,०००/- (अक्षरी र.रु. पंचवीस कोटी फक्त) इतका खर्च अपेक्षित आहे. या कामाची प्रशासकिय मान्यता र.रु.७,००,००,०००/- इतकी मा.महापालिकासभेने ठराव क्र.१०२ दिनांक२८/११/२०१७ अन्वये यापुर्वी दिलेली होती. तरी उपरोक्त विषयांकित कामास र.रू.२५,००,००,०००/- (अक्षरी र.रु. पंचवीस कोटी फक्त) या रकमेस सुधारीत प्रशासकिय मान्यता मिळणेकामी मा.आयुक्त यांची शिफारस असली तरी सदरचा विषय दप्तरी दाखल करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.संगिता भोंडवे** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता---

अनुकूल- ८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा. भिमाबाई फुगे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ५३७ विषय क्रमांक –१०

दिनांक -१/६/२०२० विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ** - १) मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांचेकडील पत्र क्र.स्वभाअक/३/ कावि/३८/२०२० दिनांक ०४/०३/२०२०

केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान” च्या धर्तीवर राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेत येत आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागणदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमेर.रु ६,४१,३४,९६१/- व १२,०५,३४,९७४/- असे एकुण र. रु १८,४६,६९,९३५/- अनुदान प्राप्त झाले आहे. प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/-, राज्य शासनाचे र.रु. ८०००/- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/-याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत महापालिकेने दिनांक २९/०२/२०२० अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे –

**प्रपत्र “अ”**

| **महानगरपालिकेचे नाव** | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|
| जिल्हा | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | १८१६६ | |

| | | | |
|---|---|---|---|
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | १८१६६ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | १५६५५ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | एकुण बांधकाम पुर्ण -१५६२३ | मनपामार्फतबांधकाम पुर्ण – १०८३१ सी.एस.आर (एनजीओ) मार्फत बांधकाम - ४७९२ |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ५८२ सीटस | महिला – २६२सिटस कामकाज पूर्ण<br>पुरुष – ३२० सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | १११६० लाभार्थी | GOI+GOM=६६९.६०लाख | GOI = २०००/- व<br>GOM= ४०००/-हिस्सा |
| | | ULB = २२३.२० लाख | ULB = २०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **८९२.८ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | १०५५१ लाभार्थी | GOI+GOM=६३३.०६लाख | GOI = २०००/- व<br>GOM= ४०००/-हिस्सा |
| | | ULB = २११.०२ लाख | ULB = २०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **८४४.०८ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत आला.

**मा.योगिता नागरगोजे** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

अनुकूल-८१ प्रतिकुल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा. केशव घोळवे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ५३८ विषय क्रमांक –११

दिनांक -१/६/२०२० विभाग- मा.नगरसचिव

**मा.विधी समिती**

अ) दिनांक ०७/०२/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.बाबासाहेब त्रिभूवन** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता--

अनुकूल- ८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.केशव घोळवे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ५३९ विषय क्रमांक –१२

दिनांक -१/६/२०२० विभाग- मा. नगरसचिव

**मा.शहर सुधारणा समिती**

अ) दिनांक २२/१/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा. बाबासाहेब त्रिभुवन** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता---

अनुकूल- ८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.केशव घोळवे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ५४० विषय क्रमांक –१३

दिनांक -१/६/२०२० विभाग- मा. नगरसचिव

**<u>मा.शिक्षण समिती सभा</u>**

अ) दिनांक ६/२/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.बाबासाहेब त्रिभुवन** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता---

अनुकूल-८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.महापौर** – सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करणेत येत आहे.

(उषा उर्फ माई मनोहर ढोरे )
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/६/कावि/०८/२०२०
दिनांक - ७/७/२०२०



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**(क्र.वि/गक्षे/थेर/१/२१९/२०१९ दि.३१/०१/२०२० अन्वये विषय क्रमांक ३ चे लगत)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८

**ग क्षेत्रीय कार्यालय, विद्युत विभाग**

तरतुद वर्गीकरणाची सविस्तर माहीती दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | लेखाशिर्ष | उपलेखाशिर्ष | अंदाजपत्रकातील पान क्र. व अ.क्र. | प्रशासकीय मान्यता र.रु. | सन २०१९-२० चा मुळ अंदाज र.रु. | करावयाची वाढ र. रू. | करावयाची घट र. रू. | सन २०१९-२० चा सुधारीत तरतुद र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| 1 | स्थापत्य विषयक कामे ग प्रभाग | सांगवी-किवळे या बी.आर.टी.एस. रस्त्यावरील कावेरीनगर व पार्क स्ट्रीट येथे नव्याने बांधणेत येणा-या सबवेस अडथळा होणारी १३२ केव्ही टॉवर लाईनची उंची वाढविणे बाबत... | 359/1 | | 60,00,000 | 0 | 60,00,000 | 0 |
| 2 | ट्राफीक सिग्नल | काळेवाडी फाटा ते देहु-आळंदी या बी.आर.टी रस्त्यावरील (Corridor Nos 4) बस स्थानकांसाठी वाहतुक नियंत्रण दिवे बसविणे व मुख्य चौकातील यंत्रणेचे सिक्रोनायजिंग करणे. | | 34,00,000 | 0 | 30,00,000 | 0 | 30,00,000 |
| ३ | ट्राफीक सिग्नल | प्रभाग क्र २४ थेरगाव फाटा येथे नविन वाहतुक नियंत्रण दिवे बसविणे. | | 10,00,000 | 0 | 8,00,000 | 0 | 8,00,000 |